

वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज

# संकल्प

## वार्षिकांक २०२२-२३

ACCREDITED WITH GRADE A+ NAAC

KCSW nirf KCSW is positioned in the 101-150 band Under College Category
National Institutional Ranking Framework 2023

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ नागपूर
संलग्नित
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज टेक्निकल ॲन्ड एज्यूकेशन सोसायटी नागपूर
द्वारा संचालित

# कुंभलकर कॉलेज ऑफ सोशल वर्क, वर्धा

महाराष्ट्र राज्य सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग मान्यता प्राप्त

# भारताचे संविधान

प्रस्वताविका

आम्ही, भारताचे लोक, भारताचे एक
सार्वभौम, समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही
गणराज्य घडवण्याचा व त्याच्या सर्व नागरिकांस:

सामाजिक, आर्थिक व राजनैतिक न्याय;
विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा
व उपासना याचे स्वातंत्र्य;
दर्जाची व संधीची समानाता;

निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा
आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा
व राष्ट्राची एकता आणि एकात्मता
यांचे आश्वासन देणारी बंधुता
प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून;

आमच्या संविधानसभेत
आज दिनांक सव्वीस नोव्हेंबर, १९४९ रोजी
याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित
करून स्वत: प्रत अर्पण करत आहोत.

# आमचे प्रेरणास्थान



## स्मृतिशेष मा.डॉ. योगेश कृष्णरावजी कुंभलकर

### संस्थापक सचिव / अध्यक्ष

**जन्म १ ऑगस्ट १९६३** **मृत्यु ८ नोव्हेंबर २०१९**

---

- राष्ट्रसंत तुकडोजी महाराज टेक्नीकल ॲण्ड एज्युकेशन सोसायटी गणेशपेठ, नागपूर द्वारा संचालित
- कुंभलकर कॉलेज ऑफ सोशल वर्क वर्धा
- कुंभलकर समाजकार्य सांध्यकालिन महाविद्यालय नागपूर
- स्वामी विवेकानंद वृद्धाश्रम सावनेर, नागपूर
- राजीव गांधी प्राथमिक शाळा, गणेशपेठ, नागपूर
- प्रौढ दिव्यांगाची तांत्रिक कर्मशाळा, नागपूर
- शाहू-फुले-आंबेडकर निवासी आश्रम शाळा, नागपूर

### राजकीय व सामाजिक पदे

प्रदेश सरचिटणीस - राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी महाराष्ट्र प्रदेश
अध्यक्ष - ज्येष्ठ नागरीक सेल नागपूर जिल्हा
अध्यक्ष - नागपूर जिल्हा विकास मंच नागपूर
अध्यक्ष - युवा लायन्स क्रिडा मंडळ, नागपूर
कार्याध्यक्ष - विदर्भ मागासवर्गीय वसतीगृह संचालक मंडळ
उपाध्यक्ष - अखिल भारतीय काँग्रेस राजीव विचार मंच महाराष्ट्र प्रदेश
उपाध्यक्ष - युवक काँग्रेस मागासवर्गीय सेल
सचिव - महाराष्ट्र स्टेट मल्टीस्टेट सोशल ऑर्गेनाझेशन
संस्थापक - योगेश कुंभलकर स्पोर्टस ॲण्ड कल्चरल फाऊंडेशन नागपूर

# NAAC Peer Team Visit Dt. 18-19 Oct, 2022

## Kumbhalkar Collge of Social Work Wardha




नॅक पिअर टीमच्या सदस्या युनिव्हर्सिटी ऑफ दिल्लीच्या समाजकार्य विभाग प्रमुख प्रोफेसर डॉ. पामेला सिंगला, यांचे स्वागत करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंदू पोपटकर

नॅक पिअर टीमचे समन्वयक डिपार्टमेंट ऑफ टुरिझम स्टडीज, स्कूल ऑफ़ मॅनॅजमेण्ट, पोंडिचेरी युनिव्हर्सिटी, पोंडिचेरी चे प्रोफेसर संपदा कुमार स्वाईन यांचे स्वागत करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंदू पोपटकर







कुंभलकर कॉलेज ऑफ सोशल वर्क वर्धा येथे १८ व १९ ऑक्टोबर रोजी नॅशनल असेसमेंट अँड ऍक्रिटेशन कौन्सिल बेंगलोर तर्फ भेट देण्यात आली त्यावेळी नॅक पिअर टीमचे सदस्य महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंदू पोपटकर यांना अहवाल सादर करताना

नॅक पिअर टीमचे सदस्य महाविद्यालयाच्या सांस्कृतिक कार्यक्रम सादर करणाऱ्या विद्यार्थ्यांसोबत यावेळी उपस्थित प्राचार्य डॉ. चंदू पोपटकर, संस्थेचे अध्यक्ष मा. प्रकाशजी कुंभलकर, सचिव युगांतजी कुंभलकर



# आमचे श्रद्धास्थान





**स्व. कृष्णरावजी कुंभलकर (गुरुजी)**

**संस्थापक अध्यक्ष**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज टेक्निकल ॲण्ड
एज्युकेशन सोसायटी गणेशपेठ,
नागपूर

**स्व. लिलाबाई कृ. कुंभलकर**

**माजी अध्यक्षा**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज टेक्निकल ॲण्ड
एज्युकेशन सोसायटी गणेशपेठ,
नागपूर



**स्व.तुळशीरामजी शेंडे**

**माजी कोषाध्यक्ष**


राष्ट्रसंत तुकडोजी महाराज टेक्निकल ॲण्ड
एज्युकेशन सोसायटी गणेशपेठ,
नागपूर

## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज टेक्नीकल ॲण्ड एज्युकेशन सोसायटी, गणेशपेठ, नागपूर

### संचालक मंडळ



**मा. श्री. प्रकाशजी कुंभलकर**
अध्यक्ष



**मा. श्री. युगांत कुंभलकर**
सचिव



**मा. वनितातांई रेवतकर**
उपाध्यक्षा



**मा. रानी कुंभलकर**
सहसचिव



**मा.सोनाली वैद्य**
कोषाध्यक्ष



**मा.श्री. राजेशजी कुंभलकर**
संचालक



**मा. श्री. रविकांत मारपक**
संचालक




**युगांत योगेशजी कुंभलकर**
सचिव
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज टेक्निकल ॲण्ड
एज्युकेशन सोसायटी, गणेशपेठ नागपूर

# मनोगत

सामाजिक जीवन जगताना सामाजिक समस्यांची जाणीव व्हावी आणि ग्रामीण भागातून तळागाळातून सुजाण विचाराचे समाजकार्यकर्ते निर्माण व्हावे हा या महाविद्यालयाच्या उभारणीमागील प्रमुख हेतू होता. हिच उद्दिष्टये समोर ठेवून महाविद्यालयाची यशस्वी वाटचाल सुरू आहे. महाविद्यालयाच्या यशस्वी वाटचालीचा चढता आलेख बघतांना राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा वैशिष्टपूर्ण असा नावलौकीक या महाविद्यालयाने प्राप्त केलेला आहे. अशा या नावलौकीक प्राप्त महाविद्यालयाच्या  वार्षिकांकातून मनोगत व्यक्त करताना मला संस्थेचा सचिव या नात्याने आनंद होत आहे.

समाजामध्ये सुजाण कार्यकर्त्याची निर्मिती व्हावी म्हणून कुंभलकर  कॉलेज ऑफ सोशल वर्क, वर्धा शिक्षणाच्या बाबत नेहमीच अग्रेसर असते. याची प्रचिती महाविद्यालयाच्या नुकत्याच झालेल्या नॅक मूल्यांकनाच्या अहवालावरून दिसून आली. महाविद्यालयाने नॅक मूल्यांकनामध्ये सुद्धा + हे ग्रेट(CGPA 3.35) मिळवून जिल्ह्यामध्ये सर्वप्रथम मानाचा तुरा रोवला आहे. एवढेच नसून समाजकार्य महाविद्यालयामध्ये महाराष्ट्रातून पहिलं आणि देशातून तिसरं  ए प्लस दर्जा घेणारे महाविद्यालय ठरलेले आहे, त्याच बरोबर या वर्षी महाविद्यालयाला नॅशनल इन्स्टिट्यूशनल रॅन्कीग फेमवर्क (NIRF)  १०१ ते १५० या  रॅन्क बॅन्डमध्ये स्थान घेवून, दुहेरी यश प्राप्त केले. हि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज टेक्निकल अँड एज्युकेशन सोसायटी नागपुर या संस्थे करीता व कुंभलकर कॉलेज ऑफ सोशल वर्क वर्धा महाविद्यालयाकरीता अभिमानाची आणि गौरवाची बाब आहे...

त्यासाठी मी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंदू पोपटकर आणि शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचा मला सार्थ अभिमान आहे. महाविद्यालयात केवळ विद्यार्थ्यांना ज्ञानार्जनाचेच धडे दिले जात नाही तर सामाजिक आणि सांस्कृतिक शिक्षणाचे धडे देण्यात महाविद्यालय अग्रेसरच नाहीतर वर्तमानाचे सामाजिक आणि सांस्कृतिक भान सुद्धा महाविद्यालयातील विद्यार्थ्यांकडून जपले जाते. भारत हा कृषिप्रधान देश आहे. परंतु अतिवर्षन आणि अवर्षणामुळे कृषकाला आसमानी आणि सुलतानी संकटाचा  करावा लागणारा सामना आणि त्यातून येणाऱ्या नैराश्यामुळे कृषकाला आत्महत्या सारख्या कृतीला सामोरी जावे लागते याचे बोलके चित्रण महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी नॅक पिअर टीम समोर पथनाट्याच्या माध्यमातून सादर करून कृषी व्यवसायाची ढासळती परिस्थिती आणि प्रादेशिक लोककलेच्या बाबतीत विद्यार्थ्यांनी सादर केलेली पथनाट्य मनाला निश्चितच चटका लावून गेली. यात सहभागी सर्व विद्यार्थ्यांचे, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे मी मनःपूर्वक अभिनंदन करतो आणि त्यांच्या योगदानाबद्दल त्यांचे आभार व्यक्त करतो.

महाविद्यालये ही शिक्षणाची जशी केंद्रे असतात तशीच ती व्यक्तिमत्व निर्मितीच्या प्रयोगशाळाही असतात. कुंभलकर महाविद्यालय हे देखिल अशाच समाजकार्य शिक्षणाची प्रयोगशाळा असून या प्रयोगशाळेतून सामाजिक समस्यांची होत असलेली ऊकल व त्यातून जोपासत असलेली सामाजिक बांधीलकी हे सामाजिक आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे पाऊल आहे,  मला आशा आहे की, या प्रयोगशाळेतून बाहेर पडणारे समाजकार्यकर्ते समाजातील वाढत्या सामाजिक समस्येच्या तिव्रतेवरील उपाय ठरतील.

नव्या शतकातील ज्ञानविज्ञानाच्या आणि समाजविज्ञानाच्या असंख्य प्रश्नाशी भिडणारे नव्या उमेदिलचे तरूण मन महाविद्यालयाच्या  या वार्षिकांकातून अविष्कृत होताना बघून आनंद होत आहे. ही लेखनामागील नवी उमेद आणि उद्याच्या यशाचे प्रगल्भतेचे आश्वासन निश्चितच मला लाख मोलाचे वाटते. त्यासाठी मी  या  वार्षिकांकात सहभागी सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन करतो. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज टेक्निकल एज्युकेशन या संस्थेचे सर्व सन्माननीय सदस्य हे माझ्या पाठीशी खंबीरपणे उभे आहेत आणि सदैव मला मदत करत असतात त्यामुळे या महाविद्यालयाच्या गाडा अधिक ताकतीने पुढे नेण्यास मला मदत होत असते. तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य यांचे मिळणारे सहकार्य प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी नॅक च्या वेळेस  उल्लेखनीय कामगिरी केली आहे, याचा मला विशेष आनंद वाटतो. मी सर्व प्राध्यापक,शिक्षकेतर कर्मचारी यांचे अभिनंदन करतो व संस्थेचे माजी संस्थापक अध्यक्ष स्व. डॉ. योगेशजी कुंभलकर यांच्या पावन स्मृतीस  अभिवादन करतो..

वार्षिकांकातून  ज्या  नवोदित कवींनी, लेखकांनी आपले मनोगत व्यक्त केले आपल्या मनोगतातून आपल्या भावना व्यक्त केल्या त्या खरंच समाजभिमुख असणारच, त्यांच्या लेखनातून नक्कीच समाजातील इतर लोकांचे प्रबोधन झाल्याशिवाय राहणार नाही आणि म्हणून खरंच अशा सर्व विद्यार्थी व विद्यार्थिनी लेखकांचे मी मनापासून अभिनंदन करतो आणि या वार्षिकांकाला शुभेच्छा देतो.

धन्यवाद.....

## वार्षिकांक प्रकाशन सोहळा...




वार्षिकांकाचे ऑनलॉईन प्रकाशन करताना राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे डॉ. बबनराव तायवाडे, विधानपरिषद सदस्य ॲड. अभिजीत वंजारी, माजी आमदार श्री. अशोक धवड, जि.प. सदस्य श्री. साहील देशमुख, ओबीसी सेल राज्य कार्याध्यक्ष ईश्वरजी बाळबुद्धे, संस्थेचे सचिव युगांतजी कुंभलकर व इतर

## वार्षिकांक समिती

### सत्र २०२२-२३



**प्रा.डॉ. चंदू के. पोपटकर**
प्राचार्य



**प्रा.नरेश वा. पाटील**
संपादक वार्षिकांक समिती



**डॉ. पुनमकुमार येसंबरे**
सहायक संपादक



**प्रा. राजेश तांडेकर**
सहायक संपादक




**डॉ. चंदू के. पोपटकर**
प्राचार्य
कुंभलकर कॉलेज ऑफ सोशल वर्क, वर्धा

# संदेश

महाविद्यालयाचा वार्षिकांक हा विद्यार्थ्यांच्या लेखन कलागुणांचा खरा चेहरा आहे, आयुष्यात मागे वळून पाहताना त्यांनी त्यांच्या महाविद्यालयीन जीवनात कोणते भरीव लेखन कार्य केले त्याची ती स्मरणिका असते . गेल्या दोन वर्षापूर्वी संपूर्ण जगावर कोरोनाचे संकट उभे राहिले आणि त्यामध्ये देशातील संपूर्ण शिक्षण क्षेत्र ढवळून निघाले.शिक्षण क्षेत्रावर कोरोनाचा मोठ्या प्रमाणात प्रभाव झाल्याचा दिसून आला.त्याही प्रतिकूल परिस्थितीमध्ये तळागळातील विद्यार्थ्यांपर्यंत शिक्षण कशा पद्धतीने पोहचवता येईल हा प्रयत्न महाविद्यालयाच्या माध्यमातून करण्यात आला, महाविद्यालयामध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांकरीता अभ्यासाच्या बरोबरच त्यांच्या मनामध्ये असणाऱ्या सुप्त कलागुणांना वाव देण्याकरीता महाविद्यालयाने विद्यार्थ्यांना सतत प्रोत्साहित केले,

शैक्षणिक, सामाजिक,आर्थिक व सांस्कृतिक क्षेत्राला अनुसरून अनेक विद्यार्थ्यांनी लेख, कविता च्या माध्यमातून आपले विचार, भावना प्रकट केल्या अशा सर्व गुणवंत,कलावंत लेखक, कवी, ज्या ज्या विद्यार्थ्यांनी वार्षिकांक मध्ये आपले मत व्यक्त केले अशा सर्वांचे मी याप्रसंगी अभिनंदन करतो. समाजकार्य शिक्षण घेणारा विद्यार्थी हा समाजाला गती देणारा, समाजाच्या प्रति संवेदना जोपासणारा, सामाजिक भान स्वतःच्या मनात निर्माण करणारा आणि येणाऱ्या संकटावर समाजकार्य शिक्षणाच्या माध्यमातून पद्धतशीरपणे मात करणारा,निर्माण झालेल्या समस्यांना कशाप्रकारे सोडवता येईल याकरिता सतत प्रयत्न करणारा विद्यार्थी आम्ही घडवतो आहोत याचा मला सार्थ अभिमान आहे.

विद्यार्थी मित्रांनो कोरोनाचा काळ संपल्यानंतर आपण पुन्हा नव्या उमेदीने कामाला लागलो २०२२-२३ या वर्षी आपल्या महाविद्यालयाने मोठे शिखर गाठले ते म्हणजे नॅक मध्ये ए प्लस (CGPA 3.35 )दर्जा प्राप्त केला. आपल्या महाविद्यालयाच्या यशामध्ये एक मानाचा तुरा रोवल्या गेला. ए प्लस दर्जा प्राप्त करणारे महाराष्ट्रातील पहिले व भारतातून तिसरे समाजकार्याचे महाविद्यालय ठरले त्याच बरोबर नॅशनल इन्स्टिट्यूशनल रँकिंग फेमवर्क(NIRF )रॅन्क बॅन्ड१०१ ते १५० या रॅन्क बॅन्ड मध्ये स्थान मीळाले असे दुहेरी यश तुम्हा आम्हा सर्व समाजकार्याच्या क्षेत्राशी जुळून असणाऱ्या लोकांकरीता गौरवाची बाब आहे.

नॅक च्या प्रक्रियेमध्ये एवढे भव्य दिव्य यश संपादित करण्याकरीता ज्यांनी कष्टाची पराकाष्टा केली असे आपल्या संस्थेचे सचिव श्री युगांत कुंभलकर यांचा फार मोठा वाटा आहे त्याचबरोबर श्री प्रकाशजी कुंभलकर, वनितताई रेवतकर, श्री राजेश कुंभलकर व इतर संस्थांचे सर्व पदाधिकारी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विशेष म्हणजे आपण सर्व विद्यार्थी खऱ्या अर्थाने या ए प्लस दर्जाचे वाटेकरी आहात तुमच्या सहभागाशिवाय ते शक्य नव्हतं आपण नॅक समिती समोर ज्या सांस्कृतिक कार्यक्रमाची मेजवानी दिली सांस्कृतिक कार्यक्रमाच्या माध्यमातून महाराष्ट्रातील वेगवेगळ्या लोककला सांस्कृतिक कार्यक्रमाच्या रूपाने त्यांच्यासमोर सादर केल्यात ते खरच वाखाण्याजोगेच होते. त्याकरीता आपण सर्वांनीच भरभरून दाद मिळवली या सर्व सांस्कृतिक कार्यक्रमाकरीता ज्या ज्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला अशा सर्व विद्यार्थ्यांचा व इतर आपल्यासारख्या सर्व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे सुद्धा विशेष आभार व अभिनंदन...

आमची दृष्टी ही विद्यार्थ्यांमध्ये जागृकता निर्माण करणे योग्य प्रकारच्या सामाजिक मुल्यांकनास प्रवृत्त करणे आणि विद्यार्थ्यांमध्ये कर्तव्याची क्षमता वाढविणे ही आहे. आमचे ध्येय म्हणजे समाजातील सामाजिक आव्हाने आणि व्यावसायिक ज्ञान स्विकारण्यासाठी आवश्यक कौशल्ये आणि क्षमता कशा वाढविता येईल यावर सतत भर देत असतो आणि म्हणूनच या ही वर्षी सुद्धा महाविद्यालयाच्या माध्यमातून शिक्षणाच्या व्यतिरिक्त बाह्य सामाजिक गरजा जोपासून लोकांची, व विद्यार्थ्यांची शैक्षणिक सामाजिक सांस्कृतिक व लेखन कलेची काळजी कशी घेता येईल याकरिता सातत्याने प्रयत्न करीत राहिलो, व पुढेही निरंतर करत राहू. मला अत्यानंद होत आहे की सांस्कृतिक व सामाजिक विचारांचा अधिष्ठान असणारा या वार्षिकांकामध्ये विद्यार्थ्यांनी आपल्या भावना मनोगतातून, लेखनातून, कवितेतून सादर केलेल्या आहेत त्या नक्कीच खूप सुंदर आणि छान मांडणी केलेल्या आहेत मला पूर्ण खात्री आहे की भविष्यामध्ये या माध्यमातून अनेक नवोदित कवी लेखक साहित्यिक निर्माण होण्यास हा वार्षिकांक महत्त्वपूर्ण व उपयोगी ठरेल...आपण सर्वांनी वार्षिकांक वाचावा आमच्या विद्यार्थ्यांनी आपले विचार या माध्यमातून प्रकट केलेत,त्यावर दाद द्यावी, त्यांचे मनापासून अभिनंदन करावे एवढीच आपणा सर्वांकडून अपेक्षा करतो व आपणासमोर हा वार्षिकांक सादर करतो..

या वार्षिकांकाची निर्मिती करीता आमच्या संस्थेचे सन्माननीय सचिव युगांतजी कुंभलकर संचालक राजेशजी कुंभलकर यांच्या प्रेरणेतून व मार्गदर्शनातून तयार झालेला आहे त्यांचे मी मनपूर्वक आभार व्यक्त करतो, तसेच वार्षिकांकाचे संपादकीय मंडळ यांनी अत्यंत परिश्रमातून हा वार्षिकांक तयार केला त्या करीता मी त्यांचे अभिनंदन करतो. या वार्षिक अंकामध्ये प्रसिद्ध झालेल्या सर्व लेखक, कवी, विद्यार्थी लेखकांचे मनःपूर्वक अभिनंदन करतो.

या संस्थेचे प्रेरणा स्त्रोत स्वर्गीय डॉ.योगेशजी कुंभलकर यांच्या स्मृतीस अभिवादन करून या वार्षिकांकास शुभेच्छा देतो....



**प्रा. नरेश वा. पाटील**
सहायक प्राध्यापक
संपादक, वार्षिकांक समिती

# संपादकीय....

महाविद्यालयीन वार्षिकांकाचे संपादकीय लिहिताना मला अत्यंत आनंद होत आहे. महाविद्यालय हे विद्यार्थी घडविणारे केंद्र असते. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा यासाठी महाविद्यालय स्तरावर वार्षिकांकाच्या रूपाने त्यांना प्लेटफॉर्म उपलब्ध करून दिला जात असते. महाविद्यालयीन नवोदित कवी, लेखकांनी भविष्याचे भान ठेवून वर्तमानात आपल्या लेखणीला समृद्ध करून आपल्या हातून सर्जनशील साहित्याची निर्मिती कशी करता येईल /होईल याचे सदैव भान ठेवणे गरजेचे आहे.

कुंभलकर समाजकार्य महाविद्यालयाने समाजकार्य शिक्षणाच्या बाबतीत आपला नावलौकिक प्राप्त केला आहे. नॅक नामांकनामध्ये 'ए' प्लस दर्जा मिळणारे समाजकार्याचे शिक्षण देणारे कुंभलकर कॉलेज ऑफ सोशल वर्क, वर्धा हे राज्यात पहिला आणि देशात तिसरा क्रमांक पटकविणारे समाजकार्याचे महाविद्यालय असून दिवसेंदिवस मानाचा एक एक तुरा रोवत पुढे जात आहे. याचेच एक उदाहरण म्हणजे छखठऋ आता राष्ट्रीय संस्थात्मक रँकिंग फ्रेमवर्क मध्ये राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातून रँकिंग मध्ये असणाऱ्या केवळ दोन महाविद्यालयापैकी कुंभलकर कॉलेज ऑफ सोशल वर्क वर्धा या महाविद्यालयाचा समावेश आहे. अशा पद्धतीने या महाविद्यालयाच्या प्रगतीचा चढता आलेख मांडताना आम्हा शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची मान अभिमानाने उंच होते.

शैक्षणिक, सामाजिक,आर्थिक व सांस्कृतिक क्षेत्राला अनुसरून अनेक विद्यार्थ्यांनी लेख, कविता च्या माध्यमातून आपले विचार, भावना प्रकट केल्या अशा सर्व गुणवंत,कलावंत लेखक, कवी, ज्या ज्या विद्यार्थ्यांनी वार्षिकांक मध्ये आपले मत व्यक्त केले अशा सर्वांचे मी याप्रसंगी अभिनंदन करतो. समाजकार्य शिक्षण घेणारा विद्यार्थी हा समाजाला गती देणारा, समाजाच्या प्रति संवेदना जोपासणारा, सामाजिक भान स्वतःच्या मनात निर्माण करणारा आणि येणाऱ्या संकटावर समाजकार्य शिक्षणाच्या माध्यमातून पद्धतशीरपणे मात करणारा,निर्माण झालेल्या समस्यांना कशाप्रकारे सोडवता येईल याकरिता सतत प्रयत्न करणारा विद्यार्थी आम्ही घडवतो आहोत याचा मला सार्थ अभिमान आहे.

विद्यार्थी मित्रांनो वार्षिकांक हा तुम्ही व्यक्त केलेल्या विचारांचा आरसा आहे. तुम्ही विद्यार्थीदशेमध्ये शिक्षण घेत असताना शिक्षणासोबतच आपल्या अवतीभवती घडत असणाऱ्या घटनांना, समस्यांना समजून घेऊन त्या समस्यांवर कशी मात करता येईल त्याला कसे सामोरे जाता येईल याचा अभ्यास केला गरज पडली तेथे आमचे मार्गदर्शन घेतले आणी आपण ते करून दाखवलं. हे खऱ्या अर्थाने समाजकार्यात शिक्षण घेणारा एक समाज कार्यकर्ताच करू शकतो..आपण आपल्या लेखनाच्या माध्यमातून ज्या विविध सामाजिक,शैक्षणिक साहित्यीक, आर्थिक, सांस्कृतिक स्थितीवर जे लेखन केलेले आहे ते लेखन सुद्धा माझ्याकरिता तेवढेच महत्त्वपूर्ण आहे हे केवळ काल्पनिक लेखन नसून आपण अंतर्मनातून प्रकट केलेल्या भावनांची, अभिव्यक्तीची पोचपावतीच आहे, आणि म्हणून आपण सर्वच अभिनंदनास पात्र आहात..

सदर वार्षिकांकाच्या निर्मिती प्रक्रियेत संस्थेचे सचिव युगांतजी कुंभलकर तथा महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. चंदू पोपटकर याचे मौलीक मार्गदर्शन लाभले. संपादन / मार्गदर्शन मंडळातील प्राध्यापकांच्या संपादकाच्या विदयार्थी आणि लेख सहकार्यातून व कल्पकतेतून हा संकल्प वार्षिकांक आकारास आलेला आहे. यासोबतच महाविद्यालयाचे अधीक्षक श्री. राजेश कुंभलकर सर व समिती सदस्य म्हणून डॉ पुनम येसंबारे व प्रा. राजेश तांडेकर यांचे सहकार्याने आणि सर्व विद्यार्थी लेखक मित्राच्या सहायाने वा वार्षिकांकाची निर्मिती झाली आहे.

या सर्वांचे मी मनपूर्वक अभिनंदन करून हा संकल्प अंक आपणास सुपूर्द करीत आहे.

राष्ट्रीय मूल्यांकन एवं प्रत्यायन परिषद

विश्वविद्यालय अनुदान आयोग का स्वायत्त संस्थान

NATIONAL ASSESSMENT AND ACCREDITATION COUNCIL

An Autonomous Institution of the University Grants Commission

# Certificate of Accreditation

The Executive Committee of the

National Assessment and Accreditation Council

is pleased to declare

Kumbhalkar College of Social Work

Kakawadi, Dist. Wardha,

affiliated to Rashtrasant Tukadoji Maharaj Nagpur University, Maharashtra as

Accredited

with CGPA of 3.35 on four point scale

at A+ grade


valid up to October 25, 2027

Date : October 26, 2022

Director

EC(SC)/128/2nd Cycle/MHCOGN11523

यावे ज्ञानासाठी... निघावे सेवेसाठी



# संकल्प

## वार्षिकांक २०२२-२३

**राष्ट्रसंत तुकडोजी महाराज टेक्निकल अॅण्ड एज्युकेशन सोसायटी, गणेशपेठ, नागपूर**

द्वारा संचालित

# कुंभलकर कॉलेज ऑफ सोशल वर्क, वर्धा

## VISION AND MISSION OF THE COLLEGE

**VISION**

To be the best in class and nurture socially responsible leader.

**MISSION**

- To prepare social work professionals with the knowledge, social values and skills needed to initiate, innovate and bring sustainable change.
- To provide an platfrom that encourgae young people to learn to think, innovate and solve grassroot challenges.
- To promotes individual dignity, respects diversity and peace.
- To cultivate an atmosphere of intellectual discipline that facilitates faculty and student scholarship and research that contributes to the knowledge base of the profession and improves society's understanding to stand the world competition.

## संकल्प
### वार्षिकांक २०२२-२३


- प्रकाशक
  **प्राचार्य डॉ. चंदु के. पोपटकर**
  कुंभलकर कॉलेज ऑफ सोशल वर्क
  काकावाडी, सेवाग्राम रोड, वर्धा ४४२००१

- NAAC ACCREDITED
  E-mail : www.kcswwardha@rediffmail.com

- संपादक
  **प्रा. नरेश वासुदेव पाटील**
  (सहाय्यक प्राध्यापक)

- सहायक संपादक
  **प्रा.डॉ. पुनम येसंबरे**
  **प्रा. राजेश तांडेकर**

- प्रकाशन दिनांक : १ ऑगस्ट २०२३

- अक्षरांकन
  सीवली ग्राफीक्स, नागपूर, मोबा. ७७२१८०९२५०

- मुद्रक
  वंश क्रिएशन, नागपूर, मोबा. ९५९५७२७६१४


सदर वार्षिकांकात प्रकाशित मते व विचार त्या त्या विद्यार्थी लेखकाचे असून त्यांच्याशी प्रकाशन, संपादक, महाविद्यालयाचे प्राचार्य, वार्षिकांक समीती सदस्य जबाबादार राहणार नाही.

## अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| लोकशाही आणि निवडणूक | कु. रेश्मा म. मानकर | 3 |
| युवा मतदार आणि राजकीय जाणीव जागृती | कु. नेहा अ. दैवलकर | 5 |
| ती नाही तो नाही मग कोण? | कु. प्राप्ती दि. कामडी | 8 |
| मोबाईल गेम अणि तरूण | ओम बेलकर | 10 |
| नवयुगाच्या समस्या | | 11 |
| आमच्या भारताचे संविधान | कु. रानि के. मेश्राम | 12 |
| युवा मतदार आणि राजकीय जाणीव जागृती | कु. मोनाली दि.घसाड | 14 |
| जीवनाचा प्रवास | | 16 |
| यशाचा मार्ग | कु. आश्विनी रा. कामीनकर | 17 |
| युवकाची लोकशाही विकासातील भुमिका | कु. प्रिती दि. कामडी | 19 |
| तरुण मतदार आणि निवडणुका | कु. श्रद्धा म. बैले | 21 |
| मी मताधिकार बजावणार काय | कु. प्राची पु. वाघ | 24 |
| ग्रामीण समाजकार्य शिबिर अहवाल | | 25 |
| विविध समित्याचे अहवाल सत्र 2022-23 | | 26 |


### कविता


| | | |
|---|---|---|
| मित्रता | | 7 |
| तुझी साथ | कु. प्रियंका मेश्राम | 7 |
| आयुष्य | | 15 |
| जिन्दगी | कु. उन्नती कामडी | 24 |
| बाप | ओम बेलकर | 18 |
| एक खुबसूरत सोच | | 18 |
| Social Worker Means | Ku. Yamini Gawande | 20 |
| Rape | Ku. Neha A. Daiwalkar | 20 |
| My First Day at The College | Ku. Shraddha M. Baile | 23 |
| You Know What….. | Ku. Seema Khursange | 23 |
| Without You….. | Ku. Unnati Kamdi | 23 |

# लोकशाही आणि निवडणूक

**रेश्मा मधुकरराव मानकर** (एम.एस.डब्ल्यु भाग-२)

**'' मतदारांनो जागरूक व्हा, मतदान करा ''**
**'' राज धर्माच्या रक्षणासाठी हे शुभ दान करा ''**

भारत हा जगातील सर्वात मोठा देश आहे. स्वांतत्र प्राप्तीनंतर लोकशाहीच्या माध्यमातून जनतेच्या आशा आंकांशाची पुर्तता करण्याचे अनेक स्तरावर प्रयत्न करण्यात आले. 'जनतेचे राज्य' ही संकल्पना स्विकारूण जनतेने निवडून दिलेल्या प्रतीनिधिाच्या माध्यमातून राज्य चालविले जात आहे.

योग्य निर्णय प्रक्रियेद्वारे देशाला प्रगतीच्या वाटेवर पुढे नेता यावे यासाठी जनतेने निवडलेले प्रतीनिधी सक्षम असणे गरजेचे आहे. आणि त्यासाठी मतदारांनी निर्भयपणे तसेच विचारपुर्वक मतदान करणे तेचवढेच आवश्यक आहे.

या दृष्टीने मतदारांमध्ये जागृती निर्माण करण्यासाठी निवडणूक आयोगातर्फे धडक कार्यक्रम राबविला जातो. तसेच नवीन मतदारामध्ये निवडणूक प्रक्रियंविषयी माहिती व्हावी या करीता राष्ट्रीय मतदार दिवसाच्या निमीत्याने विविध उपक्रम राबविले जातात. निवडणूका हा लोकशाही प्रक्रियेचा कणा आहे.

विषेशत: निवडणूकामध्ये स्थानिक स्तरावरील समस्यांची सोडवणुक करण्यासाठी मतपेटीच्या माध्यमातून योग्य प्रतिनिधी निवडणे आवश्यक आहे. यावर साामाजिक विकास अवलंबून असते.

यासाठी मुक्त आणि निर्भय वातावरणात मतदारांनी मतदान करायला हवे निवडणूकांच्या वेळी कोणत्याही प्रलोभनाला कींवा दबावाला बळी न पडता आपल्या मताधिकाराचा उपयोग करायला हवा.

योग्य पध्दतीने केलेले मतदान म्हणजेच आपल्या हक्काचे रक्षण करण्याच्या दृष्टीने टाकलेले पहीले पाउल असते. हे नेहमी लक्षात ठेवायला हवे. भारत देशातील लोकशाही ही जगातील सर्वात माठी लोकशाही आहे. जिथे प्रत्येक प्रौढ नागरीकाला आपले मत वापरायची मुभा आहे.

सरकार बनवण्यात देशातील प्रत्येक मतदाराची भुमिका महत्वाची असते. सरकार बनवण्यासाठी प्रत्येक मत अमुल्य आहे. १ – १ मतांनी सरकार बनते आणि पडते. त्यामुळे प्रत्येकाने न्याय पध्दतीने मतदान करूण राष्ट्र उभारणीत आपला सहभाग सुनिश्चित करावा. तसेच देशाच्या विकासासाठी सक्षम व्यक्तीच्या निवडीस सहकार्य करावे. जेणेकरूण आपला देश प्रगतीच्या नवनविन शिखरांना सतत स्पर्श करू शकेल. आपल्या भारत देशात प्रत्येक नागरीकाला मतदानाचा अधिकार आहे.

मतदार आपल्या मताचा वापर करूण राष्ट्राच्या उभारणीत आणि विकासात पुर्ण सहकार्य करू शकतात. देशातील प्रत्येक प्रौढ नागरीकाने प्रत्येक निवडणूकीत आपल्या मताचा वापर केला पाहीजे. कारण प्रत्येक मताने देशाचे भवितव्य घडवण्यात सहभागी होते.

भारतासारख्या लोकशाही देशात, प्रत्येक नागरीकाला मतदानाचा अधिकार आहे. जो एक हक्क आहे. ज्या अंर्तगत प्रत्येक जण त्यााच्या मतांवर इतरांशी सहमत आणि असहमत होऊ शकतो. लोकांसमोर कल्पना आणि अजेडा सादर करणे.

दुसरीकडे ज्या उमेदवाराच्या अजेंडयावर सर्वाधिक लोक सहमती दर्शवतात आणि सर्वाधिक मतदान करतात. तोस उमेदवार लोकप्रतीनिधी म्हणून निवडून येतो. आणि देशाच्या सर्व विकासकामाची जबाबदारी घेतो.

त्यामुळे प्रत्येक नागरिकाने आपल्या मताधिकाराचे महत्व समजून घेवून असा प्रतीनिधी निवडण्यासाठी सहकार्य केले पाहीजे. जो प्रतिनिधी नि:पक्षपातीपणे आणि कोणताही भेदभाव न करता देशाच्या विकासात सहकार्य करेल आणि लोकांच्या हितासाठी आणि त्यांच्या विकासासाठी कार्य करेल.

विचार करा आपला भारत देश हा लोकशाही देश आहे. जीथे प्रत्येक प्रौढ नागरीकाला आपले मत वापरण्याचा आधिकार आहे. म्हणूनच प्रत्येक नागरीकाने आपल्या मताचा वापर केला पाहीजे. कारण कोणत्याही देशाचा मतदार देशाच्या विकासाचे चित्र ठरवितो.

त्यामुळे सरकार स्थापणेत पाठिंबा देणे ही देशातील प्रत्येक प्रौढ नागरिकांची जबाबदारी आहे. आपल्या देशातील लोकशाहीत व्यवस्थेत दर पाच वर्षानी निवडणूका घेण्याची तरतुद आहे.

देशात विविध प्रकारच्या निवडणूका घेतल्या जातात. जसे की विधानसभा, लोकसभा, महामंडळाच्या निवडणूका इत्यादी. पण यात सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे सगळया निवडणुका लोकांच्या सहभागाणेच होतात. म्हणजे देशाचं, राज्याचं, शहराच, गावाचं भवितव्य जनता ठरविते. केंन्द्र किंवा राज्य सरकार जनताच बनविते.

त्याचप्रमाणे भारतातील सर्व २९ राज्यांच्या निवडणुकामध्ये राज्यातील प्रत्येक प्रौढ नागरीक आपल्या माताचा वापर करूण राज्याच्ये सरकार निवडण्यात आपली भुमिका बजावतो. राज्यात झालेल्या विकासकामाची जबाबदारी राज्यसरकारची असून राज्यातील प्रत्येक नागरीकांच्या भल्यासाठी काम करते.

अशाप्रकारे प्रत्येक मतदाराने देशहीतासाठी मतदान करणे अत्यंत गरजेचे आहे. कारण मतदानासारखे शक्तीशाली शस्त्र वापरूण आपण कोणतेही सरकार पाडू शकतो. आणि स्थापणही करू शकतो. सध्या आपल्या देशात काही वर्षात मतदानाची टक्केवारी वाढली आहे.

म्हणजेच मतदानाबाबत बरीच जागृती झाली आहे. परंतु आजही असे लोक आहेत की, ज्यांना मतदानाचे महत्व कळत नाही. आणि ते मतदान प्रक्रीयेत भाग घेण्यात योगदान देत नाहीत सरकार देशात अशात काही लोकांमुळे चुकीचे लोकप्रतीनिधी निवडले जातात. आणि देशाचा विकास योग्य पध्दतीने होत नाही. कारण जेव्हा जास्त लोक आपल्या माताचा वापर करातील तेव्हाच आपल्याला योग्य प्रतीनिधी निवडण्यास मदत मिळेल त्यामुळे कोणत्याही लोकशाही देशासाठी मतदानाला अत्यंत महत्व असते. कारण मतदानामुळे लांकांना देशाचे भवितव्य घडवण्यात हातभार लावण्याची संधी मिळतेच पण लोकांचे कल्याणही होते.

त्यामुळे प्रत्येक नागरिकाने मतदान करून आपले मुलभुत कर्तव्य बजावले पाहीजे. वयाच्या १८ वर्षानंतर भारतातील प्रत्येक नागरीकाने आपले मतदान करण्यासाठी मतदार यादीत आपल नांव नोदविले पाहीजे आणि सरकारी पक्षाचे वैध ओळखपत्र सोबत बाळगावे.

देशाचे भवितव्य घडवण्यासाठी मतदाराने आपला मतदानाचा हक्क बजावण्यासाठी आधि आपले नांव मतदार यादीत आहे की नाही हे तपासावे. मतदान करण्यासाठी मतदान केंन्द्रावर जातांना लक्षात ठेवा की तुम्ही तुमची मतदार स्लिप किंवा मतदार ओळखपत्र सोबत ठेवावे.

दुसरीकडे जर तुम्हाला व्होटर स्लिप मिळाली नसेल तर तुम्ही मतदान केंन्द्रावर उपस्थित असलेल्या बि.एल.ओ कडुन डूप्लीकेट व्होटर स्लिप मागू शकता. देशातील प्रत्येक नागरीकाला मतदानाचे महत्व कळावे यासाठी दरवर्षी २५ जानेवारी रोजी राष्ट्रिय मतदार दिवस साजरा केला जातो.

देशात होणाऱ्या निवडणूकीस आपल्या देशातील प्रौढ निवडणूकीचा सहभाग वाढावा यासाठी भारत सरकारने २०११ पासून २५ जानेवारी हा दिवस मतदार दिन म्हणून घोषित केला आहे. मतदार दिन साजरा करण्यामागचा मुख्य उददेश म्हणजे देशातील नागरीकांना आपल्या मतांचा वापर करण्याबाबत जागरूक करणे, जणे करूण योग्य प्रतिनिधी निवडता येईल. आणि देशाचा विकास योग्य दिशेने होवू शकेल.

आपणास सांगूया की देशात कोणत्याही भेदभावाशिवाय निष्पक्ष , परादर्शकता, आणि प्रामाणिकपणे निवडणुका पार पाडण्यासाठी भारतीय निवडणुक आयोगाची स्थापणा २५ जानेवारी १९५० रोजी करण्यात आली होती.

यानंतर २०११ मध्ये भारत सरकारने निवडणुकीत लोकांचा सहभाग वाढवण्याच्या उददेशाने हा दिवस राष्ट्रिय मतदार दिवस म्हणुन घोषित केला तेव्हापासुन हा दिवस राष्ट्रिय मतदार दिवस म्हणुन साजरा केला जातो.

राष्ट्रीय मतदार दिनानिमीत्य अनेक सरकारी, निमसरकारी आणि सामाजिक संस्थाद्वारे विविध कार्यक्रमाचे आयोजनही केले जाते. जेणेकरूण देशातील लोक राजकीय प्रक्रियेत त्यांचा सहभाग सुनिश्चित करू शकतील. आणि योग्य प्रतीनिधी निवडू शकतील.

**''सबको प्रेरीत कर चलो, करना मतदान!**
**''मत के बल पर सरकार है, लोकतंत्र की शान !!**
धन्यवाद

■■■■

# युवा मतदार आणि राजकीय जाणीव जागृती

**कु. नेहा अ. दैवलकर** (एम.एस.डब्ल्यु भाग-२)

**प्रस्तावना**

भारतातील राजकारणाची विशेषत: निवडणूकीत राजकारणाची बंहुतांश चर्चा ही राजकीय जातींच्या भेदरेषांच्या संदर्भाने होते. १९९० च्या दशकाच्या मध्यावर इतर मागासवर्गियांच्या (ओ.बी.सी.) अभिसरंच्या अनुषगांने आणि अलिकडे दलितांच्या संदर्भाने ही चर्चा होते. अनेक तज्ञांनी जातीच राजकारण आणि त्याचा निवडणूकीय राजकारणावर होणारा परीणाम यावर अधिक लक्ष केंन्द्रीत केले आहे. ख्रिस्तोफर जेफरलॉट, सुधा पै, कांचन चन्द्र, प्रदीप चिन्नर यांनी जात आणि निवडणूकीय राजकारण या विषयाच्या संदर्भाने प्रदीर्घ संशोधन केले आहे. आणि जातीच्या उदय अस्मितेच्या राजकारणामुळे बदललेले पक्षीय राजकारण आणि भारतातील निवडणूकीय स्पर्धा यावर लक्ष केंन्द्रीत केले आहे. यासह भारतातील राजकारणातील स्त्रियांवर लक्ष केंन्द्रीत केले आहे. पुरूषापेक्षा स्त्रियांची मत वेगळी आहे का? या संदर्भाने मथंन झाले. जर स्त्रियांची मत हा घटक राष्ट्रीय पातळीवर नसला तर त्या राज्यात स्त्रियांनी सर्वोच्च पद प्राप्त केली, स्त्रिया मुख्यमंत्री झाल्या त्या ठीकानी स्त्रियांची मत वेगळया प्राकरची आहेत काय? असाही अभ्यास केल्या गेलेल्या अनेक तज्ञांनी ग्रामिण — शहरी आयामावर आणि त्यांच्या मतदान प्रवाहावरील परीणाम यावर लक्ष केंन्द्रीत केले.

मात्र युवा मतदार वर्ग एक राजकीय घटक म्हणुन त्याचा राजकीय रस त्यासंबधिचे विश्लेषन क्वचीतच केले गेले. २००९ च्या लोकसभा निवडणुकीनंतर विविध विधानसभा निवडणुकांमध्‌ ये युवा वर्गाचा राजकारणातील रस वाएत असल्याचे दिसुन आले. छापील आणी इलेक्ट्रानिक माध्यमांनी २००९ लोकसभा निवडणुकांचे बऱ्यापैकी वृत्तांकन करतांना भारतीय राजकारणातील युवा वर्गावर लक्ष केंन्द्रीत केले.

**तुमचे मत तुमचा अधिकार**

राष्ट्रीय मतदार दिवस दरवर्षी २५ जानेवारी रोजी भारतभर साजरा केला जातो. हा दिवस प्रत्येक मतदारासाठी, नागरीकांसाठी अतिशय महत्वाचा आहे. या दिवशी भारतातील प्रत्येक नागरीकांनी आपल्या देशाच्या प्रत्येक निवडणूकीत सहभागी होवून आपली जबाबदारी पार पाडण्याची शपथ घ्यावी. कारण भारतातील प्रत्येक मतदारांचे मत देशाच्या भवितव्याचा पाया घालते. म्हणुन प्रत्येक व्यक्तीचे मत राष्ट्र निर्मीतीत अमुल्य आहे. जगातील भारतासारख्या सर्वात मोठया लोकशाही मध्ये मतदानासंदर्भात घसरणारा कल पाहता मतदारमध्ये जनजागृती करण्यासाठी राष्ट्रीय मतदार दिवस साजरा केला जातो. भारतात होणारी प्रत्येक निवडणूक चांगल्या पध्दतीने पार पाडण्याची जबाबदारी भारतीय निवडणूक आयोगाची आहे. भारतीय निवडणूक आयोगाची स्थापना २५ जानेवारी १९५० रोजी झाली. दिवसेदिवस मतदारा विषयी वाटणारी उदासिनता व मतदानाची घसरणारी शेकडेवारी यामूळे निवडणूकीत लोकांचा सहभाग वाढवण्याच्या दृष्टीने सन २०११ पासुन निवडणूक आयेगाने २५ जानेवारी हा दिवस ''राष्ट्रीय मतदान दिन'' म्हणुन साजरा करण्यास सुरूवात केली. देशाच्या राजकीय प्रक्रियेत जास्तीत जास्त लोकांनी सहभाग घ्यावा व मतदारांना आपल्या मतदानाच्या कर्तव्याची जाणीव व्हावी यासाठी शासनाकडून व विविध सामाजीक संस्थाकडून ज्या दिवशी मतदार जागृतीसाठी अनेक कार्यक्रम आयोजित केले जातात. मतदार जनजागृती रॅली काढली जाते. त्यातून नागरीकांना राष्ट्राप्रति असलेल्या त्यांच्या कर्तव्याची आठवन करुण दिली जाते. या उद्ष्ठिपूर्तीसाठी तसेच देशात निपक्ष निवडणूका घडवून आणून भारतीय लोकशाही अधीक बळकट करण्यासाठी भारतीय निवडणूक आयोगाचे हे महत्वपुर्ण योगदान आहे. आज राष्ट्रीय

मतदार दिनासच्या निर्मीत्ताने देशातील प्रत्येक मतदाराने आपल्या सक्रीय सहभागाच्या आधारे आपली संविधानिक जबाबदारी पार पाडून लोकशाही मजबूत करण्याचा प्रयत्न संकल्प/केला पाहीजे. याविषयी एवढेच म्हणवेसे वाटते, ''मतदार राजा जागा हो लोकशाहीचा धागा हो''

**जागृत मतदार**

आम्ही गोधळी गोधळी ... आम्ही जागरुक गोधळी
आमचा आम्ही घालावा गोंघळ आणी
वाजवू प्रबोधनाचे संबळ
नको हक्काची आढाळ ....मतदानाची इच्छा करा प्रबळ
लोकशाहीच्या मार्गाने चला ... नाही म्हणू नका मतदानाला
अंगीच्या घालून दकंटाळा ... मतदानाची वेळ निट पाळा
दुसर काम तातपुरत ठेवा बाजुला,
सगळया मतदारांना घ्या संगतीला
निर्भयपने करा मताचे दानकृनेता निवडा आपल्या मतान
मतदानाबाबत नको उदासिनता....
लोकशाहिची जपूया महानता

असा गोंधळ कानावर पडला आणि चालणारी पाऊल एकदम थबकली. मतदानासाठी आवाहन करणारा हा आगळा वेगळा गोधळ नक्कीच लोकांच्या मनाला भवुन जात होता म्हणून हया गोंघळा भोवती भली मोठी गर्दी जमली होती. राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालय २५ जानेवारी २०१२ ला दुसरा राष्ट्रीय मतदार दिवस साजरा केला आहे.

या पार्श्वभूमीवर मतदानाचा मुलभूत अधिकार बजावण्याचे आवाहन करणारा हा गोधळ आणि या माध्यमातून करण्यात येणारी जनजागृती निश्चितच लक्षवेधी ठरत होती.

निवडणुका आल्या की मतदार यादीत नाव नसणं नावात—रहिवाशी पत्यात चुका असण किवा बदल झालेला असण छायाचित्र ओळखपत्र नसणं यासारख्या अनेक तक्रारी आपल्याला ऐकायला मिळतात. पण त्यासाठी मतदार म्हणूण आपण स्वत: किती दक्ष असतो, आपल्या नावातील पत्यातील बदल सुधारणा करुण घेण्यास आपण किती प्रयत्न करतो हे जमजून घेणे जितके महत्वाच आहे. तितकेच आपण पात्र असतांना मतदानाचा हक्क बजावूनही जी व्यक्ती वयाची १८ वर्षे पुर्ण करते त्या व्यक्तीला राज्यघटनेने दिलेल्या मतदानाच्या मुलभूत हक्कांची आपण कितीजन अंमलबजावणी करतो ? हे वेगळे सांगायची गरज नाही. मतदानाच्या टक्केवारी वरुन हे वेळोवेळी स्पष्ट झालेले आहे. मतदानाचा मुलभूत अधिकार बजावावा आणि मतदानाला न जाण्याची व मतदान न करण्याची उदासीनता मनातून काढून टाकावी यासाठी विविध माध्यमातून सातत्याने जनजागृती केली आसते.

टवजम देणे अधिकार पण आहे
टवजम देणे कर्तव्य पण आहे.

तरुणांना आपण देशाचा आधारस्तंभ मानतो याचा आधार स्तंभाने पुढे येऊन मतदान प्रक्रियेत सहभागी व्हाव समृध्द सशक्त लोकशाहीचा पाया अधिक मजबुत करावा यासाठी निवडणूक आयोगाने प्रत्येक वर्षी २५ जानेवारी हा दिवस राष्ट्रीय मतदार दिवस म्हणून साजरा करण्याचके निश्चित केले आहे. लोकसभा, विधानसभा आणि स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकामध्ये महिला आणि युवकांचे मतदानाचे प्रमाण वाढावे, त्यांनी पुढे येऊन निर्भयपणे मतदाराचा आणि घटनेने दिलेल्या मूलभूत अधिकाराचा वापर करावा या उदेशाने महिला आणि युवकांना समोर ठेवून विशेष जनजागृती कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे. राज्य मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने या दृष्टीने एक विशेष जनजागृती मोहिम हाती घेतली आहे. मतदार असल्याचा अभिमान, मतदानासाठी सज्ज, जागृत मतदार, समुध्द लोकशाहीचा आधार, तुमचे मत तुमची निर्णयशक्ती, लोकशाहीच्या बळकटीकरणांसाठी युवकांचा सहभाग अशा प्रोत्साहनात्मक स्वरुपात मोहीम राबविण्यात येत असून निवडणूक प्रक्रियेत सक्रिय सहभागी होण्याबद्द्ल आव्हान करण्यात आले आहे. यासाठी विविध प्रसार माध्यमाचा उपयोगही करुण घेण्यात आला आहे. १८ ते १९ वयोगटातील मतदारांना त्यांचे नाव मतदार यादीत समाविष्ट करण्यासाठी एक विशेष माहीती देखील या निमित्ताने देण्यात आली.

ज्या मतदाराचा जन्म दिनांक १ जानेवारी १९९२ ते १ जानेवारी १९९४ या दरम्यान आहे, अशा १८ ते १९ या वयोगटातील मतदारांना त्यांचे मतदार यादीत नाव समाविद्रट करण्याची विशेष संधी यानिमित्याने करुण देण्यात आली आहे यासाठी मतदार नोंदणीचा नमुना अर्ज क्र ०६ रंगीत छायाचित्र मतदार नोदणी अधिकारी आणि सहायक मतदार नोंदणी यांच्या

कार्यालयात सादर करणे आवश्यक होते. ज्या पात्र तरुण नागरीकांनी त्यांचे नाव मतदार यादीत नोंदविले नसेल त्यांनी त्वरीत मतदार नोंददणी करावी आणि दि. २५ जानेवारी २०१२ या '' राष्ट्रीय मतदार दिवस'' कार्यक्रमात छायाचित्र, मतदार ओळखपत्र प्राप्त करुण घ्यावे असे आव्हाण या निमित्ताने करण्यात आले होते.राज्यात आजमितीस एकुण ७ कोटी ८७ लाख २१ हजार ४७२ नोंदणीकृत मतदार आहेत यामध्ये ४ कोटी १४ लाख ७५ हजार ३६० एवढे पुरुष तर ३ कोटी ७२ लाख ४५ हजार ८४२ महिला मतदार आहेत. यापैकी ८२.३४ टक्के मतदारांना त्यांचे छायाचित्र वाटपाचे काम पुर्ण झाले आहे.

भारतामध्ये संविधानाने एकेविस वर्षावरील सर्व प्रौढ स्त्री पुरुषांना मतदानाचा अधिकार दिला आहे. आतापर्यत भरतात सात सार्वत्रीक निवडणूका झाल्या त्याध्ये मतदानाचे प्रमाण बरेच समाधानकारक होते. बहुसंख्य मतदार निरक्षर, अज्ञाणी व दरिद्री असल्यामुळे सुजाणपणे मतदान करण्याचे प्रमाण जरी कमी असले तरी या पध्दतीमूळे राजकीय जागृती होण्यास मदत होते, राजकीय जाणीव वाढते काय? हा मात्र विवादाच प्रश्न आहे.

**गरज आहे काळाची**
**ओळख ताकद मतदानाची.......**

■■■■

# मित्रता

''मित्रता ही फुलाच्या बागेसारखी असते
तिला पूर्ण स्वरुप तेव्हाच मिळते
जेव्हा तिला काळजीपूर्वक प्रेम दिले जाते
मैत्री ही झाडासारखी असते
ज्या प्रकारे झाडाला आपण रोज पाणी देत असतो
त्याचप्रमाणे मैत्री मध्ये विश्वासाची साथ असणे
ही एक अनमोल बंधन मैत्री मध्ये असते.
प्रत्येक सुखादु;खात साथ देणारी मैत्री
हीऱ्या पेक्षाही अनमोल आहे तिचे कतृत्व
हे जगाला माठे प्रेरणा आणि हिमत देत असते...

## तुझी साथ.......

**प्रियंका खं. मेश्राम**

जीवनाच्या वाटेवरती.
अडचणी खुप येतील
भिती नाही मला कशाची
कारण तु सोबती आहेस!
चिढायला आवडते मला
कारण मनवायला तु आहेस
खुप बोलते मी
कारण ऐकायला तु आहेस !
तुझी काळजी माझ कतव्य
तुझ समजुन घेण,
माझ निभावुन नेणं
तुझं प्रेम माझा विश्वास
तुझी स्वप्नकृकृ माझी जबाबदारी
तु कविता कृकृ मी शब्द
तु प्रेरणा मी भावना
तु नि:शब्द........... मी भव्यक्त म्हणुन
तुच सात जन्म
मी धन्य आजन्म
अनमोल जीवनात साथ तुझी हवी आहे
साबतीला अखेरपर्यत हात तुझा हवा आहे
आली गेली कितीही संकटे
तरी न डगमगणारा विश्वास
फक्त तुझाच हवा आहे.



# ती नाही तो नाही मग कोण?

**प्राप्ती दि. कामडी** (एम.एस.डब्ल्यु भाग-१)

जन्म झाला वंशाचा दिवा मिळाला म्हणुन सर्व आनंदी झाले. आई–वडिलांना वंशाचा दिवा मिळाला होता. सर्व आनंदी होते. मी ही एक मुलगा म्हणुन जगायला लागले सर्व लोक पण मला रागवायचे का बर असा वागतोस रे, का बर असा करतोस रे, आई ही कधि कधि रागवायची मला का बर रागवतात. मला अशा सवयी आहे तर मग काय गुन्हा आहे. माझाा सोबतील मित्र मैत्रीनी सुदधा नेहमी चिडवत असायच्या आईला विचारायाचे की मला असे का म्हणतात मी असा का वागतो तिला कळायचे नाही. वडील सतत दारूच्या नशेत असायचे आणि माझे प्रश्न ते प्रश्नच राहुन गेले सतत ते प्रश्न माझ्या मनामध्ये राहुन गेले सतत ते प्रश्न माझ्या मनामध्ये राहुन गेले मी विचारायचे की असे का बर माझ्या सोबत होते. पणस त्याचे उत्तर माझ्याकडे नव्हतेच. दिवसा मागुन दिवस निघुन गेले काळ निघत गेला त्यामध्ये नवनविन लोकांचा सहवास मिळत गेला आईच्या मृत्यु नेतर मी शिक्षणासाठी बाहेर जायचे ठरविले घरच्याशी होणारा वाद सहण करणे. असे होवुन गेले होते. आईला कळाले नाही पण ती मला सांभाळुन घ्यायची आई नसल्यावर घरामधिल लोकांशी माझा वाद वाढायला लागला. आणि आजोबा, काका,काकु, वडील यांच्याशी वाद घालणे मी शहराच्या दिशेने निघालो. शहरात शिकाला लागलो. नविन मीत्र मिळाले मैत्रीनी मीळाल्या परंतु एक गोष्ट मला सतवत राहली ती म्हणजे माझ्या विषयी बोलली जाणारी शब्द असा का बर बागतोस आया का राहतो. चांगला राहण हाच प्रश्न मला गावातही म्हणत होते आणि हाच प्रश्न मला इथेही म्हणायला लागले सोबत राहतात काही मीत्र मैत्रीने मला दुर करायला सुरूवात केली मुलीही दुर राहयच्या मी मित्र एकटाच स्वत:च स्वत:ला प्रश्न विचारायचो की अस का बर?आणि असे प्रश्न मलाच सतत पडत पडत होता. मी जणु एकटा पडलो होतो आणि म्याचप्रश्नांने मला गोंध ळुन टाकले रात्रीच झोप हरवली.

मग अर्ध्या रात्री झोपेतून उठुन आरसा बघवायास सुरूवात केली रोज रोज स्वत:ला बघायचे आणि म्हणायचे मी मुलगाच आहे ना? असे बघत बघत झोपुन जायचे पण सतत त्या मित्राच चिडवण मनामध्ये गोंधळ निर्माण करीत असायचे मग एक दिवस मात्र अर्ध्या रात्री हीच ते प्रश्न माझ्या डोळयासमोर आले आणि मला जाग केले उठुन आरसा हातात घेवुन स्वत:हाला बघुन म्हाणालो मी आहे मुलगा आणि  दिसतो पण मुलगा मग ही मुलगी मुलगी चिडवते हे काय? असे म्हणत बेभान होवुन सोबत असणाऱ्या खोली सोबतीला मीत्राला सुध्दा उठविले आणि बेभान होवुन म्हणालो अरे कुठे मुलगी दिसतो सांगा असा आरसा घेवुन त्याच्याकडे बघत म्हणालो बघा मी मुलगाच आहे मी मुलगाच आहे मला का चिडवतात असा आरडा ओरडा करत म्हणालो. आणि त्या आरशामध्ये स्वत:ला म्हणालो तुझ सुध्दा अस्तित्व या आरशा सारखे आहेत या आरशामध्ये जे आहे ते दिसते रडले की रडतांना दिसते हसले की हसतांना दिसते पण मनामध्ये काय आहे कोंणी बघत नाही माझ्यामनामध्ये काय चालु आहे. ही तळमळ कोणाला सांगु कोण कडे जावुन माझे दु:ख सांगु घरच्यांना जवळ जाण्याची माझ्यात हिम्मत नव्हती. त्याच्या पासुन मी फार लांब गेलेला होतो. मग हे प्रश्न यायचे की असे मुली सारखे का वागतो. मला मुलीचे गुण का हे सर्व प्रश्नाचे उत्तर मला हवे होते. मला या प्रश्नामधुन सुटका हवी होती हे सर्व प्रश्न माढे प्राण झोत आहे. असे म्हणत मी रडत रडत तसाचा झोपुन गेलो.

मला माझ्या स्वप्नामध्ये त्या रात्री माझ्या आईचे अस्तित्व जाणवले तीचे बोलने माझ्या आयुष्याला नवी दिशा देण्याचे कार्य केंले. माझ्या आईने मला सांत्वना देत म्हणाली बाळ जे तुझ्यामध्ये आहे ते कोणतही नाही तु स्वत:ला जाण व स्वत:चे ओळख निर्माण कर या तुझ्या मित्र मैत्रीना नाही तर तु त्या समाजाला दाखवुन दे स्वत:ची ओळख निर्माण करूण स्वत:चे अस्तित्व निर्माण कर असे अस्तित्व निर्माण कर की समाजाच्या समोर तुझ स्वत:च एक व्यक्तीमत्व राहील. स्वताच्या अस्तित्वाला जाग कर तु सर्वानपेक्षा वेगळा आहे. जे बाकी लोकांनमध्ये नाही ते तुझ्यामध्ये आहे. तु स्वत:ला ओळख, तु स्वत:ला ओळख ,

तु स्वत:ला ओळख हे शब्द तीचे माझ्या डोक्यात गोंधळ निर्माण करीत होते.

तेवढयात सकाळची सुर्याची कीरण चेहऱ्यावर येता झोपेतुन जाग आला उठलो जवळ पडलेला आरसा दिसला त्या आरशाला लाल रंग भडक सोकलेला रक्त दिसले दृ जवळ असलेला रोज उशिरा उठणारा मित्र सुध्दा आज गेलेला होता सगळे वाततवरण सुन होते. आवज होता तो फक्त एका घडयाळाचा काटयाचा त्या घडाळयाकडे बघत आरसा उचलत आरशयावरील रक्त बघायला गेंलो तर त्या कीरण दिसली ते परहता त्याच फुटक्या आरशात स्वत:चे प्रतीबिंब पाहील तर ते प्रतीबिंब पहातात. त्याच आरशाचा तुकडा स्वताच्या डोक्यात माथ्यावर गेलेला दीसला ते बघताच मी स्तब्द झालो. आणि बेभान झालो. पाया खालची जमीण सरकली असे वाटायला लागले आणि नेतर कळाले की मध्य रात्री मीच त्या आरशाने स्वत:च डोक ठेचुन घेतल आणी त्या रात्रीने माझे संपुर्ण आयुष्यच बदलुन टाकले. .

आईचे ते शब्द माझ्या मनामध्ये नेहमी असायचे दिवसामागुन दिवस निघुन गेले मलाही जानवल की माझ्या मध्ये बदल आहे. माझ्यामध्ये स्यिचे गुण आहे. हे का बर घडतात. यासाठी हे काय घडत हे शोधन्यासाठी धडपड माझी सुरू झाली. आणि ती ध ाडपड आता थांबवायची आणि स्वत:ला बदलवायसचे ठरविले तीथुन तो पासुन तर ती या प्रवासाला सुरूवात केली आणि मी एक स्वताहाला स्त्री मध्ये बघायला सुस्वात केली आणि मी तो पासुन तर ती झाले. इथेच माझ्या आयुष्याची घडपड संपत नाही तर इथुन तर खरी प्रवासाला माझ्या सुरूवात झाली समाजामध ये स्व:ताला कसे दाखवायचे ही घडपड आईने सागीतलेले ते शब्द सतत सोबत होती आता स्वताच्या अस्तित्व निर्माण करण्याचे ठरविले पण लोक छान मिळज्ञले रोजचे जेवन कसे करायचे कसे मिळवून स्वताची भुक मिटवाची या साठी बाजारामध्ये जावूण मागायला सुरवात केली बाजारामध्ये गेल्र्रा नंतर त्या लांकांची आमच्याकडे बघण्यंची तुछ भावना मनाला त्रास देत होते ते त्याच खलुण वर पर्यत बघत नेन शिव्या देण इत्र्यादी अनेक गोष्टी मनामध्ये असायच्या दिवसभर हे सर्व समाजातील लोकांच्या नजरेशी स्वताला सिध्द करण्याचे सुरवात झाली लोकांचे बोलणे मनामश्ये असायचे घरी जावून एकटयात रडत बसायचे आणी दुस—या दिवशी आणखी तेच काम करायला जायचे स्वताच पोट भरण्यासाठी मागायला जायचे काम तर आम्हाल कोणी देत नसायचे मग का मागायचे आणी उपजीवीका भगवायची पण मी जिथे मागायला जायचे तिथे एक आजी मला तिच्या मुलगी सारखी वागवाची मला कधी कोणी काही दिले नाही तर ती राहलेल्या भकरीचा तुकडा माझ्या हातात दयायची आणी मला सागायची तु यांच्र्राकडे लक्ष नको देवू तु खुप यशस्वी होसील एक दिवस बघ मी ही हसून डोळयातील पाणी पुसत आईची आठवन करत त्या आजीला आलीगन घेवून घरी गेले आणी ते शब्द आणखी सतत डोक्यात सतवत मग ठाम विचार केला आता रडायचे नाही आणी स्वताहाला सिध्द करायचे पण कसे कारण या समाजाने एवढे दुर टज्ञककले की नोकरी तर साडा काम सुध्दा नाही मिळत हया सर्व व्यर्शा मी लिहायचे आणी स्वतायला सागायचे की हा समाज मला कधी व्यक्ती म्हणून मान्य करेल.

माझ्या कविता मी सोशल मिडीया व टाकायचे मला सवय लिखाणची होती पण फारसे लिहत नसायचे पण ते मला समाजासमोर का म्हणून बोलू ती का तो हे समाजाला पटवण्यासाठी मी माझ्या लिखाणाचा सहयोग घेतला माझ्या वरील व्याख्या मि लिहायला सुरुवात केली. त्यातील काही कविता हय लांकांना खूप आवडायला लागल्र्रा आणी मला विचारायला लागले की तुम्ही येवढा खेल विचार लिहीता काव्य मी हसत सागाचे हे विचार नाही तर माझ आयुष्य आहे मला हे आयुष्य समाजासमोर माडायच होते ती हे आयुष्य जगता वेळे चे अनुभव आहे हे विचार नाही असे म्हणत मी हसायचे माझे लिखाण काम खुप लोकांना आवडायचे मला कवियत्रीचा पुरस्कार देण्यात आला एक माझी कवीता होती त्यामध्ये समाजाच्या आच्या प्रति दृष्टीकोण एकला होता.

त्या कवितेने मला माझ्या जीवनाचे रंग भरण्याचे काम केले. त्या पुरस्कारा नंतर माझ्यावर फुलाचा वर्षाव झाला लोक ओळखयला लागले ती म्हणून समाजाने स्वीकार केला त्यावेळी मला पुरस्कार जाहीर झाला त्या वेळी मला माझ्या आईने सागीतलेले मला बोललेले शब्द समोर आले आणी मि म्हणाले जोरात आई मी केले ग माझे अस्तीत्व निर्माण असे म्हणत मी त्या पुरस्कार स्वीकार केला पण खर सांगाच झाल तर आजही अमच्या पती लोकांचे वागण तुच्छ आहे. हे बदलायला हवे जरी सरकारणे आम्हाला जागा दिली पण समाजाने आजही एकटे पाडले आहे.

■ ■ ■ ■

# मोबाईल गेम अणि तरूण

**ओम बेलकर** (बी.एस.डब्लल्यू)



आजच्या आधूनिक जगामध्ये मोबाईल हा मानवाच्या आयुश्याचा जीव की प्राण झाला आहे. आपण लहानपनापासुनच बाळाच्या भावनिक मानसिक आणी बैध्दिक विकासाच्या दृष्टीकोणातून अभ्यासपुर्वक विचार करणे जरुरीचे असत. हे आपन जाणून घेतले पाहीजे जन्माला येणा–या प्रत्यक जिवाला भावना असतात त्या भावना समजून घेऊन त्या बाळाचे व्यक्ती स्वातंत्र्य हे व्यवस्थीत ठेवणे आपले कर्तव्य आहे परंतू या आजच्या आधूनिक जगामध्ये पालक आपल्या लहान मुलांना लहानपनापासुनच मोबाईलचे वेड लावून देतात त्यामुळे लहानपनापासूनच मूले मोबाईल वापरायला सुरुवात करतात. त्यामध्ये तो काही गेम खेळतो व त्याला त्या गेम चे वेड लागून जाते नंतर तो गेम त्या लहान मुलांसाठी जीव की प्राण होऊन जातो व त्याला व त्याला पुन्हा गेम खेळायला देतो त्यामुळे त्याचे हे गेम बददलचे वेळ काही कमी होत नाही व तो तरुण वयामध्ये सुध्दा स्वत:च्या षिक्षणाकडे लक्ष न देता दिवसभर मोबाईलमध्ये गेम खेळत असतो. त्याला गेम व्यतिरिक्त दुसरे कषाचेही भान नसते व तो मोबाईल गेमच्या नादात मृत्यू मुखी पडतो. वाढत्या तरुणाईमध्ये मोबाईल गेम तरुणासाठी जिव घेणे झाले आहे. ब्लु व्हेल हया गेममुळे तर भरपूर तरुण त्यासारखे आणखी काही जिवघेणे ऑनलाईन गेम मननोन बॅटलग्राउड (च्ठळ) यासारख्या गेमने आधीच मैल्यवान तरुणांचा जीव घेतला आहे. मोबाईल गेममुळे तरुण एकमेकाचा जिव सुध्दा घ्यायला लागले आहे जर त्यांना घरच्यांनी मोबाईल गेम खेळण्यास मनाई केली तर ते घरच्यावर हल्ला करतात. ऑक्टोबर २०१८ मध्ये दिल्लीतील एका १९ वर्षीच्या मुलाने जाणून बूजुन त्यांच्या आई–वडीलांची आणि बहिणीची हत्या केली. कारण त्यांनी त्याला PUBG खेळण्यापासून रोखले होते. हे मोबाईल गेम स्वताच एक राक्षस आहे. हे गेम सहजच अजूनही उपल्ब्ध आहे. मुलांना खेळण्यापासून कसे रोखायचे हे आपल्या सर्वासाठी आव्हान आहे. या वाईट सवईमूळे तरुणांमध्ये मनुश्य उदध्वस्त होत आहे. त्यांचे आयुश्य खराब होण्या आधी त्वरीत कार्यवाही केली पाहीजे तरुणांनी सर्वप्रथम मोबाईलचा कमी वापर केला पाहीजे तरुणंनी त्यामुळे हळूहळू त्यांच्या मोबाईल गेम मधला रस कमी होईल. त्यामुळे त्यांचे मन या ऑनलाईन गेमपासून विचलीत होईल आणि त्यांचे लक्ष इतर गोश्टीकडे वळेल व ते त्यांच्या षिक्षणामध्ये चांगल्या प्रकारे लक्ष देतील. ते मोबाईल गेममुळे मृत्युमुखी पडणार नाही.

■■■■

## You Know What…..

Life is a Photograph
and we are a Lake and
Visual image of  Reality
Experience have to be
added to make hope blossom
Pasd hasn't defined you
destroyed you.
Or
Deafeated you
Is has only supported you to have
than dled of every mouement
We shouled decided
What shouled we do?

**Seema I Khursange,** MSW I Semister

# नवयुगाच्या समस्या

**कु .सीमा खुरसुंगे** (एस.एम.डब्ल्यु प्रथम वर्ष)

दैनंदिन जीवनात जीवन जगत असतांना आधीच्या काळची परिस्थिती आणी सध्याच्या परिस्थितीची जुळलेली नाती यामध्ये खूप फरक बधायला मिळत आहे. नवयुगाच्या प्रवाहासोबत आपण स्वत:ला वेगाने परिवर्तित करण्याच्या नादात स्वत:साठीच समाजात समस्या निर्माण करत आहो. संघटनात्मक आणि विघटनात्मक अषा दोन्ही प्रकारच्या बाबी लक्षात घेउन आजच्या युगात फक्त आणि फक्त स्वार्थ  दडलेला आहे.

अरे............. आधिच्या परंपरा चालिरिती आपल्याला एकत्रीत जगण्याचा मार्ग दाखवीत आहे. दुसरीकडे आज आपल्याला स्वार्थीपनाची भावना बघायला मिळत आहे. आधिच्या परीस्थितीच्या तुलनेत आजची परिस्थिती अतिषय ढासाळलेली आहे. असे या नवयुगाचे वर्णन दिसत आहे.

मानवी जीवन हे आपल्या निसर्गाच्या कुषीत दडलेल दिसते. निसर्गाच्या गर्भातच दडलेल दिसते आजुबाजुला अफाट निसर्ग पसरलेला आहे. मानवी जीवनात निसर्गाचे काय महत्वाचे स्थान आहे हे कोणालाही सागण्याची गरज नाही.

काळोख शिक्षणाचा सहवास होत आहे
आजार वाट बघतो आभास होत आहे.

निसर्गाने दिलेल्या वस्तूची जाणीव ठेवून क्रीया करणे अतिषय मोलाचे आहे. परंतू आजच्या युगात स्वत:च्या स्वार्थासाठी मानव निसर्गाने दिलेली देणगी विसरत जात आहे. औद्योगीकरण सातत्याने वाढत आहे औद्योगीकरण व्यापक बनविण्यासाठी जंगल तोडीचे प्रमाण वाढत आहे. सोबतच आरोग्याला धोका करून घेत आहेत. आरोग्य आणि निसग याचा सबंध काय ? तर निसर्ग म्हटले की जंगले, नदी, वायु इत्यादी गोश्टी आपल्या डोळयासमोर येतात वातावरणातील वायु हा मानवी ष्वास जगवतो धरती ही मानवासाठी अन्नची निर्मीती करते. रोज उगवणारा सुर्य जिवणाला उर्जा देतो. आणि या सर्व गोश्टी आरोग्याषी निगडीत आहेत. या निसर्गा विशयी सदैवृतज्ञता व्यक्त केली पाहीजे.

वाढत्या जगात षिक्षणाचे महत्व कोठेतरी कमी होत दिसल्याचे वाटत आहे. सुशिक्षितंचे प्रमाण वाढत आहे सोबतच बेरोजगारी.......ही देखील या नवयुगाच्या प्रवाहाची मोठी समस्या वाटत आहे. बेरोजगारीमूळे गरिबी दारिद्रयाचे प्रमाण जास्त दिसत आहे. शिक्षण हा फक्त व्यवसाय झालेला आढळून येत आहे. पुर्वी शिक्षितांना रोजगार मिळायचा परंतू आज मनुष्याची जागा आर्टिफिषीयलनी घेतलेली आहे. उदा :— पुर्वी औद्योगिक क्षेत्रात दहा ते विस मणसे काम करायचे तिथे आज एक मषीन काम करते आहे. मात्र वेळेची बचत होत आहे. परंतू वेळेच्या बचती मागे मनुश्याचा रोजगार हिरावून घेतल्या जात आहे. बेरोजगारी मानवाचा स्वत:च्या उदारनिर्वाह करण्यासाठी फसवणूक,, भ्रश्टाचार स्वार्थीपणा या मार्गाने आहे या गोष्टीचा मानवी जिवनावर वाईट परिणाम दिसत आहे. जगात लोकसंख्या वाढतच आहे. दारिद्रीची रेशा जास्त प्रमाणात बघायला मिळत आहे. तरूण इंटरनेटच्या आहारी जात आहेत. याचा जास्तीत जास्त लहान मुलावर वाईट परिणाम होत आहे. युवक स्वत:ला प्रसिध्दी मिळवून  देण्यासाठी स्वताचाच मानसिक छळ करुण घेत आहे. अस्तित्वातले जीवन जगणे विसरुण सोषल मिडीयावर दिखाव्याचे जीवन जगतांना दिसून येत आहे. आपलेपनाची भावना एकत्रीत जगण्याची परंपरा, मोठयांचा आदर या गोष्टीचा ऱ्हास झालेला आहे. उरलं ते..... फक्त........स्वार्थ आणि स्वार्थ.......!

■■■■

## सुविचार


सुज्ञतेच्या व्यवहाराचे शिक्षण, निती शिक्षण न्याय व सात्विकपण ही प्राप्त करुन घेण्यात यावीत ज्याला ज्ञान प्राप्त होतो तो साक्षरता संपादन करतो

**– अजय डेवीड गायकवाड**

# आमच्या भारताचे संविधान

**कु. रानी के. मेश्राम** (एम.एस.डब्ल्यु)

,, दलितांचे ते तलवार होऊन गेले.
अन्यायाविरुदध प्रहार होऊन गेले
होते ते गरीबच पण या जगाचा
काहिनुर होऊन गेले
जग खुप ते या जगाला घडवुन गेले
अरे या मुर्खाना अजून कळत कस नाही
वर्गाच्या बाहेर बसून सुदघा ते या भारताचे
संविधान लिहून गेले!




होय मित्रानो ज्या बाबासाहेबांना या देशात शिक्षणासाठी पुस्तकाकरीता संघर्ष करावा लागला त्याच बाबासाहेबांनी एक असे पुस्तक लिहिले की त्याच पुस्तकावर आज आपला संपुर्ण भारताचे कार्यप्रणाली चालते.....ते पुस्तक म्हणजे भारताचे संविधान !

सुरूवातीला एकुण ३८९ सदस्यापैकी फाळणीनंतर २९९ सदस्यांनी १०८२ दिवसांनी म्हाणजेच २ वर्षे ११ महिने आणि १८ दिवसात जवळपास १२००० हजार पानांचे महान असे संविधान डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लिहिले. भारतीय संविधानात एकुण ०१ प्रास्ताविका, ०८ अनुसुची, २५ भाग आणि ३९५ कलमे होती.

भारतीय संविधान आणि घटनांनंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सन्मानार्थ ''भारतीय संविधान दिन'' साजरा केला जातो. संविधानाबाबत जनजागृती करण्यासाठी आणि आंबेडकरांच्या विचारांचा प्रसार करण्याच्या उददेशाने २६ नोहेंबर हा दिवस संविधान दिवस म्हणून साजरा केला जातो.

संविधान दिन दरवर्षी २६ नोव्हेबरला भारतात मोठया थाटामाटात साजरा केला जातो १९४९ साली या दिवशी भारतीय राज्यघटना तयार करण्यात आली भारताच्या स्वातंत्र्यासाठी अनेक क्रातीविरांनी अथक प्रयत्न केले आणि या संघर्षाचे फळ म्हणजे १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्य मिळाले. देशाच्या स्वातंत्र्यानंतर देशाला एक मजबूत संविधान प्रदान करण्याचे सर्वात मोठे काम होते. ज्याचा मसुदा डॉ.बाबासाहेब आबेडकरांनी तयार केला होता. जगातील विविध देशाच्या राज्यघटनेतील विशेष गोष्टी भारतीय संविधानात मिसळून सशक्त आणि न्यायप्राप्त झाल्या आहेत.

२९ ऑगस्ट १९४७ रोजी भारतीय राज्यघटनेच्या मसूदा समितीची स्थापना करण्यात आली. आणि या मसुदा समितीची स्थापन करण्यात आली आणि या मसूदा समितीची स्थापन करण्यात आली. या मसुदा समितीचे अध्यक्ष म्हणून डॉ. बाबासाहेब आबेडकर यांची निवड करण्यात आली. पंडीत जवाहरलाल नेहरु डॉ. राजेद्र प्रसाद, सरदार वल्लभभाई पटेल आणि मैलाना आझाद दत्यादी लोक या समितितील सदस्य होते.

आपले संविधान हे जगातील सर्वात मोठे संविधान मानल्या जाते. २६ नोव्हेबर १९४९ या दिवशी भारतीय संविधान तयार करण्यात आले. डॉ. बाबासाहेब आबेडकर यांच्या व्दारे संविधान तयार करुण राष्ट्राला समर्पित केले. त्यानंतर २६ जानेवारी १९५० साली भरतीय संविधान लागू करण्यात आले. भारत सरकारणे २६ नोव्हेंबर २०१५ पासून संविधान दिन साजरा करण्यास सुरुवात केली, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या योगदानाचे स्मरण करण्यासाठी आणि संविधानाचे महत्व सर्वत्र पसरविण्यासाठी संविधान दिन सादरा केला जातो.

वंचिताना देई उभारी !
भारतीय संविधान लय भारी !!

तुम्हाला माहीत आहे का? राज्यघटनेचा मसुदा तयार करतांना टंकलेखन किंवा छपाईचा वापर केलेला नाही. भारताचे संविधान बणून तयार होत होते पण संविधान हे हस्तलिखीत असावे अशी पंडीत जवाहरलाल नेहरु यांची इच्छा होती.बिहारी

नारायन रायजादा यांना कॅलीग्राफीची कला अवगत होती.त्यामुळे याची जबाबदारी त्यांना देण्यात आली. संवीधान हे हस्तलीखीत असाव अशी पंडीत जव्हारलाल नेहरु याची इच्छा होती बिहारी नारायन रायजादा यांना कॉलीग्राफिचा कला अवगत होती त्यामुळे त्यांची जबाबदारी त्यांना देण्यात आली. संविधान लिहण्यासाठी २५४ दौत ३०३ पेन वापरण्यात आले. संविधान लिहण्यासाठी ०६ महिने लागले तसेच आचार्य नंदलाल बोस यांच्या मार्गदर्शनाखाली शांतीनिकेतनमधील कलाकारांनी भारतीय संविधानातील संपुर्ण हस्तकला पुर्ण केली होती. तसेच प्रास्ताविकेच्या व संविधानाच्या इतर पानावरील नक्षीकाम व सजावट जबलपुरचे व्यौहार राममनोहर सिन्हा यांनी बनविली आहे. भारतीय संविधानाची मुळ प्रत संसदेच्या वाचनालयातील हिलियम भरलेल्या बॉक्समध्ये ठेवली आहे.

मित्रानो,

नको राजेशाही नको ठोकशाही
संविधानाने दिली आम्हा लोकशाही,

भारतीय संविधानात कोणत्याही प्रकारची राजेशाही व हुकुमशीला थारा नाही. सर्वाना समान संधी व सामान न्यायाची तरतूद तयार करण्यात आली आहे. आपल्या भारतीय संविधानात भारतातील प्रत्येक व्यक्तीला अभिव्यक्ती स्वतंत्र्या बरोबरच स्वतंत्र्य,समता,बंधूता आणि न्याय या सर्वाचा अवलंब केलेला आहे. त्यामुळे आपले भारतीय संविधान संपुर्ण जगात सर्वोच मानल्या जाते. म्हणून म्हणतात की

संविधान देते समान पत
एक व्यक्ती एक मत !

भारतीय संविधानाने आम्हा भारतीयांना मताधिकाराची समान संधी दिली आहे. स्त्री असो वा पुरुष, हिंदु असो वा सिख, श्रीमंत असो वा गरीब सर्व नागरिकांना मताधिकाराचे समान अधिकार संविधानाने दिले आहेत.

शेवटी एवढेच म्हणाव्हेसे वाटते की,

घटना अशी लिहीली की,
सुर्य– चद्र असे पर्यंत मिटणार नाही
ऋण बाबासाहेबांचे या जन्मात फिटणार नाहीत!

▪▪▪▪



## My First Day at The College

I Still Remember That day
My First day at the College
I Was Happy as Well as nervous.
Experien chig the Place and Meeting mew Friends
College to me was cheerful soul
Case Work Group Work, Phychology Were heartful
As I Stepped in to my Class
Ithought I Was the Gratful Soul
Then I Made My self relaxed
Introduced My Self Relaxed
Introduced my self to all them
Though I was shy infront of them all
Some how I Managed them all
And new one Come in our Minds
Having a Smile on her lips.
She than asked our names
We told our name one. By one
She looked extremely happy
And give us abig applause
I was a happy little one
I Still remembers that day
My first day at the college

**Shraddha M. Baile** M.S.W. II

# युवा मतदार आणि राजकीय जाणीव जागृती

**कु. मोनाली दि. घसाड** (एम.एस.डब्ल्यु १ सेमिस्टर)

आपल्या भारतात वयाची अठरा वर्षे पुर्ण होताच मतदान म्हणून मतदानाचा महत्वाचा अधिकार तरुणांना प्राप्त होतो. जगात सर्वात मोठी लोकशाही असलेल्या आपल्या भारतात मतदानाचा हक्क सर्वात पवित्र हक्क मानला जातो. 'आपला देश सर्वाधिक तरुण मतदाराचा देश असल्याने आपल्याला मिंळालेल्या मतदानाच्या हक्कातून लोकप्रतिनिधीना निवडता येईल या भवनेने तरुणाला स्फुरण येते अनेक तरुण म्हणूनच गटागटाने व विविध माध्यमातून निवडणूक प्रक्रिया व मतदानावर उत्साहाने चर्चा करतांना दिसतात. आपल्या एका मताने केवळ लोकप्रतिनिध ी निवडून येत नाहीत. तर प्रत्येकाच्या एका मतातून देशाचे सुनियोजन, विकास करणारी लोकव्यवस्था स्थापीत करता येते. हया विचारानेच आपली लोकशाही आणखी मजबूत होते. जेव्हा आपण बेजबाबदारपणे चुकिच्या मानसांना निवडून देतो किंवा मतदानच करणे टाळतो तेव्हा एक प्रकारे स्वत: देशाच्या अध ापतनाला आपण जबाबदार ठरतो. लोकशाही संस्कश्ती मजबूत करण्यासाठी जेव्हा मतदार म्हणून प्रत्येक मतदाराची भुमिका अत्यंत महत्वाची असते तेव्हा प्रत्येक मतदाराला मतदार असल्याचा अभिमान दश्ढ करतो.

कधी कधी धाक व दडपशाहीच्या मार्गाने मतांना व मतदारांना प्रभावित केले जाते. '' नोट देऊन वोट घेण्याची व देण्याची भ्रष्ट प्रवश्त्ती फोफावते. अशावेळी आपल्या भ्रष्ट कश्तीमुळे व दंडशाही मुळे किंवा प्रलोभनाला बळी पडल्यामुळे मतदानाचा अधिकारच भ्रष्ट होतो. भारतात निर्भीड व निभर्यपणे मतदानाचा हक्क बजावता येतो. इतकेच नव्हे कुणी चुकिच्या पध दतीणे मतदारावर प्रभाव टाकत असेल तर कायदा अशा लोकावर कडक कार्यवाही करतो. याची व्यवस्था संविधानाने भक्कम पणे करुण दिली आहे. निपक्ष व सुरक्षीत वातावरणात कोणत्याही प्रलोभनांना बळी न पडता मतदानाचा हक्क बजावणे हा मतदाराचा हक्क व कर्तव्य आहे. मतदारांना स्वच्छ सुरक्षित व निपक्ष मतदान करता येणे ही कायदा व सुरक्षाव्यवस्था यांची जबाबदारी आहे. पण त्यासाठीही सज्ज व सजग राहायला हवे.

मतदार असल्यास अभिमान बाळगूण आपण स्वत: मतदानासाठी सज्ज होतांना इतरांनाही मतदान नोंदणी करण्यापासून शंभर टक्के मतदान करण्यासाठी जागृत करुण मतदार म्हणून आपण निवडलेल्या लोक प्रतिनिधीकडे त्यांनी दिलेल्या आश्वासनाच्या पुर्ततेसाठी आग्रह धरत अशा आश्वासनाच्या पुर्तिचा पाठपुरावा करायला हवा. म्हणूनच माझे एक मत अनमोल आहे. या भावनेने आपण आपले राष्ट्रीय कर्तव्य पार पाडायला सज्ज व्हायला हव!

मतदार असल्याचा अभिमान ज्या पवित्र हक्काच्या आणि कर्तव्याच्या पुर्तीतून येतो ते कर्तव्य आपण सर्वानीच मतदानासाठी सज्ज होऊन जागरुक पणे आणि उघडया डोळयानी करायला हवे. बरेचदा मतदानाच्या दिवशी हक्काच्या सुटीचा आनंद धेण्याची वश्त्ती दिसून येते. तर काही वेळा माझ्या एका मताने काय फरक पडतो? या विचाराने मतदानाकडे पाठ करण्याची वश्त्ती दिसून येते. वास्तविक मतदान न करणे हा सुध्दा एका अर्थाने अपराधच आहे. कारण अशा कश्तीने चुकीची व्यक्ती निवडली जाण्याची शक्यता असते. महात्मा गाधी नेहमी म्हणयचे 'लोकशाहीची उभारणी ही लोकशाहीवर श्रध्दा असणाऱ्या जनतेच्या जागश्त व संघटीत शक्तीच्या आधारे झाली पाहीजे' आणि हे तेव्हाच शक्य होईल जेव्हा मतदार स्वत:चा मतदार असल्याचा अभिमान बाळगत मतदानासाठी उत्साहाने सज्ज असेल. लोकशाही व्यवस्थेत मतदानाच्या हक्काला विशेष महत्व असते. कारण सत्तेच्या धुंदीत भ्रट झालेल्या व मतदाराची प्रतारणा करणाऱ्या कोणत्याही लोकप्रतिनिधीला सत्तेवरुण खाली खेचण्याचे सामर्थ्य केवळ मतदाराच्या शक्तीत असते. सत्तेत असणाऱ्या कोणत्याही नेत्याची व पक्षाची ध्येय धोरणे जर जनतेच्या आशा आकांक्षाची अपेक्षा पूर्ण करत नसतील आणि सुनीयोजित विकास होत

नसेल तर मतदार स्वयंस्फूर्तपणे मतदान करुण उत्तम उमेदवाराला पसंती देतो. आपल्या मतामुळे अयोग्य व्यक्ती व पक्षाना सत्तेपासूण दूर ठेवता येते. हा विश्वास मतदाराला असतो. एखादया गटास अथवा समश्हास, विशिष्ट निवडणुकीसाठी अथवा एखादा महत्वाचा निर्णय घेण्यासाठी लिखीत अथवा ठरविलेल्या माध्यमाव्दारे मतप्रदर्शन करण्यासाठी एक पध्दती आहे. यांचा वापर चर्चा वादविवाद अथवा निवडणूक प्रचारानंतर करण्यात येतो. लोकशाही राज्य प्रणालीत उच्च पदावरच्या व्यक्तीसाठी निवडणूक होऊन मतदान करण्यात येते. एखादया क्षेत्रातील अशा निवडणूकीसाठी ज्याला मतदान करण्यात येत तो उमेदवार असतो व तो मतपत्रीकेव्दारे मतदान करतो तो मतदार म्हणून ओळखण्यात येतो. मतदारांनी केलेल्या मताच्या पार्श्वभूमीवर उमेदवाराची निवड केली जाते. आपण जरूर मत दिले पाहीजे.

''चला राष्ट्रीय कर्तव्य करुया,
मतदार असल्याचा अभिमान बाळगू या,
आणि होऊ या मतदानासाठी सज्ज''!!!

■■■■



## आयुष्य

पानावर पडलेला दवबिंदु जसा हळूहळू
पानातून निसटून जातं
तसेच आपले आयुष्यही कीती सहजता
वेळेच्या बधनातून मुक्त होत जात.
आयुष्यात अनेक वेगवेगळे रंग असतात
सुखाचा रंग वेगळा दुखाचा रंग वेगळा
हसण्याचा रंग वेगळा
आणी
वेळेचाही रंग वेगळा
या वेळेवर मात करुण उभारलेले नवीन विचार
उंच भारारी घेऊन जग वेगळ
बनवायला शिकवतात.
यालाच आयुष्य म्हणतात.....!

## जिन्दगी

ये जिदगी इतनी सी ही
ख्याहिश है मुझे
कि मेरा अगला कदम मेरे
पिछले कदम से बेहत्तर हो.
ये जिंदगी ख्वाहिश नही है किसी से
अब बस अपने आपसे लडना है मुझे
अपने आपसे जितना है मुझे
ये जिंदगी ख्वाहीश है मुझे तुझसे
कभि गिरु तो संभाले मुझे
अपनी जिदगी खुद से
लडणे की ताकद दे मुझे
ये जिदगी बस इतनीसी ही
ख्वाहिश है मुझे.

— **उन्नती कामडी**

# जीवनाचा प्रवास

**प्रियंका खं. मेश्राम** (एम.एस.डब्ल्यु)

असं का होत की वेळ आपल्या हातामध्ये राहत नाही. कधी दिवस निघून जातो आणि रात्रीच्या अंघारामध्ये आपल्या जिवनाचं अस्तीत्व पाहत बसतो अस वाटते. अंधारामध्ये फक्त रोशन करणाऱ्या छोटयाश्या काजव्याप्रमाणे एखादी छोटीशी गोष्ट मनामध्ये येते आणि घर करुण बसते.

खरच का अस घडते जे आपल्या मनामध्ये असते ते कधी घडतच नाही......पण का ? याचे सत्य मलासुध्दा माहिती नाही. कारण सत्य शोधता शोधता मी आता खुपच दुर आले. जीवन असंख्य घडामोडीने घडत असते. जिवणात सुख आणि दुखः मिळाले म्हणुन खुप आानंदी व्हायच आणि जिवनाच्या वाटेला दुःख आले म्हणून मागे सारयचं....... संकटामध्ये समोर जाण्यास शिका. रस्ता आपोआप मिळेल पण या सर्व गोष्टीचे कारण आपणच असतो. एखादी गोष्ट वेळेवर करण्याचं ठरवलं तर ती गाोष्ट आपण केलीच पाहीजे. आपला आत्मविश्वास जागा केलाच पाहीजे. तेव्हाच आपण आपल्या ध्येयाला गाठू शकतो. आणि आपल्या जिवनामध्ये यशस्वी होवू शकतो. हा माझ्या स्वप्नांचा विश्वास आहे.

रस्त्याने चालता चालता एक विचार मनामध्ये आला तो म्हणजे रखरखत्या उन्हामध्ये काम करणारी दर दिवशी अन्नासाठी भटकनारी स्त्री, आपल्या मुलांचा विचार करणारी स्त्री, का तिचं जीवन असं! कधी ती मनामध्ये विचार करत नसेल का? आपणही सुशिक्षीत जीवन जगावे, आपणही इतर लोकाासरखं हसत खुशीने आनंदाने जीवन जगावे. पण तिच्यजवळ कुठ वेळ आणि ती वेळ काढणार तरी कुठून याचा विचार ती कघी करत नसेल. कारण भुकेची खळगी भरता भरता तिला वेळ सापडत नसेल, त्या छोटयाशा झोपडीमध्ये अंधाऱ्या जिवनात विचार करता करता काही शब्दच उरले नसेल आणि मला असे वाटते की, आपल्यापेक्षा किती तरी असे मानसे आणि समाज असे आहेत की, त्यांना स्वतः आपण काय करतो याचे सुध्दा भान नाही. मनाला स्पर्श करुण जाणाऱ्या घटना जेव्हा जिवणात घडतात तेव्हा असं वाटत की, खरच आपलं जीवन सुरक्षीत आहे का?

मनामधील असंख्य प्रश्नाची उत्तरे शोधताना जीवन जगनचं खुप कठीण आहे असं वाटते. पण आपल्या जिवनामधले असंख्य प्रश्नाचे उत्तर शोधता शोधता सकाळचे धरतीवर पडणारे पहिले सुर्याचे कीरण, अंधा–या जिवणाला एक चिरंतन, नवीन जीवन जगण्याचा आपल्याला एक संदेशच देऊन जाते....

■■■■

### – सुविचार –

मित्राचे चित्र नव्हे, तर चरित्र पाहून मैत्री करा
मैत्रीचा मोती कुणाच्याही भाग्यात नसतो
सागराच्या प्रत्येक शिंपल्यात मोती नसतो
जो विश्वासाने मैत्री जपतो
तोच खरा मैत्रीचा मोती असतो.
मैत्रीचा हा धागा रेश्मापेक्षाही मऊ
मैत्रीच हे नात टिकवण्यासाठी
नकोत खुप सारे कष्ट.
तेज आसवे सुर्यासारखें
प्रखरता असावी चंद्रासारखी
शितलता असावी चांदण्यासारखी
आणी मैत्री असावी तुझ्यासारखी

# यशाचा मार्ग

कु. आश्विनी रा. कामीनकर (बी.एस.डब्ल्यू.)

मित्रानो आयुष्य म्हटले की संघर्ष तर आलाच आणि तो असायलाच हवाच ना! नाहीतर संघर्ष न करता जर सगळया गोष्टी सगळया, अपेक्षा पुर्ण व्हायला लागल्या तर मग त्याची किंमत उरणार नाही.आणि जगण्याची मजा पण येणार नाही. त्यामुळे संघर्षाची भिती पण ठेवायची नाही. तर त्याचा नेटाने सामना कसा करता येईल हे शिकायचे. संघर्ष हे यशाचे सुत्र आहे. पण अनेकदा काय होते की, आपल्या वाटयाला आलेला संघर्ष आपल्याला इतरांपेक्षा खूप जास्त आहे असे वाटते. आणि मग संघर्ष करण्याची, संकटाला समोरे जाण्याची वेळ आली की आपण आपल्या नशीबाला, कर्माला दोष देवून मोकळे होतो. माझ्याच वाटयाला नेहमी अशी संकटे का? म्हणून रडत बसतो.

खरतर संघर्ष किंवा संकटे प्रत्येकालाच असतात. पण प्रत्येकाला ती बाकीच्यांच्या मानाने कमी वाटतात. कदाचीत परिस्थिती वेगळी असू शकते किंवा मग प्रमाण मात्र कमी जास्त असतात. आपल्या अयुष्यात मित्र आणि शत्रू सगळेच असतात. खरतर दोन्ही महत्वाचे आहे. आपले मित्र आपल्याबद्द्ल नेहमीच चांगला आणि साकारात्मक विचार करतात. तर शत्रू शारिरीक,आर्थिक आणि मानसिक हानी पोहचवण्याचा प्रयत्न करतात.पण ही हानी नकोच असेल तर एक छान मंत्र आहे. आयुष्यात कधी शत्रूच बाळगू नका. सगळयांना मैत्रीच्या धाग्याने छान गफूंन टाका म्हणजे त्रासच होणार नाही. कारण रागाला रागाने नाही तर माफीने जिंकता येते.

म्हणूनच जीवनात यशस्वी व्हायचे असेल तर योग्य आणि निट विचार करा.कारण चुकीचे विचार आणि त्यातून निर्माण झालेली कृती कधी आयुष्य उध्वस्त करेल कळणार नाही. आयुष्य फार सुंदर आहे फक्त चांगल्या विचारानी जगता आलं पाहिजे माणसाला माणूस जोडत गेलं पाहिजे.

'' पाय असावे जमिनीवरती  
आकाश कवेत घेतांना  
हसु असावे ओठांवरती  
काळीज काढून देतांना  
करुनी जावे असेही काही  
दुनियेतून या जातांना  
गहिवर यावा जगास  
साऱ्या शेवटचा निरोप देतांना''

म्हणजेच जीवनात व्यक्तीला कितीही याशस्वी होऊ द्या. व्यक्तीमध्ये विनम्रता, सहनशिलता, इतरांविषयी परोपकाराची भावना इ. मानवी मूल्य असायलाच पाहीजे. या मूल्याशिवाय यश हे निरर्थक आहे.

आपल्या आयुष्यात जेव्हा संकट येतात तेव्हा आपल्याला जगण्याचा त्या संकटातून बाहेर पडण्याचा मार्ग दिसेनासा होतो. सगळा अंधारच आहे असे वाटायला लागते पण ती वेळ असते संकटाच्या अंतीम टप्प्याची. तो टप्पा एकदा न डगमगता पार केला की, मग उगवता सुर्य हमखास तुमची वाट पाहत आहे हे नेहमिच लक्षात ठेवावे. आणि संकटानी खचून न जाता त्याला समोरे जाऊन येणाऱ्या प्रकाशाचे स्वागत करावे.

वीरता कुशाला म्हणतात? जिंकणे म्हणजे वीरता नाही तर आलेल्या संकटांना उत्तर देण्यासाठी नेहमी कष्ट करण्याची तयारी ठेवणे म्हणजेच विरता होय.

सासह म्हणजे युध्द करणे नाही तर कोणत्याही वेळी संकटासमोर उभे राहण्याचा स्वभाव म्हणजे साहस. शौर्य म्हणजे कधीही न पडणे. नाही तर पडल्यावरही पुन्हा उठणे म्हणजेच शौर्य. म्हणजेच सतत अविरत कष्ट करणे म्हणजेच शौर्य आणि शौर्यवानाला विजय म्हणजे यश नक्कीच मिळते.

यशाच्या प्रवासात शॉर्टकट नसतो. यशस्वी व्यक्ती मेहनती असतात. यशाचा एक सिक्रेट फॉर्मुला आहे फक्त नशिबामुळे कोणी यशस्वी होत नाही, त्यासाठी यशाचं सूत्र समजून आणावं लागतं!

आपल्याला एखदी नवीन गोष्ट घडवायची असेल तर जुने मोडावेच लागते. ही अत्यंत साधी गोष्ट आहे. पावसाळा सुरु होणार म्हणून उन्हाळयात झाडांची पिकलेली पाने गळायला

लागतात. हा निसर्गचक्रप्रमाणे क्रम चालतो. तसेच खुंटलेल्या झाडाची वाढ होण्यासाठी झाडाच्या काही फांदया आणि पाने आपण तोडून टाकतो. कारण झाडाच्या योग्य वाढीसाठी तेच योग्य असते. पण आपन जुन्याच फांदयांना आणी पानांना गोंजारत राहीलो तर वाढ तर होणारच नाही उलट खुंटेल आपले ही अगदी तसेच आहे. चुकीचे नकारात्मक विचार आपण तसेच मनात ठेवत असू, तसाच विचार करत असू तर तसेच आपल्या आयुष्यात पण घडेल आणि आपण कधीच मोठे होऊ शकणार नाही. म्हणूनच यशस्वी व्हायचे असेल तर स्वत:मध्ये, स्वताच्या विचारामध्ये परिस्थिती सापेक्ष, कालसापेक्षा बदल करणे गरजेचे आहे. जीवनात यशस्वी व्हायचे असेल तर मिळालेली संधी ओळखणे गरजेचे आहे. प्रत्येक दिवसातला प्रत्येक क्षण हा तुमचं अयुष्य बदलण्यासाठी मिळालेली नवी संधी आहे. म्हणून प्रत्येक दिवसाला प्रत्येक क्षण हा उपयोगी लावा. परिस्थीती, समाज, सभोवतालचा परिसर आपल्याला प्रत्येक दिवशी, प्रत्येक क्षणी काही तरी शिकवित असतो. जे आपल्या विकासासाठी अत्यंत महत्वाचे असते. जोपर्यंत जीवन आहे तोपर्यत शिका. कारण अनुभव हा जगातील सर्वश्रेष्ठ शिक्षक आहे. म्हणतात ना.

Learning is never ending process.

जिवनात जर आपण काही चागल्या सवयी अंगीकारल्या तर यश स्वत:हून आपल्या जवळ येईल. जीवनात कधीही यशाच्या मागे धावू नका. स्वत: इतकी मेहनत, इतके प्रयत्न करा की, यश आपल्या मागे धावत आले पाहीजे. स्वत:ला ओळखा, स्वत:मधील क्षमता आणी उणीवा काय आहे याचे निरिक्षण करा. सृष्टीने प्रत्येक व्यक्तीमध्ये गुण दिले आहे. फक्त आपल्याला गरज आहे ते ओळखून त्यांना विकसीत करण्याची. कधीही शिकलेली कोणतीही गोष्ट कुठे कामाला येईल सांगता येत नही. त्यामुळे सतत शिकत राहायचं. यशस्वी लोक यशासाठी भुकेले असतात, अल्पसंतूष्ट होवून एका जागी बसत नाही, एक पुर्ण झाल की झपाटुन पुढच्या ध्येयाचा पाठलाग करतात. कालच्या पेक्षा माझ्या कामात अजून काय सुधारणा करु असा प्रश्न स्वत:ला विचारतात. तर मित्रांना आलेल्या संकटांना घाबरु नका. हारुन खचून जाऊ नका तर येणाऱ्या नवीन दिवसाची सुरवात समजून नेटाने पुढे जा आणि विजयी व्हा.

## बाप

भटक्या जगाच्या वोटवरती,
बाप एकटा चलतो.
लेकराच्या भविष्यासाठी
बाप काटयावर धवतो.
करुण कश्ट, घाम
बाप मातीत गाडतो
चार सदस्यांचा परिवार
बाप एकटाच चालवतो
षब्द नाही बापासाठी
तरी मी कविता करतो
कविता लिहीता, लिहिता,
आज मी थेडस रडतो.
मिठी माराया बापाला,
काळीज मोठा लागतो.
माराया मिळो मिठी मला,
प्रार्थना देवाकडे करतो.



**ओम बेलकर**

## एक खुबसूरत सोच

अगर कोई पुछे जिदगी में
क्या खोया और क्या पाया
तो कहना जो कुछ खोया
वे मेरी नादानी थी और
जो भी पाया वो
प्रभु की मेहेरबानी थी
खुबसूरत रिष्ता है मेरा
और भगवान के बीच मे
ज्यादा मै मांगता नही
और कम वो देता नही

# युवकाची लोकशाही विकासातील भुमिका

**कु. प्रिती दि. कामडी** (एम.एस.डब्ल्यु १ सेमिस्टर)

लोकशाहीने प्रत्येकाला मतदानाचा अधिकार दिला आहे. त्याच बरोबर या अधिकाराचा वापर योग्य पध्दतीने कसा करायचा याची जबाबदारी ही प्रत्येक मतदारावर आहे. त्यामुळे पैसे न घेता किंवा कोणत्याही अमिशाला बळी न पडता आपल्या सदविवेक बुध्दीने योग्य त्या उमेदवाराला मत देणे ही मतदाराची जबाबदारी आहे. मतदार म्हणून उमेदवाराला मत देण्यापूर्वी त्यांच्या कामगिरीचे सर्वेक्षण करणे आवश्यक आहे. या आधी आपण निवडून दिलेल्या लोकप्रतिनिधीने गेल्या पाच वर्षात लोकसभेत किती आणि कोणत्या विषयावर प्रश्न विचारुण निराकरण करुण घेतले हे लक्षात घेतले पाहीजे. त्यांनी आपल्या अपेक्षा पुर्ण केल्या आहेत का? लोकउपयोगी जिवनावश्यक वस्तूचा पुरवठा अखंडीत केला आहे का?

प्रत्येकाच्या वस्तूचा पुरवठा प्रत्येकाच्या हाताला काम दिले आहे का? पिन्याचे पाणी विज, रस्ते वाहनाची साधने या अत्यंत गरजेच्या सोयी पुरवल्या आहेत का? या प्रश्नाचा मागोवा घेत असतांना या प्रश्नाची उत्तरे नाही असी असल्यास परत त्याच उमेदवाराला तुम्ही मत देणार आहात का? स्वत:लाच विचारायला हवा नुसत्या भेटीगाठी आश्वसने आणि आर्थिक मदतीचे आमिष देणाऱ्यांनाच पुन्हा मत दयाचे का? हे प्रश्न प्रत्येकाने स्वत:लाच विचारुन त्यांची उत्तरे शोधायला हवीत. गेल्या निवडणूकीत जर तुम्ही चुकीच्या उमेदवाराला आपले अमूल्य मत दिले असेल तर ही चूक सुधारण्याची संधी या निवडणूकीव्दारे तुम्हाला मिळणार आहे.

प्रत्येक उमेदवाराचे प्रगतिपुस्तक तुमच्यासमोर असते ते पाहून कोणाला मतदान करायचे हे ठरविण्याचा अधीकार तुमचा आहे. फक्त गरज आहे ती योग्य निर्णय घेण्याची. अनेकजन वारंवार स्वत:च्या अधिकाराची आणि अपेक्षांची मागणी सरकारकडून करत असतात. मात्र आपलेही देशासाठी काही कर्तव्य आहे, याचा त्यांना विसर पडलेला असतो. विशेषत: निवडणूकीच्या वेळी कोणीही निवडूण आला तरी आपल्या आयुष्यात काय फरक पडणार आहे! ही मानसीकता बदलण्याची गरज आहे. त्यासाठी प्रत्येकाने मतदानाचा हक्क बजावलाच पाहीजे '' ठेविली अनंते तैसेची राहावे'' या मानसिकतेतूण बाहेर पडले तर अशक्य ते शक्य करता येईल.

भारत हा जगातील प्रबळ लोकशाही राबविणारा एक प्रमुख देश आहे. एवढया मोठया देशातील सार्वत्रीक निवडणूका आणि त्या समर्थरित्या नियोजन पध्दतीने पार पाडण्याची भारताच्या निवडणूक आयोगाची क्षमता. आणि प्रचंड यंत्रणा हा जागतिक पातळीवरील एक विशेष गैरवाचा विषय झाला आहे. दर पाच वर्षानी येणाऱ्या लोकसभेत आणि विविध राज्याच्या सावत्रिक विधानसभा निवडनूकीची यंत्रणा राबविणे ही सर्वसाधारण गोष्ट निश्चित नाही. त्यामुळे जगातील अनेक देश भारताच्या निवडणूक यंत्रनेमुळे प्रभवित होऊन स्वत:च्या देशातील निवडणूकासाठी भरताचे मार्गदर्शन घेण्यासाठी पुढे येऊ इच्छितात. याबाबत आपण लक्ष केंद्रीत करणे आवश्यक आहे. आणि आपल्या मताचे महत्व काय आहे हे जाणणे पण तेवढेच महत्वाचे आहे. मी एकटयाने मतदान नाही केले तर काय फरक पडतो! मतदाना निमित्य सुटी आहे या सुटीचा आनंद उपभोगण्यासाठी कुठेतरी सहल काढूया हे विचार म्हणजे नाकर्तेपनाचा कळसच '' पण थेंबे थेंबे तळे साचे" या उत्कीप्रमाणे एका—एका मतानेच मताचा डोंगर उभा राहतो. त्यामुळे प्रत्येक व्यक्तीने मतदान करुया. आपला मतदानाचा हक्क बजावण्या बरोबरच लोकशाही अधीक सक्षमक करण्यासाठी आपलाही खरीचा वाटा आपण देऊया ही बाब गांभिर्याने लक्षात घ्यायला हवी. थोडक्यात परिवर्तन घडविण्याची ताकद तरुणामध्ये आहे. म्हणून आपण त्यांना संधी दिली पाहीजे.

देशात एकता असेल तरच खरे राष्ट्र निर्माण होईल. परंतू या सक्षम राष्ट्र निर्मितीच्या कार्यात युवकांची भुमिका महत्वाची ठरणार आहे. म्हणून युवकांनी विविध माध्यमातूण योगदाण देणे गरजेचे आहे. आजचा युवक अत्यंत बुध्दीमाण आणि कुशल असूण काहीतरी नविन करण्याची स्वप्न बाळगून आहे. आजच्या युवकांना स्वत:चे मत आहेत. तसेच त्यांना व्यवस्थे विषयी आदर

असून काही तरी नवे करण्याची त्यांच्या मनात रग आहे. देशाच्या व्यवस्थेचा वापर व्हावा अशी यूवकाची इच्छा आहे. लोकशाही जपायची असेल तर ती कधी आपल्या जगण्यात रुजवायला हवी. घटनेत उल्लेख केलेल्या स्वातंत्र्य, समता, बधुता आणि न्याय या मुल्याच्या आधारे ती जगण्यात आणता येईल. त्या आधी तरुण पिढीनं आपलं नांव मतदानयादीत नोंदवायला हवं आणि मतदानही करायला हवं.

लोकशाही सक्षमीकरणाच्या या प्रक्रियेत तरुणांनी मोठया प्रमाणात भाग घेतला पाहिजे. यासाठी भारत निवडणूक आयोगाने प्रत्येक शाळा अणि महाविद्यालयाला निवडणूक साक्षरता मंच स्थपन करण्यांचे आदेश दिले आहेत. त्यानुसार महाराष्ट्रातील मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने माहिती पुढाकार घेवूण तरुणांना मोठया प्रमाणात एकत्रीत करण्याचे याव्दारे त्यांचे कार्य चालू आहेत.

लोकशाही म्हणजे केवळ मतदान, निवडणुका, शासन व्यवहार, न्यायालय नव्हे हे लोकशाहीचे केवळ राजकीय रुप आहे. लोकशाही हा जिवनमार्ग व्हायचा असेल तर ती समाजाच्या विभिन्न क्षेत्रात पोहचली पाहीजे. अगदी आपल्या कुटूंबात देखील ! आज भारतीय लोकशाहीपुढे अनेक आव्हाने आहेत. यांचा बीमोड करायचा तर नागरीकांनी लोकशाही मुल्य म्हणजे स्वातंत्र्य, समता, बधुता, न्याय, या मुल्यांना प्राधान्य देणाऱ्या लोकप्रतिनिध ीची निवड केली पाहिजे. तरच डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी म्हटल्याप्रमाणे राजकीय लोकशाहीचे सामाजिक लोकशाहीत रुपांतर होऊ शकते. आपले कर्तव्य आपण जाणले पाहीजे. १५ ऑगस्ट स्वातंत्र्यदिन अणि २६ जानेवारी प्रजासत्ता दिन या दिवशी प्रत्येक भारतीयांच्या मनात राष्ट्रप्रेम, राष्ट्रभक्ती ओसंडून वाहत असते. नैसर्गीक आपती असो किंवा युध्दजन्य परिस्थिती असो प्रत्येक भारतीय नागरिक देशप्रेमाणे भरावूण जावून मदत करतो. तसेच मतदानाबाबतही लोकांच्या मनात अशी कतर्व्य भावना निर्माण होण्याची नितांत गरज आहे. भारत निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार दरवर्षी २५ जानेवारी हा दिवस राष्ट्रीय मतदार दिवस म्हणूण साजरा केल्या जातो.

My Vote is my Future
Power of one Vote
Was also launched to reiterale the
improtante of every Vote

■■■■

## Social Worker Means.......



Being a Social Worker Means....
You Will never be bored,
You Will always be Frustrated.
You will be Surrounded by Challenges,
So Much to do and in so Little time.
You will Stepin to Peoples Lives
And you will bless You.
Some Will Curse You
You Will See People at Their Worst
And at Peoples Capacity For
Love Courage and Endurance.
You Will See Life Begin.... And end.
You will experience resounding toiumphs
And devastating failures
You will Cry a lot
You Will know what it is to be human
And to be human.

**Ku. Yamini y. Gawande,** M.S.W.II



## RAPE

She Wears a Saree, She Gets Rape
She Wears Jeans Top, She gets Raped.
She Wears School Dress, She Gets Raped.
So Dude, Problem is not With her dressing.
She is Seven, She Gets Raped.
She is Seventten, She gets Raped.
She isSeventy, She gets raped.
So Dude, problem is not With he age.
There is no Problem in her.
Problem is in the Mentality of Some People.

**Neha Aashokrao Daiwalkar** M.S.W.II

# तरुण मतदार आणि निवडणुका

**श्रद्धा मनोज बैले** (एम.एस.डब्ल्यु २ सेमिस्टर)

तु लढला नाहीस तरी चालेल
पण विकला जाऊ नकोस.

डॉ.बाबासाहेब आबेडकरांच्या या विचाराला आज तरुण मतदार विसरत चालला आहे. आणि भ्रटाचाराच्या वाटयाला लागला आहे. गेल्या काही दिवसात निवडणुकीच्या निमित्याणे विविध गोष्टी बघायला मिळत आहेत. या सगळयामध्ये तरुण मतदार हा एक विशेष भाग आहे. हा तरुण मतदार यंदाच्या निवडणुकीचे चित्र बदलणार का हे पाहायचे आहे. पण तरुण मतदाराच्या मणात काय चाललय हे त्यानाच माहीत. लोकशाहीमध्ये लोकांना आवडेल ते काम करण्याची मुभा स्वातंत्र्य आणि सोयी असण हेच जास्तीत जास्त अपेक्षीत आहे.

आजचा तरुण मतदार हा झोपी गेला आहे. त्याला देशामध्ये काय चालु आहे याच भानच नाही. १८ वर्षावरील असे कितीतरी मतदार आहेत की, ज्यांनी आपल्या नावाची अजुण पर्यत मतदान यादीमध्ये नोंद केलेली नाही. त्यांना हे ही माहीती नाही की ते आपला मतदानाचा हक्क गमावत आहेत. आणि या सर्वामध्ये तो स्वत:चे नुकसान मोठया प्रमाणात करत आहे व देशाचे सुध्दा नुकसान करत आहे.

**तुमचे मत तुमचा अधिकार,**

या घोषवाक्याद्वारे अनेकदा तरुण मतदाराला जागरुक केले जाते. जेनेकरुण तो तरुण मतदार हा वंचीत नाही राहीला पाहीजे त्याला योग्य व्यक्ती हा निवडून देता आला पाहीजे. तरुण मतदारांना राजकीय प्रक्रीयेत सहभागी होण्यास प्रोत्साहीत करण्यासाठी भारत सरकारने दरवर्षी २५ जानेवारी हा दिवस राष्ट्रीय मतदार दिवस म्हणूण साजरा करण्याचा निर्णय घेतला आहे. आयोगाच्या स्थापना दिनानिर्मीत्य २५ जानेवारी २०११ पासून याची सुरवात करण्यात आली आहे. १८ वर्षे वयाच्या मतदारांच्या सर्वेक्षणातून असे निदर्शनात आले की, ते मतदार यादीत आपले नाव नोंदवण्यात कमी रस दाखवतात. त्यांच्या नाव नोंदणीची पातळी २० ते २५ टक्यापर्यंत कमी होते. या समस्यला प्रभावीपणे समोरे जाण्यासाठी निवडणूक आयोगाने देशभरातील प्रत्येक ८.५ लाख मतदार केंद्रावर दरवर्षी १ जानेवारी रोजी १८ वर्षे पुर्ण करणाऱ्या सर्व पात्र उमेदवारांची ओळख पटवीण्यासाठी जोरदार कसरत सुरु करण्याच्या निर्णय घेतला आहे. या उपक्रमामुळे तरुणंना सक्षमीकरण अभिमानाची भावना आणि मतदानाचा हक्क बजावण्यासाठी प्रेरण मिळाली असेल अशी अपेक्षा आहे.

लोकशाही जपायची असेल तर ती आधी आपल्या जगण्यात रुजवायला हवी. घटनेत उल्लेख केलेल्या स्वतंत्र्य,समता, बंधुता, न्याय या मुल्यांच्या आधारे ती जगण्यात आणता येईल. त्या आधी तरुण पिढीने आपले नाव मतदारयादीत नोंदवायला हवे. तरुणाची लोकसंख्येची टक्केवारी जेव्हा मतदार यादीतील शंभर टक्के प्रतिबिंबीत होईल तेव्हाच तरुण पिढीने लोकशाही व्यवस्थेत सहभागी होण्याची पहीली पायरी पुर्ण केली असे म्हणता येईल. आजची पिढी मोठया प्रमाणात टेक्नोसॅव्ही आहे. ज्यांच्याकडे स्मार्ट फोन किवा इंटरनेटची सुविधा नाही अशा तरुण तरुणीना आपआपल्या परीसरातील मतदार नोंदनी कार्यालयात जाउन अर्ज क्र. ६ भरुण नाव नोंदणी करण्याचा पर्याय आहे. नाव नोदणीचा अर्ज भरतांना काही अडचन आल्यास, एखादा मुददा समजला नाही तर सीईओ महाराष्ट्र यु टयुब चॅनलला भेट देउन अर्ज क्रमांक सहा पाहू शकतो. तरीही काही तरुण मतदार यादीमध्ये नाव नोंदवित नाही. आणि मतदानाचा हक्क बजावत नाही. काही तरुन मतदार मतदान नोंदी मध्ये नाव असुन सुद्धा मतदान करायला जात नाही.

तरुण मतदाराच्या या हलगर्जीपनामुळे आज देशामध्ये बेरोजगारी मोठया प्रमाणत वाढल्याचे दिसुन येते. भारताचे प्रस्ताविक नागरीक अनेक समस्याना बळी पडतो. पाणी सार्वजनीक स्वच्छता, खंडेमुक्त रस्ते, गुणवत्तापुर्वक शिक्षण, चांगली आणि परवडणारी घर, प्रवास, प्रसन्न बागा, सुसज्य आणि प्रसन्न रुग्नालय पात्रतेनुसार रोजगार या सर्व गोष्टी कुठेतरी व्यवस्थीत मिळत नाही आहे व या सर्व गोष्टीला तरुण मतदार हा दोषी आहे. कारण तो समोर येत नाही आणि स्वत:चे मत मांडत नाही त्याला थोडे पैसे मिळाले की तो समाधानी होउन जातो. लोकशाही सक्षमीकरणाच्या

या प्रक्रीयेत तरुनांनी सजग होउन मोठया प्रमाणात भाग घेतला पाहीजे. यासाठी भारत निवडणूक आयोगाने प्रत्येक शाळा आणि महाविद्यालयामध्ये निवडणूक साक्षरता मंच स्थापन करण्याचे आदेश दिले आहेत. जोपर्यंत तरुण पिढी पुढारि घेणार नाही तोपर्यत अशी मंडळ ख–या मार्गाने सक्रीय होणार नाही तोपर्यंत आपली शाळा महाविद्यालयात शिकणारी उदयाची पिढी लोकशाहीत साक्षर होणार नाही.

एका एका मताने बनते–पडते सरकार
म्हणून तुम्ही तुमचे मत करु नका बेकार
आपले मत आपला आवाज.

या घोषवाक्याचे महत्व हे आजच्या तरुण पिढीला समजायला हवे वोट दयायला जायला हवे. आणी आपले कर्तव्य बजवायला हवे

शिक्षण हा व्यवस्थेचा पाया मानून जर आपण चाचलत राहीलो तर खूपशा गोष्टी बदलतील पन खुपशा प्राथमिक सुविधाकडे आपण लक्ष देऊ शकत नाही. अगदी साध्या गरजा पुर्ण करु शकत नाही या बद्दल तरुण मतदाराच्या मनात राग आहे रस्ते चागले नाही या बद्दल तरुण अस्वस्थ आहे. खूप देशामध्ये उत्तम दर्जाचे रस्ते अनुभवायला मिळतात मग माझ्या देशात का नाही? माझ्या देशात पाणी विकत घेउन पिण्याची वेळ का यावी? माझ्या देशात विज पुरवठा कायम स्वरुपी का नसावा? असे प्रश्न तरुनांच्या मनात आहे आपला देश खुप विशाल आहे विविध संस्कृतिक जाती धर्म पंथ येथे एकत्र आहेत. मग हे आणी असे अनेक प्रश्न सोडवतांना अडचणी येणारच, वेळ लागणारच पन त्यासाठी कायमस्वरुपी निष्ठेने एकाग्रतेने प्रयत्नशील विचाराने आणी लोकांना विश्वासात घेऊन काम करतांना कुणी दिसत नाही कायम किहीतरी लपवून ठेवायच अशी वेगळीच अक्कल आपल्याकडे आहे मला सता मिळाली नाही तरी चालेल पण मि माझ्या प्रमाणासाठी कायम काम करेन असा सागणारा एक तरी नगरसेवक भेटेल का? मी सत्तेवर नसेन आणी एवढी बेकायदेशिर गोष्ट घडली तर मि नैतीक जबाबदारी घेऊन राजीनामा देतो अस सागणारानेता आहे का? आपल्यावर आरोप झाले तरी आपल्याला लाज वाटत नाही आणी आपन निर्लज्यपने सत्तेचा उपभेग घेत राहतो अशी मानसीकता कशी असु शकते राजकारण आणी समाजकारण यांचे फायदे आणी अपली मते यानाच मिळते.

पन सगळया गोष्टी अत्यंत वाईट आणी निराशाजनक आहेत अस नाही अरविंद केजरीवाल सारख्या लोकांनी लोकशाहीच्या मार्गाने संत्तांतर करुण दाखवल इे अभिनंदनिय आहेच स्वच्छ चारिन्र्याचे शिकलेले सर्वागीन प्रगती अणी देशाला कुठे नेण्याचा विचार करणारे नेते लोकांना आवडतात आणी तरुण मतदार याच शोधात आहेत. कुणीतरी एक माणूस देशाचा पंतप्रधान व्हावा म्हणुन तरुण मतदार एका ठरावीक पक्षाला मतदान करणार नाही कारण तो सर्वागीन विचार करणा–या उमेदवाराच्या शेधात आहे मात्र तोच एक माणूस देशाला पुढील पाच वर्षे र्स्थैर्य प्रगती संरक्षण योजना अंमलबजावणी कायदा आणी सुव्यवस्था देणारा असेल आणी देशाबददल प्रंचड गतीमान आणी आदर बाळगु शकत नसेल याची खात्री पटली तर तरुन मतदार त्या एक मानसाला पंतप्रधान बनविण्यासाठी मतदान करतील.

आपल्या आसपास खुप छोटे छोटे देश नाहीत गरीब आहेत पन प्रचंड स्वभिमानी आहेत दुस–याची मदत घेतांना पण लाचार नाही होत गरीबीत राहतात पण स्वाभिमानांणे राहतात. एक तरुण मतदार म्हणुन मला माझ्या नेत्याकडून देशाप्रति प्रचंड स्वाभिमानाची अपेक्षा आहे १० सिलेडर किवा १२ सिलेंडर झाल की नाही संपत्ती एक लाख आहे कि १०० कोटी घराण्याचा वारसा आहे किवानाही त्यांचा झेडा हिरवा आहे भगवा आहे की बहूरंगी आहे यांच्याशी मला काडीचेही देणे घेणे नाही नाही. एखादया मुलीवर बलात्कार झाला तर त्याला ताबडतोब फाशीची शिक्षा दिली जावी.

देशाप्रति अभिमान प्रगतीचा ध्यास आणि शिस्तबध्द अमंलबजावणी करणारा नेता मला हवा आहक आणी याबद्ल कोणतेही ब्वउचतउपेम आजच्या तरुण मतदार करणार नाही अशी माझी इच्छा आहे.

लोकशाही म्हणजे केवळ मतदान निवडणूका, शासनव्यवहार, न्यायालय नव्हे हे लोकशाहीच केवळ राजकीय रुप आहे लोकशाही हा जिवनमार्ग व्हायचा नसेल तर ति समाजाच्या विभिन्न क्षेत्रात पोहचली पाहीजे अगदी आपल्या कुटूबात देखील ती पोहचली पाहीजे आज भरतीय लोकशाहीपुढे अनेक आव्हान आहेत त्याचा बिमोड करायचा तर नागरीकांनी लाकशाही मुल्य म्हणजेच स्वतंत्र्य, समता, बधुता, व्याम शांतता विकास मानवतावाद या मुल्यांना प्रधान्य देणा–या लोकप्रतिनिधीची निवड केली पाहीजे तस झाल तरच घटनाकार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी म्हटल्याप्रमाणे राजकीय लोकशाहीच सामाजीक लोकशाहीत रुपांतर होईल.

■■■■

# मी मताधिकार बजावणार काय

**कु. प्राची पु. वाघ** (एम.एस.डब्ल्यु २ सेमिस्टर)

मी मताधीकार बजावणार काय ....
निळया शाईचा डाग बोटावर लहान,
पुरेसे होते धुवायला देशाची घाण!
म्हणून सुजाण नागरीकांनी,
केले पाहीजे मतदान.....!

इमारत भक्कम व्हायची असेल तर तिचा पायाही भक्कम असायला हवा. सुदृढ लोकशाहीच्या उभारणीचा पाया हा फक्त आणि फक्त मताधीकार असतो. मतदानाचा अधीकार हा सर्व नागरीकांना मुलभूत अधिकार आहे. आणि ते प्रत्येक नागरीकांचे आध्य कर्तव्य आहे. मतदानाचा हक्क मिळाल्याने बहुधा देशाच्या प्रगतीत आपला वाटा आहे याची जाणीव होते मतदानाचा अधीकार असलेल्या प्रत्येक व्यक्तीने मतदान केले पाहीजे असे माझे मत आहे कारण तो आपला हक्क आहे.

आपल्या मताचे दान,
आहे लोकशाहीची शान!

आज जगातील एका मोठया लोकशाही देशाची एक समर्थ निवडणूक यंत्रणा असलेल्या भारतातील निवडणुकांना ग्रहन लागले आहे ते मतदाणाच्या बेफिकरीने व त्यामुळे होणा–या कमी मतदानाचे सरकार निवडण्याच्या प्रक्रियेत भाग राज्यव्यवस्थेचा उपभोग घेण्याचा आपल्याला केवळ नैतिकच नव्हे तर वैधानिकही अधिकार ठरत नाही.

आजही बरेच लोक मतदानाला जात नाहीत. त्यांना असे वाटते की, आपल्या एका मताने असा किती फरक पडणार आहे?

पण ते कदाचीत विसरतात की थेबे थेबे तळे साचते आजकाल निवडणूकामध्ये अनेकदा अनेक पंक्ष गुन्हेगारी प्रतिमेच्या उमेदवारांना ना तिकिट देतात त्याच्ययावर बलात्काराचा किवा खुणाचा आरोप असला तरी कधी–कधी असे लोक निवडुण आणून संसद भवनापर्यंत पोहचतात. आता प्रश्न पडतो की त्यांना जिकवण्याचे श्रेय कोणाला घ्यावे? ज्यांनी मतदान केले त्यांना की ज्यांनी मतदान केले नाही त्यांना विचार करण्याची गरज आहे.

राष्ट्र आपुले
बनवूया शक्तीशाली
सुदृढ–सक्षम राष्ट्र उभारू लोकशाही
हीच आहे नैतिक जबाबदारी आपुली......

मतदानाची सतत चढती टक्केवारी हेच खरेतर सुदृढ व पौढ लोकशाहीचे लक्षण समजले पाहीजे याचा भाग होणे ही माझ्यासाठी एक अभिमानास्पद गोष्ट आहे. म्हणुनच मी मताधीकार बजावनार !

■■■■

## Without You.....

The Color of the rainbow
Feel pale
Without you
They wait every day
It Feels stranye
Without You....
The ray of the eveing
Feels faint
Without You....
The Full Moon Sunds Like a new Moon
Without you...
This is the Mianing of mmy
Smile feels gone
Without You....
All My own existence
Feels Gone
Without You...

**Unnati Kamdi,** M.S.W.I



# विविध समित्याचे अहवाल सत्र २०२२-२३

## प्रचार समिती : प्रा. नरेश पाटील

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज टेक्नीकल अँड एज्युकेशन सोसायटी गणेशपेठ, नागपुर द्वारा संचालित आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपुर विद्यापीठ संलग्नीत कुंभलकर कॉलेज ऑफ सोशल वर्क ,वर्धा अंतर्गत समाजकार्य पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम चालविले जाते. महाविदयालयात प्राध्यापक कामकाजाचे वार्षिक नियोजन करून वेगवेगळया समित्या तयार करण्यात येतात. त्यानुसार शैक्षणिक सत्र २०२२-२३ मध्ये प्रचार समितीचे समन्वयक प्रा. नरेश पाटील तर सदस्य म्हणुन प्रा.महादेव चुंचे यांच्यावर जबाबदारी सोपविण्यात आली.

शैक्षणिक सत्र २०२२-२३ मध्ये सत्राच्या सुरूवातीला महाविदयालयाचे प्राचार्य डॉं. चंदू पोपटकर याच्याषी चर्चा करण्यात आली त्यानंसार असे ठरविण्यात आले की महाविदयालयात होणारे विवीध कार्यक्रम तसेच विवीध घडामोडी यांचे वार्ताकंन वेळच्यावेळी करण्याचे ठरविण्यात आले.

महाविद्यालयात होणारे विवीध कार्यक्रमाची संबधीत समन्वयक साधी बातमी तयार करून आणि त्यानंतर प्रचार समिती समन्वयक प्रा. नरेष पाटील तर सदस्य प्रा.महादेव चुंचे यांनी बातमी व्यवस्थित करून प्राचार्या ला दाखवून चर्चा करून विवीध वर्तमानपत्राच्या कार्यालयाला बातमीचे मेल पाठविण्यात आले. महाविदयालयाच्या विवीध घडामोडी च्या बातम्या प्रकाशित करण्याचे काम समितीने केले

## राष्ट्रीय सेवा योजना : प्रा.गजानन जाधव

कुंभलकर कॉलेज ऑफ सोशल वर्क, वर्धा राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या अंतर्गत राष्ट्रीय सेवा योजना पथकामध्ये १०० स्वयंसेवक सहभागी झाले असून त्यामध्ये ३५ मुले ६५ मुलींचा समावेश आहे. याशिवाय कार्यक्रम अधिकारी म्हणून प्रा.गजानन जाधव आणि सदस्य डॉ. पूनम येसंबरे यांची नियुक्ती करण्यात आली. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपुर विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या निर्देशानुसार महाविद्यालयात खलील नियमित कार्यक्रम घेण्यात आले.

**माझी वसुंधरा अभियान पर्यावरण जनजागृती व स्वच्छता सप्ताह : ७ ते १३ जून २०२२**

दि.७ ते १३ जून २०२३ या कलावधीत महाविद्यालयात माझी वसुंधरा अभियान अंतर्गत १) पर्यावरण संरक्षण व संगोपन याविषयी जनजागृती करणे . २) स्वच्छतेचे महत्व पटवून देणे म्हणून पर्यावरण जनजागृती व स्वच्छता सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. दि ७ जून रोजी पर्यावरण जनजागृती व स्वच्छता सप्ताह कार्यक्रमाची सुरवात करण्यात आली.महाविद्यालयातील ग्रंथपाल डॉ. वर्षा पाटील यांनी पर्यावरण संरक्षण व संगोपन तसेच स्वच्छतेचे महत्व पटवून दिले. त्यानंतर राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी ८ ते १३ जून २०२३ या कलावधीत महाविद्यालयातील परिसर तसेच इतर ठिकाणी स्वच्छता अभियान राबवून वृक्षारोपण केले.

**आंतरराष्ट्रीय योग दिन : २१ जून २०२२**

महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने दि.२१ जून २०२२ रोजी आंतरराष्ट्रीय योग दिन कार्यक्रम घेण्यात आला. महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्माच्यार्‍यांनी सकाळी ८:३० ते ९:३० पर्यंत विविध योगासने केली.महाविद्यालयाचे प्रा. विलास बैले यांनी योगासनातील विविध प्रकारची माहिती दिली. तसेच पर्वतासण भुजंगासन धनूरासन पद्मासन ताडासन या आसनांचा सराव व सूर्यनमस्कार आणि प्राणायम घेवून आंतरराष्ट्रीय योग दिन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.कार्यक्रमाला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी सहभाग घेतला.

**वन महोत्सव आठवडा : ०१ ते ०७ जुलै २०२२**

महाविद्यालयात दि.०१ ते ७ जुलै २०२२ दरम्यान वन महोत्सव आठवडा राबविण्यात आला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंदू पोपटकर यांच्या हस्ते वृक्षारोपण करून या सप्ताहाची सुरवात करण्यात आली. रोजी साजरा करण्यात आला. दि.०१ ते ७ जुलै २०२२ दरम्यान महाविद्यालयाच्या परिसरात काही झाडे लावण्यात आली. तसेच महाविद्यालयातील ग्रीन क्लब अंतर्गत राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी आपआपल्या गावात विविधा ठिकाणी वृक्षारोपण केले.

**हर घर तिरंगा अभियान : १२ ते १५ ऑगष्ट २०२२**

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सव प्रसंगी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपुर विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना विभाग अंतर्गत महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने हर घर तिरंगा अभियान दि.१२ ते १५ऑगष्ट २०२२ दरम्यान राबविण्यात आले. दि.१२ ऑगष्ट रोजी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंदू पोपटकर आणि राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा.गजानन जाधव यांच्या हस्ते भारतीय ध्वज वितरित करण्यात आले. दि.१३ ते १५ ऑगष्ट २०२२ दरम्यान दररोज महाविद्यालयातील

विद्यार्थ्यांनी दररोज आपआपल्या घरावर तिरंगा फडकवून स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सव साजरा केला. तसेच महाविद्यालयात देखील दि.१३ ते १५ऑगष्ट २०२२ दरम्यान

**स्वातंत्र्य दिन : १५ ऑगष्ट २०२२**

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सव प्रसंगी महाविद्यालयात दि.१३ ते १५ऑगष्ट २०२२ दरम्यान हर घर तिरंगा अभियान राबविण्यात आले.दि.१३ ते १५ऑगष्ट २०२२ दरम्यान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंदू पोपटकर यांच्या हस्ते दररोज ध्वजारोहन करून महाविद्यालयात ७६ वा स्वातंत्र्य दिन महाविद्यालयात आला.

**आंतरराष्ट्रीय युवा दिन : १२ ऑगष्ट २०२२**

महाविद्यालयातील रेड रीबण क्लब च्या वतीने दि. १२ ऑगष्ट २०२२ रोजी रा .से. यो. विभाग अंतर्गत महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय युवा दिन साजरा करण्यात आला. या आंतरराष्ट्रीय युवा दिन प्रसंगी महाविद्यालयातील रा .से. यो. स्वयंसेवकांनी जिल्हा सामान्य रुग्णालयाच्या वतीने राबविण्यात आलेल्या विविध स्पर्धेत सहभागी होऊन प्रशास्ति पत्रे पटकावली. या कार्यक्रमाला सेवाग्राम रुग्णालयातील जया बांगडे आणि किरण बोबडे उपस्थित होते.

**शिक्षक दिन ५ सप्टेंबर २०२२**

५ सप्टेंबर २०२२ रोजी विद्यार्थ्यांद्वारे महाविद्यालयात स्वयंशासन कार्यक्रम राबवून शिक्षक दिन साजरा करण्यात आला. स्वयंशासन अंतर्गत विद्यार्थ्यांनी प्राचार्य आणि प्राध्यापकाच्या भूमिका साकारून अध्यापणाचे कार्य पूर्ण केले. रा .से. यो. कार्यक्रम अधिकारी प्रा.गजानन जाधव आणि डॉ. कमल पोटदुखे यांनी शिक्षकाची भूमिका या विषयावर मार्गदर्शन केले.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.चंदू पोपटकर तर प्रमुख पाहुणे प्रा.किशोर ढोबळे डॉ.पूनम येसंबरे आणि प्रा. उमेश उइके उपस्थित होते. या कार्यक्रमास महाविद्यालयातील सर्व कर्मचारी उपस्थित होते.सुत्रसंचालन प्राप्ती कमडी यांनी केले तर आभार शंकर मंदे.यांनी मानले.

**स्वच्छता ही सेवा मोहीम महात्मा गांधी जयंती : १५ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२२**

१५ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर२०२२ या कलावधीत स्वच्छता ही सेवा मोहीम महाविद्यालयातील रा .से. यो. विभागाच्या वतीने ग्रामीण भागात राबविण्यात आली. स्वच्छता ही सेवा मोहीम अंतर्गत मुक्तांगण आय .टी.आय टेकडी सिंधी मेघे वर्धा आणि ग्रामपंचायत वरुड या ठिकाणी रा .से. यो.स्वयंसेवकांनी संपूर्ण परिसराची स्वच्छता करून स्वच्छतेविषयी जनजागृती केली. तसेच या कलावधीत महाविद्यालयातही स्वच्छता मोहीम राबवून २ ऑक्टोबर२०२२ रोजी महात्मा गांधी जयंतीचा कार्यक्रम साजरा करण्यात आला.तसेच महात्मा गांधी पुतळयापर्यंत रॅली काढन्यात आली. कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापक

आणि शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. विद्यार्थ्यांना अल्पोपहार देवून स्वच्छता ही सेवा मोहीमेची सांगता करण्यात आली.

**राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिन २४ सप्टेंबर २०२२ :**

महाविद्यालयातील रा .से. यो. विभागाच्या वतीने दि.२४ सप्टेंबर २०२२ रोजी राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिन आणि रा.से.यो ऊदबोधन कार्यक्रम घेण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.चंदू पोपटकर तर प्रमुख पाहुणे निसर्ग सेवा समितीचे अध्यक्ष मुरलीधरजी बेलखोडे तसेच ग्रामगीताचार्य श्री. तुकाराम दादा उपस्थित होते.मा. मुरलीधरजी बेलखोडे यांनी रा.से.यो स्वयंसेवकांना समाजसेवा, पर्यावरण संरक्षण ,जल संरक्षण याविषयी मार्गदर्शन केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.चंदू पोपटकर यांनी रा.से.यो स्वयंसेवक म्हणजे अस्टौप्रहर समाजसेवेचे व्रत धारण करणारा सैनिक आहे असे प्रतिपादन आपल्या मार्गदर्शनात केले.कार्यक्रमचे प्रास्ताविक रा .से. यो. कार्यक्रम अधिकारी प्रा.गजानन जाधव यांनी केले. सूत्रसंचालन उन्नती कामडी तर आभार प्रदर्शन शुभम मडाईत यांनी केले. कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

**संविधान दिन २६ नोव्हेंबर २०२२ :**

२६ नोव्हेंबर २०२२ रोजी संविधान सन्मान दिवसाच्या निमित्ताने महाविद्यालयात संविधान प्रस्ताविकेचे सामूहिक वाचन करण्यात आले.तसेच महाविद्यालयापासून ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यापर्यंत महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसमवेत रॅली काढण्यात आली. त्यानंतर डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला माल्यार्पण करून संविधान दिनाचा समारोप करण्यात आला.

**जागतिक एड्स दिन १ डिसेंबर २०२२ :**

महाविद्यालयातील रा .से. यो. विभाग आणि रेड रिबण क्लब च्या वतीने दि. १ डिसेंबर २०२२ रोजी जागतिक एड्स दिन कार्यक्रम आयोजित करण्यात आला.जिल्हा सामान्य रुग्णालय वर्धा च्या वतीने आयोजित एड्स निर्मूलन जनजागृती रॅलीत रा .से. यो. स्वयंसेवक आणि रेड रिबण क्लब च्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. नंतर जि.प.सभागृहात आयोजित कार्यक्रमात जिल्हा सामान्य रुग्णालय वर्धा च्या वतीने रा .से. यो. कार्यक्रम अधिकारी प्रा.गजानन जाधव यांना एड्स निर्मूलन जनजागृती केल्याबद्दल प्रशस्ती पत्र देवून सन्मानित करण्यात आले.

**विज्ञान ज्योत रॅली ३० डिसेंबर २०२२ :**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपुर विद्यापीठाच्या रा .से. यो. विभागाच्या आदेशीत पत्रानुसार नागपुर विद्यापीठात होऊ घातलेल्या १०८ व्या इंडियन सायन्स कोंग्रेस चा प्रसार व प्रचार

करण्यासाठी ३० डिसेंबर २०२२ रोजी विज्ञान ज्योत रॅली काढण्यात आली. रॅलीत रा .से. यो. च्या २४ स्वयंसेवकांनी सहभाग घेतला.सोबतच रा .से. यो. कार्यक्रम अधिकारी प्रा.गजानन जाधव आणि डॉ.सुनील तोतडे यांनीही या रॅलीत सहभाग घेतला. त्यानंतर न्यू इंग्लिश स्कूल वर्धा येथे रा .से. यो .जिल्हा समन्वयक श्री तीर्थनंदन बन्नगरे यांनी १०८ व्या इंडियन सायन्स कोंग्रेस बद्दल विद्यार्थ्यांना माहिती दिली. त्यानंतर विद्यार्थ्यांना अल्पोपहार देवून या विज्ञान ज्योत रॅलीचा समारोप करण्यात आला.

**राष्ट्रीय युवा दिन १२ जानेवरी २०२३ :**

१२ जानेवरी २०२३ रोजी महाविद्यालयात राष्ट्रीय युवा दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.चंदू पोपटकर तर प्रमुख पाहुणे डॉ.महादेव चुंचे, स्मिता चन्ने उपस्थित होते. डॉ.महादेव चुंचे यांनी राष्ट्रीय युवा दिन विषयी स्वामी विवेकानंद यांच्या जीवनाविषयी माहिती सांगितली. तसेच स्मिता चन्ने यांनी राजमाता जिजाउ यांच्याबद्दल विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमचे प्रास्ताविक रा .से. यो. कार्यक्रम अधिकारी प्रा.गजानन जाधव यांनी केले. सूत्रसंचालन उन्नती कामडी तर आभार प्रदर्शन डॉ.अशोक सातपुते यांनी केले. कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

**राष्ट्रीय मतदार दिन २५ जानेवरी २०२३ :**

महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने दि. २५ जानेवरी २०२३ रोजी राष्ट्रीय मतदार दिन कार्यक्रम घेण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.चंदू पोपटकर तर प्रमुख पाहुणे म्हणून यशवंत महाविद्यालय वर्धा येथील डॉ.प्रमोद नारायने आणि डॉ.महादेव चुंचे उपस्थित होते. डॉ.प्रमोद नारायने यांनी लोकशाही बळकटीकरणासाठी मतदाराची भूमिका या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच विद्यार्थी उपस्थित होते.

**रा .से. यो.विशेष शिबीर २७ जानेवरी ते ०२ फेब्रुवरी २०२३:**

महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विशेष ग्रामीण शिबीर दि. २७ जानेवरी ते ०२ फेब्रुवरी २०२३ पर्यन्त आयोजित करण्यात आले. त्यामध्ये ५० विध्यर्थ्यांनी सहभाग घेतला. शिबिरात विद्यर्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव मिळावा यासाठी विविध कार्यक्रम घेण्यात आले. तसेच स्वच्छता अभियान,मोफत रोगनिदान शिबीर, मतदार जन जागृती असे विविध उपक्रम शिबीरादरम्यान घेण्यात आले.

**जागतिक महिला दिन ०८ मार्च २०२३ :**

दि. ०८ मार्च २०२३ रोजी जागतिक महिला दिन कार्यक्रम महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने साजरा करण्यात आला.सर्व प्रथम सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरवात करण्यात आली. कार्यकमचे प्रमुख पाहुणे डॉ.कमल पोटदुखे डॉ.वर्षा पाटील आणि प्रा. विशाखा मानकर यांनी स्त्रियांची वर्तमान काळाची स्थिति याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.तसेच प्राप्ती कामडी या विद्यार्थिनीने स्त्रियावर आधारित एक कविता सादर केली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.चंदू पोपटकर होते. कार्यक्रमचे प्रास्ताविक व सुतरसंचाळण रा .से. यो. कार्यक्रम अधिकारी प्रा.गजानन जाधव यांनी केले. तर आभार प्रदर्शन डॉ.अशोक सातपुते यांनी केले.

उपरोक्त कार्यक्रमाव्यतिरिक्त २०२२-२३ या शैक्षणिक सत्रात महापुरुषांच्या जयंती व पुण्यतिथीचे कार्यक्रम घेण्यात आले. तसेच दर रविवारला श्रमदान,स्वच्छता अभियान आणि व्यक्तिमत्व विकासाचे विविध कार्यक्रम सुद्धा घेण्यात आले.

## मतदार जागृती समिती

प्रा. नरेश वा. पाटील

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज टेक्निकल अँड एज्युकेशन सोसायटी गणेशपेठ नागपुर द्वारा संचालित आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपुर विदयापीठ संलग्नीत कुंभलकर कॉलेज ऑफ सोशल वर्क, वर्धा अंतर्गत समाजकार्य पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम चालविले जाते. महाविद्यालयात प्राध्यापक कामकाजाचे वार्षिक नियोजन करून वेगवेगळया समित्या तयार करण्यात येतात. त्यानुसार शैक्षणिक सत्र २०२२-२३ मध्ये मतदार जागृतीचे समन्वयक प्रा. नरेश पाटील यांच्यावर जबाबदारी सोपविण्यात आली.

शैक्षणिक सत्र २०२२-२३ मध्ये सत्राच्या सुरूवातीला महाविदयालयाचे प्राचार्य डॉं.चंदू पोपटकर यांच्याशी चर्चा करण्यात आली त्यानंसार सुचना काढून विद्यार्थ्यांना मतदान जागृतीच्या संदर्भात मार्गदर्शन करण्यात आले. प्रत्येक वर्गाच्या व्हाटस अप ग्रुपवर सुचना वहीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना मतदान जागृतीच्या संदर्भात प्रेरीत करण्यात आले. सत्राच्या सुरवातीला महाविद्यालयात मतदार जागृती मंचाची स्थापना करण्यात आली.

राष्ट्रीय मतदार दिवस निमित्ताने सर्व विद्यार्थ्यांना जागृत मतदार म्हणून शपथ देण्यात आली कुंभलकर कॉलेज ऑफ सोशल वर्क वर्धा येथे २५ जानेवारी २०२३ ला राष्ट्रीय मतदार दिनाच्या निमित्ताने महाविद्यालयीन मतदार जागृती समिती आणि मीडिया समितीच्या वतीने कार्यक्रम घेण्यात आला त्यावेळी मार्गदर्शक म्हणून डॉक्टर प्रमोद नारायणे बोलत होते. विचार मंचावर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर चंदू पोपटकर समिती समन्वयक सहायक प्राध्यापक नरेश पाटील, खट-उ समिती समन्वयक डॉ महादेव चुंचे उपस्थित होते

महाविद्यालयाच्या वतीने दि. ६ जानेवारी २०२३ ला मतदार

आणि निवडणूक या विषयावर कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.चंदू पोपटकर संचालक राजेश कुंभलकर, प्रा. नरेश पाटील, डॉ .रामेश्वर व्हंडकर , प्रा सतीश धवड यांची उपस्थिती होती. समाजकार्य प्रात्यक्षिक करणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या समुदायात मतदार जागृतीचे कार्यक्रम घ्यावे अशा सूचना देण्यात आल्या.

## माजी विद्यार्थी आणि शिक्षक पालक समिती

**डॉ. रामेश्वर व्हडकर**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज टेक्नीकल एण्ड एज्युकेशन सोसायटी, गणेशपेठ नागपूर व्दारा संचालीत व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर संलग्नीत कुंभलकर कॉलेज ऑफ सोशल वर्क, वर्धा येथे १९९३ पासून कार्यरत आहे. सदर महाविद्यालयामध्ये समाजकार्य पदवी, पदव्युत्तर पदवी चे अभ्यासक्रम चालविले जातात. महाविद्यालयातील शैक्षणिक कार्य व्यवस्थीत पार पाडण्याकरिता अनेक समित्या गठीत केल्या जातात यापैकी एक समिती म्हणजे माजी विद्यार्थी आणि शिक्षक पालक समिती होय. सदर समिती समन्वयक म्हणून प्रा. डॉ. रामेश्वर व्हंडकर व सदस्य म्हणून प्रा. विशाखा मानकर हे कार्यरत आहेत. या प्रमाणे समिती समन्वयक व सदस्य यांची दि. २२/०६/२०२२ रोजी सकाळी ठिक ११.३० वाजता मा. प्राचार्य समवेत घेण्यात आलेल्या सभेत ठरल्याप्रमाणे सदर समितीने कार्य केले आहे.

सदर समितीचे उद्देश लक्षात घेऊन शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये कुंभलकर कॉलेज माजी विद्यार्थी संस्थेने आणि शिक्षक पालक समितीने कार्य केले आहे. कुंभलकर कॉलेज माजी विद्यार्थी संस्थेचे सर्व शिक्षक पालक समिती अंतर्गत महाविद्यालयात दि. १८ ऑक्टोंबर २०२२ रोजी एक दिवशीय शिक्षक पालक मेळावा आयोजित करण्यात आला होता. सदर कार्यक्रमाकरिता अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंदू पोपटकर सर प्रमुख उपस्थित म्हणून प्रमुख मार्गदर्शक श्री राजेश कुंभलकर सर संचालक आर टी एम टेक्निकल एड एज्युकेशन सोसायटी नागपुर सदर पालक मेळाव्यास उत्स्फूर्तपणे पालकांनी प्रतिसाद दिला. या पालक मेळाव्यात एकूण २५ पालकांची उपस्थिती होती. माननीय प्राचार्य यांच्या समवेत विद्यार्थ्यांशी व पालकांशी महाविद्यालयीन विकासाबाबत विचार विनिमय करण्यात आले. भविष्यातही असेच योग्य ते सहकार्य मिळेल अशी अपेक्षा व्यक्त करून सदर पालक मेळावा संपन्न करण्यात आला.

कुंभलकर कॉलेज माजी विद्यार्थी मेळावा दिनांक १८ ऑक्टोंबर २०२२ रोजी महाविद्यालयात घेण्यात आला यानिमित्ताने जवळजवळ ३२ माजी विद्यार्थी या मेळाव्यास उपस्थित झाले होते विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्याकरिता माजी विद्यार्थ्यांचे सहकार्य कसे घेता येईल, विविध कार्यक्रमांमध्ये मार्गदर्शन करण्याकरिता माजी विद्यार्थ्यांना आमंत्रित करून त्यांच्या प्रात्यक्षिक ज्ञानाचा उपयोग आजी विद्यार्थ्यांना कसा करून घेता येईल याबाबत विचार विनिमय करण्यात आले व भविष्यात आजी माझी विद्यार्थी एकत्रित उपक्रम घेतला जाईल असे निश्चित करण्यात आले सर्व माजी विद्यार्थ्यांना जेवण देऊन सदर सभा संपन्न करण्यात आली

कुंभलकर कॉलेज माजी विद्यार्थी संस्थेचे संचालक मंडळ यांची वार्षिक सर्वसाधारण सभा दिनांक २१ एप्रिल २०२३ रोजी महाविद्यालयात घेण्यात आली. सदर सभेमध्ये समिती समन्वयक डॉ. रामेश्वर व्हंडकर यांनी मागील इतिवृत्त वाचून दाखवले व सभेला सुरुवात करण्यात आली. स्वर्गीय डॉ. प्रवीण वानखेडे यांच्या मृत्यूमुळे सदर रिक्त झालेल्या सभासद पदी नवीन माजी विद्यार्थ्यांची निवड करण्याकरिता माननीय अध्यक्षांच्या परवानगीने सर्वांसमोर विषयाची मांडणी केली. सर्वानुमते सदर स्व. डॉ. प्रवीण वानखेडे यांच्या जागी नवीन सदस्य म्हणून श्री. किरण मुकदम यांची निवड करण्याचे प्राध्यापक विशाखा मानकर यांनी सुचवले त्याला आशिष कुबडे यांनी अनुमोदन दिले. यानंतर कुंभलकर कॉलेज माजी विद्यार्थी संस्थेच्या एकूण कार्य स्थिती बाबत चर्चा करण्यात आली सदर सभेकरिता संचालक मंडळातील अध्यक्ष श्री विलास कांबळे काही कारणास्त उपस्थित राहू शकले नाही त्यामुळे अध्यक्षस्थानी सचिव विशाखा मानकर यांनी कार्य पार पाडले, कोषाध्यक्ष श्री आशिष कुबडे, सदस्य श्री. जावेद रिजवी, एडवोकेट पूजा जाधव, सौ सुनीता झांबरे यांची प्रमुख उपस्थिती होती. कुंभलकर कॉलेज माजी विद्यार्थी संस्थेचे सर्वसाधारण सभासद संख्या वाढवणे याकरिता महाविद्यालयात येणारे एम एस डब्ल्यू व बी एस डब्ल्यू पास आऊट विद्यार्थी यांची रितसर १०० रुपये सभासद फि घेऊ त्यांची नोंद केली जात आहे . जवळजवळ एकूण १२० माजी विद्यार्थी सदर संघटने सोबत जोडले आहेत. अशा प्रकारे कुंभलकर कॉलेज माजी विद्यार्थी संस्था व शिक्षक पालक समिती यांच्याकडून शैक्षणिक सत्र २०२२-२३ मध्ये कार्य करण्यात आले.

## ग्रामीण समाजकार्य शिबिर अहवाल

**प्रा.गजानन जाधव**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ नागपूर द्वारा संलग्नित आर.टी.एम. टेक्निकल ॲण्ड एज्युकेशन सोसायटी नागपूर द्वारा संचालित कुंभलकर कॉलेज ऑफ सोशल वर्क वर्धा च्या बी.एस.डब्ल्यू. द्वितीय वर्ष सत्र चार व एम. एस. डब्ल्यू. प्रथम वर्ष

सत्र दोन च्या विद्यार्थ्यांना ग्रामीण समाजकार्य शिबिर अनिवार्य भाग असते. शैक्षणिक वर्ष २०२२ -२३ मध्ये 'युवकांचा ध्यास ग्रामीण शहरी विकास' या उपक्रमांतर्गत ग्रामीण समाजकार्य शिबिर रोहनखेडा तालुका हिंगणघाट जिल्हा वर्धा या ठिकाणी घेण्यात आले. सदर वर्षाच्या ग्रामीण समाजकार्य शिबिराची जबाबदारी मा. डॉ. रामेश्वर एस. व्हंडकर सर समन्वयक, डॉ.कमल पोटदुखे, डॉ.अशोक सातपुते तसेच प्रा. गजानन जाधव सदस्य यांच्याकडे देण्यात आले. सर्वात प्रथम एम. एस. डब्ल्यू. भाग-१ आणि बी. एस. डब्ल्यू. भाग- २ च्या विद्यार्थ्यांना शिबिराची निर्धारित तारीख व इतर सविस्तर माहिती वेळोवेळी सूचना करून विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवले तसेच ग्रामीण समाजकार्य शिबिरा बाबत सविस्तर माहिती विद्यार्थ्यांना देण्याकरिता २५ जानेवारी २०२३ रोजी महाविद्यालयात माननीय प्राचार्य सर यांच्या अध्यक्षतेखाली उद्बोधन वर्ग आयोजित करण्यात आला होता. त्यानुसार दिनांक २७/०१/२०२३ ते ०२/०२/२०२३ युवकांचा ध्यास, ग्राम- शहर विकास या उपक्रमांतर्गत शिबिरादरम्यान राबविलेले विविध उपक्रम ग्रामस्वच्छता, महिला सक्षमीकरण, वृक्षारोपण, समाज प्रबोधन, व्यसनमुक्ती, महिला आरोग्यविषयक व महाराष्ट्र ग्राम सामाजिक परिवर्तन अभियान राबविण्यात आले. अशाप्रकारे युवकांचा ध्यास ग्रामीण शहरी विकास या उपक्रमांतर्गत ग्रामीण समाजकार्य शिबिर दिनांक २७ जानेवारी ते ०२ फेब्रुवारी २०२३ दरम्यान घेण्यात आले.

## Examination Grievance Committee
### प्रा विशाखा मानकर

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ नागपूर द्वारा संलग्नित आर टी एम टेक्निकल अँड एज्युकेशनल सोसायटी गणेश पेठ नागपूर संचालित कुंभलकर कॉलेज ऑफ सोशल वर्क, वर्धा. अंतर्गत कार्यपद्धती पदवीत्तर तसेच तत्त्वज्ञान पारंगत अभ्यासक्रम चालविले जातात महाविद्यालयात चालविले जाणारे अभ्यासक्रम व्यवस्थित पार पाडण्याकरिता विविध समित्या करण्यात येतात सत्र २०२२ - २३ मध्ये एराळपरींळेप त्रीळशींरपलश उेाळींशश ची समन्वयीका म्हणून प्रा विशाखा मानकर व सदस्य म्हणून डॉ . कमल पोटदुखे आणि प्रा. उमेश उईके यांच्याकडे सोपविण्यात आली.

समितीच्या सदस्यांनी दिनांक २०/८/२०२२ ला सभा घेऊन त्यात महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना विद्यापीठ परीक्षेच्या संदर्भात काही समस्या असल्यास त्या विद्यापीठ स्तरीय समस्यांचे निराकरण या समितीमार्फत करण्यात येईल असे या ठरविण्यात आले होते.

उदाहरणार्थ , जसे विद्यार्थ्यांचा रिझल्ट विथेल्ड मध्ये असेल, प्रात्यक्षिकाचे मार्क्स गेले नसेल, विद्यार्थ्यांच्या नावामध्ये बदल झाला असेल, विद्यार्थ्यांची मार्कशीट आली नसेल, विद्यापीठ परीक्षे संबंधात संदर्भात काही समस्या असल्यास त्या विद्यापीठ स्तरीय समस्यांचे निराकरण या समितीमार्फत करण्यात येईल असे या बैठकीमध्ये ठरविण्यात आले. परंतु सत्र २०२२- २३ मध्ये विद्यार्थ्यांना परिक्षे संदर्भात किंवा विद्यापीठ संदर्भात कोणतीच समस्या निर्माण झाली नाही करिता अहवाल सादर करण्यात येत आहे.

## निरीक्षणात्मक संस्था भेट
## मेडिकल अण्ड सायकॅट्रिक सोशल वर्क
### प्रा. डॉ. रामेश्वर व्हंडकर

**प्रस्तावना :**

कुंभलकर कॉलेज ऑफ सोशल वर्क वर्धा अंतर्गत कार्यरत एम. एस. डब्ल्यू. द्वितीय वर्षाकरिता वैद्यकीय समाजकार्य व समुदाय संघटन हे दोन विशेषीकरण चालवले जातात. एम. एस. डब्ल्यू. द्वितीय वर्षात सत्र ३ करिता च्या विद्यार्थ्यांना विशेषीकरण नुसार संस्था भेट कराव्या लागतात. या संस्था भेटी समाजकार्याच्या विविध क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या संस्थांना भेटी दिल्या जातात. शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करिता वैद्यकीय व मानसिक समाजकार्य विशेषीकरण आधारित निरीक्षणात्मक संस्था भेटी खालील उद्देशांना लक्षात घेऊन वर्धा व वर्धा परिसरातील संस्थांमध्ये आयोजित करण्यात आल्या होत्या.

**निरीक्षणात्मक संस्था भेट उद्देश –**

१) विद्यार्थ्यांच्या सुप्त कौशल्यांचा विकास करणे.
२) विविध क्षेत्रात कार्य करणाऱ्या संस्थांची ऐतिहासिक पार्श्वभूमी जाणून घेणे.
३) संस्था देत असलेल्या सेवा-सुविधा समजून घेणे .
४) संस्थेची प्रशासकीय संरचना, उद्देश, ध्येय, कार्यक्रम व कार्य व्यवस्थापन आणि आर्थिक बाजूचा सर्वांगीण अभ्यास करणे
५) विद्यार्थ्यांच्या अवलोकन कौशल्याचा विकास करणे.
६) विद्यार्थ्यांमध्ये संस्थेचे टिकात्मक परिक्षण करण्याची व मूल्यांकन करण्याची क्षमता विकसित करणे.

वरील उद्देशांच्या आधारावर एम. एस. डब्ल्यू. भाग २ सेमिस्टर ३ च्या विद्यार्थ्यांची संस्था भेटी शहरी, आदिवासी व ग्रामीण क्षेत्रांत आरोग्य विषयक कार्य करणाऱ्या संस्थांन मध्ये आयोजन करण्यात आले.

| संस्था भेटीचे नाव व पत्ता | भेटीची वेळ | भेटीचा दिनांक |
|---|---|---|
| ०१. आचार्य विनोबा भावे ग्रामीण रुग्णालय सावंगी मेघे, वर्धा | सकाळी १० ते १२ | १३/०९/२२ |

| | | |
|---|---|---|
| ०२ संत चावरा आश्रम जाम तालुका हिंगणघाट जिल्हा वर्धा | सकाळी ११:३० ते ०१:०० | १६/०९/२२ |
| ०३ डॉ. गुप्ता मानसिक आजार रुग्णालय वर्धा. | दुपारी १२ ते ०२ | २८/०९/२२ |

आचार्य विनोबा भावे ग्रामीण रुग्णालय सावंगी मेघे हे मागील अनेक वर्षापासून वर्धा व सभोवतालील अनेक जिल्ह्यांमधील नागरिकांना त्यांचे आरोग्यविषयक सेवा पुरवत आहे. ही संस्था अनेक व्यक्तींना मानसिक दृष्ट्या शारीरिक दृष्ट्या सक्षम करण्याकरिता विविध योजनांच्या द्वारे नागरिकांपर्यंत आरोग्य विषयक सेवा पुरवत आहे. आचार्य विनोबा भावे ग्रामिण रुग्णालय वर्धा जिल्ह्यातील एक मोठे व नामांकित असे मल्टी स्पेशालिस्ट हॉस्पिटल म्हणून ओळखले जाते. सदर हॉस्पिटलची विद्यार्थ्यांना माहिती व्हावी तेथील प्रशासकीय व्यवस्था, समाजकार्यकर्त्याची भूमिका, मानसिक आरोग्याच्या दृष्टीकोनातून दिल्या जाणाऱ्या सेवा सुविधा यांची ओळख होण्याच्या उद्देशाने सदर भेटीचे आयोजन या संस्थेमध्ये करण्यात आले होते. सदर भेटीदरम्यान समाज कार्यकर्ते श्री. राकेश ठाकरे यांनी विद्यार्थ्यांना सविस्तर माहिती दिली व दुसरे समाज कार्यकर्ते श्री दिपक डोंगरे यांनी सर्व हॉस्पिटल प्रत्यक्ष दाखवले व मानसिक आजार व त्याची कारणे उपचार पद्धती त्याची सविस्तर माहिती डॉक्टर प्रदीप पाटील विभाग प्रमुख मानसिक रोग विभाग यांनी सविस्तर विद्यार्थ्यांना माहिती दिली. सर्व शेवटी कु. आचल बोबडे हिनेउपस्थितांचे आभार व्यक्त केले व सदर भेट संपन्न झाली. सदर भेटी प्रसंगी एकुण ४३ विद्यार्थी आणि समन्वयक प्रा रामेश्वर व्हंडकर उपस्थित होते.

संत चावरा आश्रम जाम हिंगणघाट तहसील जिल्हा वर्धा येथे कार्यरत आहे ही संस्था वर्धा जिल्ह्यामध्ये बेवारस मनोरुगनंबाबत सेवा देतात. मानसिक आजारात ग्रस्त व्यक्ती यांना सार्वजनिक ठिकाणी भटकताना आढळून आल्यास त्यांची रीतसर पोलीस चौकीत नोंद करून अशा रुग्णांना संत चावरा आश्रम मध्ये उपचाराकरिता दाखल केले जाते. अनेक मनोरुग्ण काही दिवस उपचार घेऊन मग आपला विसरलेला पत्ता नाव गाव सांगतात व घरी वापस जातात त्यांच्या घरापर्यंत सोडण्याची व्यवस्था संस्था करते मनोरुग्णांचे योग्य पुनर्वसन करण्याचे कार्य सुद्धा संस्था अंतर्गत केल्या जाते स्त्री-पुरुषांना मनोरुग्णांना वेगवेगळ्या ठिकाणी ठेवण्याची व्यवस्था केल्या जाते अशा रुग्णांकरिता विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे सुद्धा आयोजन केले जाते तसेच विविध सण उत्सव केले जातात. दैनंदिन कार्य करण्याकरिता काही व्यक्तींची मदत घेतल्या जाते. आवश्यकतेनुसार अशा रुग्णांचे समुपदेशन व्यावसायिक पुनर्वसन योग्य पद्धतीने केल्या जाते अशा प्रकारे सविस्तर माहिती तेथील कार्य व्यवस्थापक व संस्थापक अध्यक्ष फादर वर्गीस यांनी दिली तसेच सर्व परिसर दाखवणे व योगदान सोबत मुलाखत घडून आणण्याचे कार्य तेथील सिस्टर जास्मिन मॅम यांनी केली सदर भेटीकरिता एकूण ४४ विद्यार्थ्यांनी उपस्थित दर्शवली सदर संस्था भेटीदरम्यान प्रा. विशाखा मानकर व समिती समन्वयक डॉ. रामेश्वर व्हंडकर उपस्थित होते.

वैद्यकीय मानसोपचार समाज कार्यक्षेत्रातील तिसरी निरीक्षणात्मक संस्था भेट डॉक्टर गुप्ता हॉस्पिटल वर्धा या ठिकाणी घेण्यात आली या रुग्णालया अंतर्गत मानसिक विकार ग्रस्त व्यक्तींना ओपीडी व आयपीडी या पद्धतीने उपचार दिले जातात वर्धा शहरात मध्यवर्ती ठिकाणी हे रुग्णालय कार्यरत आहे डॉक्टर गुप्ता हे संस्थापक अध्यक्ष आहेत मनोरुग्णांच्या सर्वांगीण विकासात्मक दृष्ट्या योग्य ती उपचार पद्धती समुपदेशन तसेच पुनर्वसन करण्याकरिता योग्य ते कार्य केले जाते या रुग्णालयात डॉक्टर नर्स परिचारिका समुपदेशक कार्यरत आहेत आजवर अनेक रुग्ण येथे उपचार घेऊन आज व्यवस्थित जीवन जगत असल्याचे माहिती दरम्यान सांगण्यात आले डॉक्टर मुक्ता यांनी विद्यार्थ्यांना सविस्तर माहिती दिली सदर भेटी करिता एकूण ४३ विद्यार्थी उपस्थित होते.

सदर भेटीदरम्यान विद्यार्थ्यांनी त्यांच्या मनातील शंका कुशंकांचे ची विचारणा करून डॉक्टर गुप्ता यांच्यासोबत हितगुज केले व मानसिक आरोग्य सुदृढ राखण्याकरिता सरांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच सदर संस्थेची इत्थंभूत माहिती घेऊन पुर्ण झाल्यास कु. संस्कृती पंडीत यांनी सर्वांचे आभार व्यक्त केले व सदर भेट संपन्न झाली. सदर भेटीकरिता प्रा. डॉ. रामेश्वर व्हंडकर उपस्थित होते. वरील संस्थांना भेटी देऊन विद्यार्थ्यांमध्ये समाजकार्याच्या प्रती कार्यरत असलेल्या संस्थे संदर्भात एक विश्वास संपादन करण्यात आला.

## सामाजिक प्रात्यक्षिक समिती :
### प्रा विशाखा मानकर

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापिठ, नागपूर व्दारा संलग्नित आणि आर.टी.एम. टेक्नीकल ॲण्ड एज्युकेशनल सोसायटी, गणेशपेठ, नागपूर व्दारा संचालित कुंभलकर कॉलेज ऑफ सोशल वर्क, वर्धा अंतर्गत समाजकार्य पदवी, पदव्युत्तर पदवी तसेच तत्वज्ञान पारंगत पदवीचे अभ्यासक्रम चालविले जातात.महाविद्यालयात चालविले जाणारे अभ्यासक्रम व्यवस्थित पार पाडण्याकरीता विविध समीत्या गठीत करण्यात येतात. सत्र २०२२-२०२३ मध्ये समाजकार्य प्रात्यक्षिक समिती समन्वयीका म्हणून प्रा. विशाखा मानकर व सदस्य म्हणुन प्रा. सतिश धवड हयाच्याकडे सोपविण्यात आली.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नगापूर विद्यापिठ नागपूर येथील समाजकार्य शिक्षणाच्या अभ्यासक्रमानुसार एम.एस.डब्ल्यु. आणि बि.एस.डब्ल्यू. च्या अभ्यासक्रमाचा मुख्य आत्मा असलेले क्षेत्रकार्य (समाजकार्य प्रात्यक्षिक) चे वर्षभरचे नियोजन व कार्यपध्दती ठरविण्या करीता सभा घेण्यात आली. दि .१०/०७/२०२२ रोजी कुंभलकर समाजकार्य महाविद्यालयाचे प्राचार्य चंदु पोपटकर हयांच्या अध्यक्षतेखाली समाजकार्य प्रात्यक्षिक समितीची बैठक घेण्यात आली. या सत्रातील पहिलीच बैठक असल्यामुळे या बैठकीत वर्षभर समाजकार्य प्रात्याक्षिक समितीने कशा पध्दतीने कार्य करावे याचे पध्दतशीर नियोजन करण्यात आले. यामध्ये प्रामुख्याने पदवी व पदव्युत्तर वर्गाचे समाजकार्य प्रात्यक्षिक स्कुल सेटींग तसेच कल्याणकारी संस्था, समुदाय, प्रशासकीय विभाग यामध्ये सुरू करण्याविषयी ठरले. त्यानंतर रितसर या विभागाच्या प्रात्यक्षिकासाठी परवानगी घेऊन प्रात्यक्षिक सुरू करण्यात आले.

समजाकार्य प्रात्यक्षिक समितीव्दारे महाविद्यालयात प्रथम सत्रात विद्यार्थ्यांना समजकार्य प्रात्यक्षिका संबंधी सविस्तर माहिती देण्याकरीता प्रत्येक वर्गाकरीता वेगवेगळे उद्बोधन वर्ग घेण्यात आले. त्या उद्बोधन वर्गात विद्यार्थ्यांना पुढील माहिती देण्यात आली आहे. १) समाजाकर्य शिक्षण व अर्थ २) विद्यापिठाच्या अभ्यासानुसार समाजकार्य प्रात्यक्षिकाचे उद्देश. ३) समाजकार्य शिक्षणात क्षेत्रकार्याचे महत्व. ४) समाजकार्य प्रात्यक्षिकाची कार्य पध्दत. ५) संबंधीत क्षेत्राची माहिती.६) संबंधीत क्षेत्रात काम करण्याची वेळ. अशा अनेक प्रकारची माहिती उद्बोधनाव्दारे विद्यार्थ्यांना देण्यात आली.

प्रथमसत्रात समाजकार्य प्रात्यक्षिक करीत असतांना विद्यार्थ्यांना पुढील उपक्रम राबवीले जसे. १) क्षेत्राची ओळख करून घेणे.२) क्षेत्रातील समस्यांची ओळख करून घेणे.३) क्षेत्रातील साधन सामग्रीची ओळख करून घेणे.४) क्षेत्रातील संसाधनाची ओळख करून घेणे.५) क्षेत्रातील लोकांचा विश्वास संपादन करण्याकरीता विविध जानीव जागृतीपर कार्यक्रम घेणे. बि.एस.डब्ल्यु. प्रथम, तृतीय व पाचवे सेमीस्टर तसेच एम.एस.डब्ल्यु. प्रथम आणि तिसऱ्या सेमीस्टर चे समाजकार्य प्रात्यक्षिक पुर्ण झाल्यानंतर दि. ०९/१२/२०२२ पासुन २५/०१/२०२३ पर्यत महाविद्यालयात प्दजमतदंस टपअं.अवबम (अंतर्गत मौखीक परीक्षा) परीक्षा घेण्यात आली.

व्दितीय सत्र दि. २० नोव्हे. २०२२ पासुन सुरू झाले हया सत्राच्या सुरूवातीला राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापिठ नागपूर व्दारे समजकार्य (एम.एस.डब्ल्यू. व बि.एस.डब्ल्यू.) च्या अभ्यासक्रमानुसार उद्बोधन घेण्यात आले. दि. २२ नोव्हे. २०२२ पासुन या सत्राच्या समाजकार्य प्रात्यक्षिकाची सुरूवात करण्यात आली. हया सत्रात समाजकार्य प्रात्यक्षिकाच्या अंतर्गत पुढील कार्यक्रम घेण्यात आली बि.एस.डब्ल्यु. व्दितीय, आणि चतुर्थ सेमीस्तसेच एम.एस.डब्ल्यु. व्दितीय आणि चतुर्थ सेमीस्टरचे समाजकार्य प्रात्यक्षिक पुर्ण झाल्यानंतर दि. २५/०४/२०२३ पासुन ३०/०४/२०२३ पर्यत महाविद्यालयात प्दजमतदंस टपअं.अवबम (अंतर्गत मौखीक परीक्षा) परीक्षा घेण्यात आली. प्रत्येक वर्गाचे समाजकार्य प्रात्यक्षिक झाल्यानंतर प्दजमतदंस टपअं.अवबम (अंतर्गत मौखीक परीक्षा) परीक्षा घेण्यात आली.

महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना चालू परीस्थितीचे ज्ञान व्हावे समाजात होणाऱ्या सामाजिक, राजकीय घडामोडीचे आकलन होण्याच्या दृष्टीने व समाजकार्याचे प्रशिक्षणार्थी म्हणून वैचारीक बैठक प्रबळ व्हावी, जाणीवा प्रकल्भ व्हाव्यात या दृष्टीने विविध व्याख्यान, परीसंवाद शिबीर सांस्कृतीक कार्यक्रम पथनाटय, रॅली, सभा इ. कार्यक्रम महाविद्यालयाच्यावतीने संबधीत क्षेत्रात घेण्यात आलीत. विषेश दिनाचे औचिंत्य साधून जसे...उदा. ८ ऑगस्ट क्रांती दिन १५ ऑगस्ट, महापरीनिर्वाण दिन, मतदार दिन, २६ जानेवारी असे अनेक दिवसांचे महत्व जाणुन घेण्याकरीता व थोर नेत्यांची जयंती व पुण्यतिथीवर कार्यक्रम घेवून त्यांच्या कार्यास उजाळा देण्याकरीता विविध कार्यक्रमांची आखनी करण्यात आली. अश्या रितीने सत्र २०२२-२०२३ मध्ये समाजकार्य प्रात्यक्षिक समितीचे कार्य यशस्वीपने पार पाडण्यात आली.

## कृष्णलीला करिअर गायडन्स सेंटर

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज टेक्नीकल एण्ड एज्युकेशन सोसायटी, गणेशपेठ नागपूर व्दारा संचालीत व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर संलग्नीत कुंभलकर कॉलेज ऑफ सोशल वर्क, वर्धा येथे १९९३ पासून कार्यरत आहे. सदर महाविद्यालयामध्ये समाजकार्य पदवी, पदव्युत्तर पदवी चे अभ्यासक्रम चालविले जातात. महाविद्यालयातील शैक्षणिक कार्य व्यवस्थीत पार पाडण्याकरिता अनेक समित्या गठीत केल्या जातात यापैकी एक समिती म्हणजे कृष्णलीला करियर गायडन्स सेंटर होय. सदर समिती समन्वयक म्हणून प्रा. डॉ. रामेश्वर व्हंडकर व सदस्य म्हणून प्रा. सतीश धवड, प्रा. राजेश तांडेकर , आणि प्रा. नरेश पाटील हे कार्यरत आहेत. या प्रमाणे समिती समन्वयक व सदस्य यांची दि. ३०/०७/२०२२ रोजी सकाळी ठिक ११:१५ वाजता मा. प्राचार्य समवेत घेण्यात आलेल्या सभेत ठरल्याप्रमाणे सदर समितीने कार्य केले

**समितीचे उद्देश –**

१) महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा विषयक मार्गदर्शन कार्यक्रम आयोजित करणे.

२) महाविद्यालयातील अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांकरीता कॅम्पस मुलाखतीचे आयोजन करणे.

३) विविध जॉबच्या संधी विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचणे.

४) विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाकरिता विविध कार्यक्रमांचे आयोजन करणे.

वरीलप्रमाणे सदर समितीचे उद्देश लक्षात घेऊन शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये कृष्णलीला करियर गायडन्स सेंटर यांनी या प्रमाणे कार्य केले आहे.

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा विषय असणारी भीती कमी करण्यासाठी महाविद्यालयात विविध स्पर्धा परीक्षांचे आयोजन केले जाते. कृष्णलीला करियर गायडन्स सेंटर अंतर्गत एम एस डब्ल्यू पास विद्यार्थ्यांन करीता दि. १३ मार्च २०२३ रोजी महाविद्यालयात कॅम्पस मुलाखतीचे आयोजन करण्यात आले होते. सदर कॅम्पस मुलाखती आदर्श ग्रामीण विकास संस्था औरंगाबाद या संस्थेच्या वतिने औरंगाबाद जिल्ह्यात कार्य करण्याकरिता सदर पद भरती घेण्यात आली. या मुलाखतीकरिता महाविद्यालयातील एम एस डब्ल्यू पास झालेले विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कृष्णलीला करियर गायडन्स सेंटर आणि विवेकानंद केंद्र

कन्याकुमारी शाखा वर्धा यांच्या संयुक्त विद्यमाने युवा नेतृत्व विकास उपक्रम राबविण्यात आला. सदर उपक्रमात युवकांना युवा नेतृत्व विकसन शिबिरात सहभागी होण्याची संधी व डिसेंबर २०२२ मध्ये कन्याकुमारी येथे संपन्न होणाऱ्या युवा नेतृत्व शिबिरात सहभागी होण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आली. यामध्ये बी एस डब्ल्यू तसेच एम एस डब्ल्यू च्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद नोंदवला. सदर परीक्षा महाविद्यालयात घेण्यात आली. स्वामी विवेकानंदांचे विचार विद्यार्थ्यांना माहित व्हावेत या उद्देशाने सदर परीक्षेचे आयोजन भारत भर केल्या जाते. सहभागी विद्यार्थ्यांना सहभागी प्रमाणपत्र देण्यात आले.

विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा विषय ज्ञान मिळावे याकरिता विशेष स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन कार्यक्रम २२ नोव्हेंबर २०२२ रोजी महाविद्यालयात आयोजित करण्यात आला होता सदर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंदू पोपटकर सर तर प्रमुख मार्गदर्शक श्री. अमित कावडकर संचालक संघर्ष करिअर अकॅडमी वर्धा हे होते. यांनी विद्यार्थ्यांना यूपीएससी एमपीएससी व इतर स्पर्धा परीक्षा विषयी सविस्तर मार्गदर्शन केले सर्वप्रथम विद्यार्थ्यांनी परीक्षेचा अभ्यासक्रम समजून घेणे महत्त्वाचे असते त्यानंतर नियोजनबद्द अभ्यास करणे आवश्यक असते तसेच परीक्षेदरम्यान सद्सद् विवेक बुद्धीने वेळेचे व्यवस्थापन करून परीक्षा देणे सुद्धा तितकेच महत्त्वाचे असते या प्रकारे सविस्तर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. सोबत दुसरे मार्गदर्शक श्री राजेश देठे यांनी विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेची सुरुवात कशी करावी अभ्यासाचे नियोजन गणिताविषयीचे असणारी मनातील भीती दूर करून स्पर्धा परीक्षा सहज क्रॅक केल्या जाऊ शकते याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले नियोजनाशिवाय स्पर्धा परीक्षेत यश मिळणे कठीण आहे त्यामुळे विद्यार्थ्यांनी परफेक्ट प्लॅनिंग करून त्याची तंतोतंत अंमलबजावणी करणे आवश्यक आहे असे त्यांनी सांगितले विद्या-र्थ्यांन करिता सदर कार्यक्रम खूप उपयुक्त ठरल्याचे विद्यार्थ्यांकडून समजले.

अशा प्रकारे कृष्णलीला व्यवसाय मार्गदर्शन व व्यक्तिमत्व विकास केंद्र यांच्या कडून शैक्षणिक सत्र २०२२-२३ मध्ये कार्य करण्यात आले.

## वार्षिकांक समिती : प्रा. नरेश वा. पाटील

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज टेक्निकल अँड एज्युकेशन सोसायटी गणेशपेठ नागपुर द्वारा संचालित आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपुर विदयापीठ संलग्नीत कुंभलकर कॉलेज ऑफ सोशल वर्क, वर्धा अंतर्गत समाजकार्य पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम चालविले जाते. महाविद्यालयात प्राध्यापक कामकाजाचे वार्षिक नियोजन करून वेगवेगळया समित्या तयार करण्यात येतात. त्यानुसार शैक्षणिक सत्र २०२२-२३ मध्ये वार्षिकांक समितीचे समन्वयक प्रा. नरेश पाटील तर सदस्य म्हणुन प्रा.डॉ.पुनम येसंबरे, प्रा. राजेश तांडेकर यांच्यावर जबाबदारी सोपविण्यात आली.

शैक्षणिक सत्र २०२२-२३ मध्ये सत्राच्या सुरूवातीला महाविदयालयाचे प्राचार्य डॉ.चंदू पोपटकर याच्याषी चर्चा करण्यात आली त्यानंसार सुचना काढून विद्यार्थ्यांना ऑनलाईन मार्गदर्शन करण्यात आले. प्रत्येक वर्गाच्या व्हाटस अप ग्रुपवर सुचना वहीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना संकल्प वार्षिकांकामध्ये लिहीण्यास प्रेरीत करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ओबीसी महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ.बबनराव तायवाडे, प्रमुख पाहुणे विधान परिषद सदस्य महाराष्ट्र राज्य अधिवक्ता अभिजीत वंजारी, माजी आमदार अशोक धवड, जिल्हा परिषद सदस्य सलील देशमुख, ओबीसी सेलचे प्रदेशाध्यक्ष ईश्वर रावजी बाळबुधे, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष डॉ. सरचिटणीस दिलीप पनकुळे, गुरुदेव सेवा मंडळाचे अशोक यावले, उपाध्यक्ष वनिताताई रेवतकर, सहसचिव प्रकाशजी कुंभलकर, संस्थेचे सचिव युगांतजी कुंभलकर यांच्या प्रमुख उपस्थितीत महाविद्यालयाच्या संकल्पनेचे विमोचन करण्यात आले.

महाविदयालयाच्या वतीने दि. १ऑगश्ट २०२२ र्ला संकल्प वार्शिकांक २०२१-२२ विमोचन सोहळा घेण्यात आला. यावेळी

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.चंदू पोपटकर संचालक राजेश कुंभलकर, प्रा. नरेश पाटील, यांच्या उपस्थितीत संकल्प वार्षिकांकामध्ये प्रकाशन करण्यात आले. या वर्षीचा संकल्प २०२२-२३ छापला जात असून या संकल्पाच्या प्रती लवकरच महाविद्यालयात जमा केल्या जातील. या कार्यात संस्थेचे सचिव मा. युगांतजी कुंभलकर, संचालक राजेश कुंभलकर यांच्या मार्गदर्शनाखाली व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.चंदू पोपटकर यांनी महाविद्यालयाच्या वार्षिक समितीचे सदस्य म्हणून प्रा.डॉ.पूनम येसांबरे, प्रा. राजेश तांडेकर यांनी सहकार्य केले.

## पर्यावरण समिती : प्रा. डॉ. नलिनी भगत

सत्र २०२२-२३ मध्ये पर्यावरण अभ्यास विषयाची जबाबदारी समन्वयक म्हणून प्रा. डॉ. नलिनी भगत यांच्याकडे देण्यात आली आणि सोबत सदस्य म्हणून प्रा. विलास बैले यांचा समावेश करण्यात आला. पर्यावरण हा एक विषय बी.एस.डब्ल्यु भाग-२ (sem-3, sem-4) या वर्गाला अभ्यासक्रमाअंतर्गत नागपूर विद्यापिठाने अंतर्भुत केला आहे. पर्यावरण समितीचे कामकाज समन्वयक आणि सदस्य यांनी एकमेकांच्या सहकार्याने पूर्ण केले आहे. पर्यावरण हा विषय विद्यार्थ्यांच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा आहे. यामुळे मानवाला दिलेल्या नैसर्गिक साधन सामुग्री पाणी, झाडे नदी इ. चे अपव्यय होऊ नये. निसर्गाने दिलेल्या नैसर्गिक संपदाचे जतन करावे जेणेकरुन निसर्गाचा समतोल राखला येईल.

**उदेश :**

१ पर्यावरणाविषयक जनजागृती करणे

२ पर्यावरण विषयक काम करणाऱ्या संस्थाशी जुळून राहणे.

३ पर्यावरण आणि मानवी आरोग्य, मानवी हक्काविषयी जनजागृती करणे.

४ पर्यावरण संरक्षणाविषयी कायद्याची जनजागृती करणे

५ निसर्गाच्या संसाधनाची पिढयानपिढया जवणूक करणे.

पर्यावरण अभ्यासक्रमात खालील अभ्यासक्रमाचा समावेश करण्यात आला.

पर्यावरणाविषयक जनजागृतीची गरज, व्याख्या, व्याप्ती, महत्व, पर्यावरणावर काम करणाऱ्या संस्था, पर्यावरणाशी निगडीत व्यक्ती, नैसर्गिक संसाधने परिसंस्था जैवविविधता, पर्यावरणाचा समाजीक प्रश्न आणि पर्यावरण, जलसंवर्धन, पावसाच्या पान्याचे संचयन, पाणलोट व्यवस्थापन पर्यावरण दिनी समस्या निराकरण, भावी पिढ्यांकरिता नैसर्गिक संसाधनाची जपवणूक, प्राण्यांचे अधिकार, पडीत जमीनीचा विकास पर्यावरण संरक्षण कायदे, जनजागृती, लोकसंख्या आणि पर्यावरण, कुटुंब कल्याण कार्यक्रम, पर्यावरण आणि मानवी आरोग्य, मानवी हक्क मुल्य शिक्षण, एडस् महिला व बालकल्यान, पर्यावरण शिक्षण इ. महत्वाच्या अभ्यासक्रमाचा समावेश करण्यात आला. जो की आपल्या दैनंदिन जीवनाशी निगडीत आहे. या संपूर्ण अभ्यासक्रमाची पूर्तता करण्याकरिता पर्यावरणाच्या दोन-दोन विषयाचे विभाजन करून दिले आणि या संपूर्ण अभ्यासक्रमाचे प्राध्यपकांच्या नावानिशी टाईम टेबल बनविण्यात आला. ४ींह सेम. मध्ये सर्व प्राध्यापकांनी तासिका घेऊन आपल्या अभ्यासक्रमाची पूर्तता करण्यात आली.

एकदिवसीय सहल दि.१७/०३/२०२३ ला सेवाग्राम बापुकुटी येथे आयोजित करण्यात आली. या सहलिकरिला ठिक १०:३० वा. सर्व विद्यार्थी बापुकुटी येथे हजर झाले. सर्वप्रथम संपुर्ण बापुकुटीचे निरिक्षण करण्यात आले. निरिक्षण झाल्यानंतर प्रा.प्रभाकर पुसदकर यांनी एका बापुकुटीच्या हॉल मध्ये बसवुन संपुर्ण बापुकुटीची माहिती आणि ऐतिहासिक पार्श्वभुमी सांगितली. त्याचबरोबर पर्यावरणाची माहिती देखील सांगितली. ही माहिती सगितल्यानंतर संपुर्ण विद्यार्थ्यांनी वनभोजनाचा आनंद घेतला. या एक दिवसीय सहली करिता डॉ.नलिनी भगत मॅडम व प्रा.विलास बैले हे उपस्थित होते.

बी.एस.डब्ल्यु.४ींह सेम. पर्यावरण विषयाचा पेपर दि.२६/०४/२०२३ ला घेण्यात आला. यानंतर पेपर तपासुन त्यावरुन प्राप्त झालेल्या मार्कांवरुन सर्व विद्यार्थ्यांना ग्रेडेशन ए,बी,सी असे देण्यात आले. अशा प्रकारे पर्यावरण विषयाचा अभ्यासक्रम पुर्ण करण्यात आला.

# ग्रामीण समाजकार्य  शिबिर अहवाल

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ नागपूर द्वारा संलग्नित आर.टी.एम. टेक्निकल एॅण्ड एज्युकेशन सोसायटी नागपूर द्वारा संचालित कुंभलकर कॉलेज ऑफ सोशल वर्क वर्धा च्या बी.एस.डब्ल्यू. द्वितीय वर्ष सत्र चार व एम. एस. डब्ल्यू. प्रथम वर्ष सत्र दोन च्या विद्यार्थ्यांना ग्रामीण समाजकार्य शिबिर अनिवार्य भाग असते. शैक्षणिक वर्ष २०२२ -२३ मध्ये 'युवकांचा ध्यास ग्रामीण शहरी विकास' या उपक्रमांतर्गत ग्रामीण समाजकार्य शिबिर रोहनखेडा तालुका हिंगणघाट जिल्हा वर्धा या ठिकाणी घेण्यात आले.

उद्घाटन समारंभकरिता कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून मा. डॉ.  नंदा पांगुळ बारहाते मॅडम बी.पी. नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ सोशल वर्क नागपूर या होत्या. त्याचबरोबर विशेष उपस्थिती म्हणून मा.श्री डॉ. दिलीप बाराहाते सरपंच ग्रामपंचायत रोहनखेडा माननीय डॉ. कल्पना नेनावे आरोग्य अधिकारी कानगाव ,चंद्रशेखर कोल्हे तलाठी ग्रामपंचायत रोहनखेडा, सौ. सविता तीनघशे ग्रामसेवक ग्रामपंचायत रोहनखेडा, मा. सौ नीलिमा ढगे मुख्याध्यापिका जिल्हा परिषद प्राथमिक शाळा रोहनखेडा, मा. प्राचार्य डॉ.चंदू पोपटकर विशेष अतिथी तसेच शिबिर समन्वयक डॉ. रामेश्वर व्हंडकर इ.मान्यवर मंचावर उपस्थित होते. सर्व मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून थोर पुरुषांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून सर्व मान्यवरांचे सूतमाला देऊन स्वागत करण्यात आले. नंतर डॉ. रामेश्वर व्हंडकर यांनी शिबीरचे प्रस्ताविक मांडले यानंतर  शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी मंचावर उपस्थित उद्घाटक डॉ.. नंदा पांगुळ बारहाते शिबिराचे उद्घाटन झाले असे आपल्या भाषणातून जाहीर केले नंतर सर्व मान्यवरांनी शिबिरार्थी यांना आपल्या भाषणातून मार्गदर्शन केले . या उद्घाटन कार्यक्रमाचे संचालन कु.प्राप्ती कामडी हिनी केले

प्रा..अशोक सातपुते यांनी आभार प्रदर्शन केले .उद्घाटन कार्यक्रम संपल्यानंतर सर्व मान्यवरांनी  भोजनाचा आस्वाद घेतला त्याच बरोबर सर्व शिबिरार्थींनी भोजन केले. यानंतर ठीक ४:३० वाजता शिबिराच्या  आयोजन समितीने विद्यार्थ्यांचे विविध समिती ग्रुप तयार करण्यात आले. समितीत्यांचे महत्त्व पटवून देण्यात आले यानंतर सगळ्यांनी चहा घेतला व थोड्याच वेळात सांस्कृतिक कार्यक्रम सुरू  झाला. या सत्राला सुरुवात झाली ती कवी संमेलनाने कवी डॉ. पोपटकर डॉ अरविंद पाटील, डॉ. पूनम येसंबरे, डॉ. अशोक सातपुते हे सहभागी झाले होते. संमेलन सत्रामध्ये सर्व मान्यवर कवींनी स्वरचीत कविता सादर करून समाज वेदना त्यांच्या माध्यमातून शिबिरार्थींच्या समोर मांडल्या यासत्राचे संचालन शिबिरार्थी कु.मोनीका घसाड हिने केले तर आभार प्रदर्शन डॉ. कमल पोटदुखे यांनी केले

गुरुवार दिनांक २/२/२०२३ ला सर्व विद्याथी एकत्र झाले समाजकार्य ग्रामीण शिबीराचा शेवटचा दिवस या दिवशी निरोप दिंडी काढण्यात आली

# संदेश सामाजिक न्याय विभाग-एक दृष्टीक्षेप कार्यसफलता

समाज कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.

१. अनुसूचित जाती उपयोजना
२. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंती वर्षानिमित्त राज्यात मागासवर्गीय मुलींसाठी नवीन ५० शासकीय वसतिगृह सुरु करणे.
३. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंती वर्षानिमित्त महानगरात नोकरी करणाऱ्या मागासवर्गीय महिलांसाठी शासकीय वसतिगृहे सुरु करणे.
४ . मुला मुलींसाठी शासकीय वसतिगृहे
५. विभागीय स्तरावर १००० विद्यार्थी क्षमतेची शासकीय वसतिगृहे
६. अनुसूचित जाती व नवबौध्द मुला-मुलींकरिता तालुका स्तरावर १०० शासकीय निवासी शाळा सुरु करणे.
७. सफाई कामगारांच्या मुला-मुलींसाठी पब्लीक स्कूल.
८. अनुसूचित जाती व नवबौध्द मुला-मुलींसाठी विभागीय स्तरावर उच्चस्तर औद्योगिक प्रशिक्षण संस्था.
९. स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविण्यात येणाऱ्या मागासवर्गीय अनुदानित वसतिगृहांना सहाय्यक अनुदान.
१०. स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविण्यात येणाऱ्या अनुसूचित जातीच्या मुला-मुलींसाठी अनुदानित आश्रमशाळा.
११. समाज कल्याण संस्थांना अनुदान (समाज कार्य महाविद्यालय).
१२. भारत सरकार शिष्यवृत्ती.
१३. मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी शिक्षण शुल्क व परिक्षा शुल्क प्रदान करण्याची योजना.
१४. राज्यातील १०० अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना देशातील शैक्षणिक संस्थांमध्ये उच्च शिक्षण घेण्यासाठी राजर्षी शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती योजना.
१५. अनसचित जातीच्या व नवबौध्द घटकांतील विद्यार्थ्यांना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती.
१६. वैद्यकीय, तंत्रनिकेतन, कृषी, पशुवैद्यकीय व अभियांत्रिकी व्यावसायिक पाठयक्रम असणाऱ्या महाविद्यालयात शिकणाऱ्या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांसाठी पुस्तकपेढी योजना.
१७. व्यावसायिक पाठयक्रमांशी संलग्न वसतिगृहातील विद्यार्थ्यांना निर्वाहभत्ता व विद्यावेतन.
१८. सैनिक शाळेतील अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता.
१९ सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना.
२०. राजर्षी छत्रपती शाहू महाराज गुणवत्ता पुरस्कार.
२१. मॅट्रीकपूर्व शक्षण फी परिक्षा फी प्रदान योजना.
२२. माध्यमिक शाळेत शिकत असलेल्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवत्ती
२३. अस्वच्छ व्यवसायातील पालकांच्या मुलांना मॅट्रीकपूर्व शिष्यवृत्ती.
२४. इयत्ता ९ वी व १० वी मध्ये शिकत असणाऱ्या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना भारत सरकारची मॅट्रीकपूर्व शिष्यवृत्ती योजना.
२५. औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना विद्यावेतन.
२६. मागेल त्याला व्यावसायिक प्रशिक्षण.
२७. राजर्षी छत्रपती शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती.
२८. मोटार वाहन चालक प्रशिक्षण.
२९. अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांतील युवकांसाठी सैन्य व पोलिस भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्र.
३०. डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन.
३१. अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीचा विकास करणे.
३२. रमाई आवास (घरकुल) योजना.
३३. अत्याचारास बळी ठरणा-या अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या कुटुंबातील सदस्यांना अर्थसहाय्य.
३४. आंतरजातीय विवाहास प्रोत्साहनपर आर्थिक सहाय्य.
३५. कन्यादान योजना.
३६. पुरस्कार व पारितोषिके.
३७. शाहू-फुले-आंबेडकर अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीचा विकास व सुधारणा अभियान (पुरस्कार).
३८. जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती..
३९. विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समित्यांची कार्यक्षेत्रे व कार्यालये,
४०. सामाजिक न्याय विभागांतर्गत विविध आयोग
१) महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती, जमाती आयोग,
२) महाराष्ट्र राज्य सफाई कर्मचारी आयोग.
३) महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोग पुणे.
४१. पद्मश्री कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण व स्वाभिमान योजना.
४२. अनुसूचित जातीच्या सहकारी सूत गिरण्यांना दीर्घ मुदतीच्या कर्जाची योजना.
४३. अनुसूचित जातीच्या सहकारी औद्योगिक संस्थांना अर्थसहाय्याची योजना.
४४. गटई कामगारांना पत्र्याचे स्टॉल पुरविणे.
४५. अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या स्वयंसहाय्यता बचत गटांना मिनी टॅक्टर व त्यांनी उपसाधने यांचा पुरवठा करणेची योजना.
४६. वृध्दाश्रम योजना.
४७. मातोश्री वृध्दाश्रम योजना.
४८. राज्याचे जेष्ठ नागरिक धोरण.
४९. महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष, अनिष्ट व अघोरी प्रथा व जादूटोणा यांना प्रतिबंध घालण्याबाबत व त्यांचे समूळ उच्चाटन करण्याबाबत अधिनियम -२०१३.
५०. व्यसनमुक्ती प्रचार कार्य.
५१. व्यसनमुक्ती उपचार व मार्गदर्शन केंद्र. (केंद्र पुरस्कृत योजना)
५२. अंमली पदार्थ विरोधी लढा-राज्याचे व्यसनमुक्ती धोरण.
५३. नशाबंदी मंडळ.

# महाविद्यालयीन विविध कार्यक्रमाचे क्षणचित्रे २०२२–२३




डॉ. कैलाश सत्यार्थी उच्चशिक्षण व संशोधन केंद्राच्या उद्‌घाटनप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष मा. प्रकाशजी कुंभलकर, उपाध्यक्षा वनितताई रेवतकर, सचिव युगांतजी कुंभलकर व इतर




१५ ऑगस्ट स्वातंत्र्यदिन झेंडावंदनप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंदू पोपटकर, प्राध्यापकवृंद व इतर कर्मचारी



२२ नोव्हेंबर रोजी एक दिवशीय करिअर व स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन करतांना प्रा. सतिश धवड




भान तरूणाईचे स्नेहसंमेलनाच्या उद्‌घाटनप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष मा. प्रकाशजी कुंभलकर, संचालक मा. राजेशजी कुंभलकर प्राचार्य डॉ. पोपटकर, डॉ. सातपुते



व्यक्तिसहाय्य कार्य या विषयावर कार्यशाळेत मार्गदर्शन करताना प्रा. नरेश पाटील




संशोधन विषयाचे सादरीकरण करताना एम.एस.डब्लूची विद्यार्थ्यींनी, मंचावर समिती समन्वयक डॉ. पोटदुखे, डॉ. तोतडे, प्रा. धवड व प्रा. उइके

# महाविद्यालयीन विविध कार्यक्रमाचे क्षणचित्रे २०२२-२३



संस्थेच्या माजी अध्यक्षा स्मृतीशेष लिलाबाई कुंभलकर यांच्या जयंतीदिनी अभिवादन करताना महाविद्यालयाचे प्राध्यापकवृंद




नवीन शैक्षणिक राष्ट्रीय धोरण या विषयावर व्याख्यान देताना डॉ. राम सवनेकर, मंचावर प्रा. सतीश धवड, प्रा. राजेश तांडेकर




शैक्षणिक अभ्यास दौऱ्याकरिता जाताना एम.एस.डब्ल्यू वैद्यकीय मानसोपचार आणि सामुदायिक विकास विशेषीकरणाचे विद्यार्थी




महाविद्यालयाच्या भेटीप्रसंगी नॅक पिअर टीमचे समिती सदस्य आणि त्यांच्या सोबत सांस्कृतिक कार्यक्रम सादर करणारे विद्यार्थी, संस्थेचे अध्यक्ष मा. प्रकाशजी कुंभलकर व इतर



राष्ट्रीय सेवा योजने अंतर्गत महात्मा गांधी यांच्या जयंतीदिनी मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ. चंदू पोपटकर




महाविद्यालयात कराटे प्रशिक्षण वर्गाच्या आयोजनप्रसंगी बोलतांना डॉ. अरविंद घोंगडे

# महाविद्यालयीन विविध कार्यक्रमाचे क्षणचित्रे २०२२–२३




एम.एस.डब्ल्यू १चा विद्यार्थी अजय कान्हेरे याने विद्यापीठ स्तरीय कराटे स्पर्धेत पुरस्कार प्राप्त केल्याबद्दल अभिनंदन करताना विद्यापीठ आयोजक समिती



संस्थेचे सचिव स्मृतीशेष डॉ. योगेशजी कुंभलकर यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करतांना डॉ. बबनरावजी तायवाडे, आमदार अभिजीत वंजारी व इतर



महाविद्यालयातील प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना नॅक संदर्भात मार्गदर्शन करतांना संस्थेचे सचीव मा. युगांतजी कुंभलकर



मुक्तांगण वर्धा येथे श्रमदान करताना महाविद्यालयाचे विद्यार्थी




रा.तु.म. नागपूर विद्यापीठ सीनेट सदस्य म्हणून निवडून आल्याबद्दल प्राचार्य डॉ. चंदू पोपटकर यांचे अभिनंदन करताना महाविद्यालयाचे कर्मचारी




महाविद्यालयाला 'ए' + नॅक श्रेणी प्राप्त झाल्याबद्दल प्राचार्याचे अभिनंदन करताना संस्थेचे सचिव मा. युगांतजी कुंभलकर व संचालक मा. राजेशजी कुंभलकर

# Student Activities of KCSW 2022-2023



तंबाखू मुक्तीची शपथ घेताना महाविद्यालयाचे प्राचार्य
डॉ. चंदू पोपटकर, प्राध्यापकवृंद व शिक्षकेत्तर कर्मचारी



'हर घर तिरंगा' या अभियानामध्ये सहभागी महाविद्यालयाच्या
राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे स्वयंसेवक



महाविद्यालयात ग्रंथप्रदर्शनी निमित्त ग्रंथाचे अवलोकन करतांना
संचालक राजेशजी कुंभलकर, प्राचार्य डॉ. चंदू पोपटकर,
ग्रंथपाल डॉ. वर्षा पाटील व इतर




निरिक्षणात्मक संस्था भेटीप्रसंगी कुंभलकर कॉलेज ऑफ
सोशल वर्क, महाविद्यालयाचे विद्यार्थी, सोबत
समन्वयक डॉ. रामेश्वर व्हंडकर





दिल्ली येथील गुंज संस्थेच्या अभ्यास दौऱ्याप्रसंगी महाविद्यालयाचे
विद्यार्थी, सोबत समन्वयक प्रा. सतीश धवड,
प्रा. विशाखा मानकर व प्रा. नरेश पाटील




स्टेट बँक ऑफ इंडिया शाखा प्रबंधक, वर्धा यांच्या हस्ते
महाविद्यालयात वृक्षारोपण याप्रसंगी
मा. अधिक्षक राजेशजी कुंभलकर प्राचार्य डॉ. चंदू पोपटकर

# Student Activities of KCSW 2022-2023




महाविद्यालयामध्ये जागतिक योग दिनाप्रसंगी योग सादर करताना महाविद्यालयाचे प्राध्यापकवृंद व इतर कर्मचारी




आदर्श ग्रामीण विकास संस्था औरंगाबाद यांच्या संयुक्त विद्यमाने समुदाय विकास कार्यकर्ते म्हणून कॅम्पस मुलाखती घेतांना डॉ. व्हंडकर व इतर




आदिवासी वीर बिरसा मुंडा यांची जयंती निमित्त अभिवादन करताना डॉ. महादेव चुंचे



इंदिरा गांधी विद्यालय तथा कनिष्ठ महाविद्यालय अल्लीपूर येथे विद्यार्थ्यांना समाजकार्य शिक्षणातील रोजगाराच्या संधी यावर मार्गदर्शन करताना प्रा. नरेश पाटील



कुंभलकर कॉलेज ऑफ सोशल वर्क मध्ये मानवीहक्क दिनानिमित्त मार्गदर्शन करताना प्रा. विलास बेले




कुंभलकर महाविद्यालयात ७४ व्या गणराज्य दिनी झेंडावंदन प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य प्राध्यापकवृंद

# Student Activities of KCSW 2022-2023



क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंती निमित्त अभिवादन करताना प्राध्यापक वृंद



राजमाता जिजाऊ यांच्या जन्मदिनी विचार मांडताना डॉ. महादेव चुंचे मंचावर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंदू पोपटकर, रासेयो अधिकारी प्रा. गजानन जाधव



जिल्हा रेडक्रॉस सोसायटी, कांगडा स्थित धर्मशाला द्वारा संचालित नशा निवारण केंद्र, जिल्हा कांगडा, हिमाचल प्रदेश या संस्थेच्या भेटी प्रसंगी एम.एस.डब्ल्यु सेमी. ४ चे विद्यार्थी



डॉ. योगेश जी कुंभलकर यांना स्मृतिदिनानिमित्त अभिवादन करताना महाविद्यालयाचे प्राध्यापकवृंद व इतर



देशाचे पहिले पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरू यांच्या जन्मदिनाच्या निमित्ताने अभिवादन करताना प्राध्यापकवृंद




डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा महापरिनिर्वाण दिनाच्या कार्यक्रमाप्रसंगी विचार मांडताना डॉ. अशोक सातपूते

# Student Activities of KCSW 2022-2023




शैक्षणिक सत्राच्या सुरूवातील विविध समित्यांची भूमिका या संदर्भात एक दिवसीय कार्यशाळाप्रसंगी मार्गदर्शन करताना संस्थेचे सचिव मा. युगांतजी कुंभलकर



न्यू इंग्लिश हायस्कूल वर्धा येथे व्यक्तिमत्व विकास कार्यशाळेप्रसंगी मार्गदर्शन करताना प्रा. विलास बेले




बीएसडब्ल्यू भाग तीनच्या विद्यार्थ्यांचा अभ्यास दौरा सोबत समन्वयक डॉक्टर महादेव चुंचे



भावी मतदार जनजागृती कार्यक्रमाला उपस्थित महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंदू पोपटकर




राष्ट्रपिता महात्मा गांधीजी यांच्या स्मृतिदिनी अभिवादन करताना प्राध्यापक वृंद




राष्ट्रीय मतदार दिनाच्या निमित्ताने मार्गदर्शक करताना डॉ. प्रमोद नारायणे

# Student Activities of KCSW 2022-2023



रोहनखेडा ता. हिंगणघाट जि. वर्धा येथे
ग्रामीण सत्र शिबीरात व्यायाम करताना विद्यार्थी




रोहनखेडा ता. हिंगणघाट जि. वर्धा येथे दि २७ जानेवारी ते
२ फेब्रुवारी २०२३ राष्ट्रीय सेवा योजना शिबीराच्या
उद्घाटनप्रसंगी बोलताना प्राचार्य डॉ. चंदू पोपटकर




विज्ञान ज्योत पदयात्रेमध्ये सहभागी राष्ट्रीय सेवा योजना
स्वयंसेवक




संविधान सन्मान रॅलीमध्ये महाविद्यालयाचे प्राध्यापक वृंद
आणि विद्यार्थी यांचा सहभाग



विद्यार्थ्यांना पारितोषक देताना संस्थेचे सचिव
मा. युगांतजी कुंभलकर आणि संचालक मा. राजेशजी कुंभलकर




सुप्रसिद्ध प्रबोधनकार, लेखक आणि दिग्दर्शक
मा. शिवाजी नाईकवाडी सर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना

Rashtrasant Tukdoji Maharaj Technical & Education Society's

# KUMBHALKAR COLLEGE OF SOCIAL WORK

Sevagram Road, Wardha


## COLLEGE DEVELOPMENT COMMITTEE

As per Maharashtra Public University Act, 2016, Article 97 (1)

**2022-2027**

| Sr. | Name of the Member | Designation |
|---|---|---|
| 01 | Mr. Yugant Y. Kumbhalkar | Chairperson |
| 02 | Mr. Prakash K. Kumbhalkar | Management Representative |
| 03 | Dr. Chandu K. Popatkar | Member Secretary (Principal) |
| 04 | Mr. Kishor S. Dhoble | HOI Nominated Member |
| 05 | Dr. Punam Y. Yeasambare | Teaching Staff Member |
| 06 | Dr. Arvind B. Ghongade | Teaching Staff Member |
| 07 | Mrs. Vishakha K. Mankar | Teaching Staff Member |
| 08 | Mr. Ravindra L. Wadekar | Non-Teaching Staff Member |
| 09 | Dr. Raju D. Bhongade | Educational Field Member |
| 10 | Mr. Rupesh Kumar Singh | Business Field Member |
| 11 | Dr. Vijay Shingnapure | Research Field Member |
| 12 | Mr. Harish D. Ithape | Social Service Field Member |
| 13 | Mr. Satishkumar G. Dhawad | IQAC Co-ordinator |
| 14 | Ku. Achal G. Bobade | Student Representative |










**Rashtrasant Tukdoji Maharaj Technical And Education Society Nagpur**

## KUMBHALKAR COLLEGE OF SOCIAL WORK, WARDHA

Accredited by Maharashtra State Department of Social Justice and Special Assistance
Affiliated Rashtrasant Tukdoji Maharaj Nagpur University Nagpur

Kalawadi Area, Sevagram Road, Wardha 442001
**E Mail :** kcswwardha,@rediffmail.in **Ph. :** 07152-241848
**Website :** www.kcswwardha.in **Facebook:** https://www.facebook.com/kscwwardha/